अध्याय एकोणिसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमो सद्‌गुरु त्र्यंबका । ब्रह्मगिरिनिवासनायका । त्रिगुणत्रिपुरभेदका । कामांतका गिरिशा ॥ १ ॥ तुझा अनाहताचा डमरू । सर्व शब्दें करी गजरू । वेदानुवादें निरंतरू । त्रिकांडीं थोरू गर्जत ॥ २ ॥ तुझे हातींचें खट्वांग । करी जीवाचा जीवभंग । अनंगेंसीं जाळूनि अंग । अंगसंग तैं देशी ॥ ३ ॥ त्रिनयन त्र्यंबकलिंगा । तुजपासोनि प्रवाहे चिद्गंगा । ते पवित्रपणें उद्धरी जगा । प्रकाशगर्भा शंकरा ॥ ४ ॥ प्रत्यक्ष दिसती दोन्ही लोचन । तिसरा गुप्त ज्ञाननयन । यालागीं तूं त्रिलोचन । नयनेंवीण दीसशी ॥ ५ ॥ निजांगें वाहसी बोध चंद्र । यालागीं तूं चंद्रशेखर । चंद्रसूर्यादि चराचर । तुझेनि साचार प्रकाशती ॥ ६ ॥ भव या नांवाची ख्याती । भवप्रकाशक तुझी चिच्छक्ती । तूंचि विष्णु प्रजापती । रुद्र तूं अंतीं संहर्ता ॥ ७ ॥ मोडूनियां नामरूपमुद्रा । जीव आणिशी एकाकारा ।

यास्तव एकनाथानें आपला एकपणा टाकून तो जनार्दनाला शरण गेला व त्यांच्या कृपेनें हें स्वधर्मकर्माचें निरूपण शेवटास नेलें. ३९७.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित
टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव संवादांतील
वानप्रस्थ-संन्यासधर्मनिरूपण नांवाचा अठरावा अध्याय समाप्त झाला.

हे सद्‌गुरो त्रिनेत्रा, तुला नमस्कार असो. तूं ब्रह्मरूपी पर्वतावर रहाणारा, सत्त्व-रज-तम या तीन गुणांचें जें त्रिपुर त्याचा भेद करणारा, मदनाचा अंत करणारा, पर्वतांचा स्वामी शंकर आहेस. १ तुझा अनाहत डमरु सतत वेदानुवादानें कर्म, भक्ति व ज्ञान याची गर्जना करीत असतो. २ तुझ्या हातांतील खट्वांग (एक आयुध) जीवांच्या जीवपणाचाच नाश करितें. तूं जीवांचा विषयवासनेसह देहभाव नाहींसा करून मग त्याला स्वस्वरूपांत मिळवून घेतोस. ३ हे त्रिनयना स्वयंप्रकाश शंकरा ! तुझ्यापासूनच चिद्गंगेचा प्रवाह वहातो व ती आपल्या पवित्रपणानें जगाचा उद्धार करिते. ४ तुझे दोन नेत्र प्रत्यक्ष दिसतात व तिसरा ज्ञानरूपी नेत्र गुप्त असतो. म्हणून तुला त्रिनयन म्हणतात. इंद्रियावांचूनच तुझें ज्ञान होतें. ५ तूं आपल्या मस्तकावर बोधरूपी चंद्र धारण करितोस. म्हणून तुला चंद्रशेखर म्हणतात. चंद्र सूर्यादि सर्व चराचर जगत् तुझ्या प्रकाशानें प्रकाशित होतें. ६ 'भव' या नांवाची मोठी प्रसिद्धी आहे. तुझी चिच्छक्तीच त्या भवाला प्रकाशित करिते. तूंच विष्णु, ब्रह्मदेव व संहारकर्ता रुद्र आहेस. ७ तूं जीवाचा नाम-रूप इत्यादि सर्व आकार मोडून त्याला आत्मरूप करितोस. तूं प्रलयकालीं प्रलय

अत्यंत प्रळयींच्या प्रळयरुद्रा । चित्समुद्रा शिवरूपा ॥ ८ ॥ शिव शिव जी गुरुराया । निजभावें लागतां पायां । तंव गुरुशिष्यत्व गेलें लया । दावूनियां निजरूप ॥ ९ ॥ तें निजरूप देखतां दृष्टीं । कैंचा जीव कैंची सृष्टी । निमाली त्रिगुणेंसीं त्रिपुटी । पडली मिठी स्वानंदीं ॥ १० ॥ त्या स्वानंदाचे उद्गार । सांवरतां नावरती थोर । त्या स्वानंदाचें निजसार । सत्य साचार एकादश ॥ ११ ॥ त्याहीमाजीं अतिगहन । सुखस्वानंदनिरूपण । तो हा एकुणिसावा अध्याय जाण । परम कारण शास्त्रार्थें ॥ १२ ॥ जें ऐकतां निरूपण । परमानंद उथळे जाण । एका विनवी जनार्दन । श्रोतां अवधान मज द्यावें ॥ १३ ॥ सत्रावे अठरावे अध्यायांप्रती । स्वधर्मकर्में ब्रह्मप्राप्ती । वर्णाश्रमस्थितिगती । उद्धवाप्रती सांगीतली ॥ १४ ॥ एकुणिसावे अध्यायीं जाण । जेणें ज्ञानें साधिलें निजज्ञान । त्या ज्ञानाचें त्यागलक्षण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ १५ ॥ कर्म कर्तव्यता कारण । जीवन्मुक्तासी नाहीं जाण । उद्धवाचे यमादि प्रश्न । हेही श्रीकृष्ण सांगेल ॥ १६ ॥ शास्त्रयुक्त पांडित्यज्ञान । प्रपंचाचें मिथ्या निरूपण । तें आनुमानिक पुस्तकज्ञान । सत्यपण त्या नाहीं ॥ १७ ॥ पूर्वे आहे माझें गमन । हें पूर्वील शुद्ध स्मरण । परी दिग्भ्रम चढल्या जाण । पश्चिमे आपण पूर्व मानी ॥ १८ ॥ तैसें शाब्दिक शास्त्रज्ञान । बोले आन करी आन । तेणें नव्हे समाधान । सर्वथा जाण साधकां ॥ १९ ॥ जेवीं कां दिग्भ्रम मोडे । तैं पूर्वेचा चाले पूर्वेकडे । तेवीं अपरोक्षज्ञान जैं जोडे । तैं साधकु पडे स्वानंदीं ॥ २० ॥ जें जें ऐके वेदांतश्रवण । तें अंगें होत जाण आपण । हें अपरोक्षाचें लक्षण । सत्यत्वें जाण अतिशुद्ध ॥ २१ ॥ ऐसें नव्हतां अपरोक्षज्ञान । सांडूं नये श्रवणमनन । अवश्य करावें साधन । प्रत्यगावृत्ती जाण अत्यादरें ॥ २२ ॥ झालिया अपरोक्ष-

---

करणारा रुद्र व आनंदसागर शिवरूप आहेस. ८ हे गुरुराया ! शिव, शिव म्हणून भाविकतेनें तुझे चरण धरितांच तूं आत्मस्वरूप दाखवून गुरु-शिष्य ही भावना नाहींशी करतोस ९ तें आत्मस्वरूप एकदां दृष्टीस पडलें कीं मग जीव कोठचा व जगत् कोठचें ! त्रिपुटी तीन गुणांत लय पावते व स्वानंदाची मिठी पडते. १० त्या आत्मानंदाचे उद्गार आंवरतां आंवरत नाहींत. हा एकादश स्कंद खरोखर त्या निजानंदाचें सारच आहे. ११ त्यांतहि अत्यंत गहन व शास्त्रार्थास प्रमाण असें आत्मसुखाचें वर्णन या एकोणिसाव्या अध्यायांत केलें आहे. १२ तें निरूपण ऐकिलें असतां परमानंद उचंबळतो, म्हणून श्रोत्यांनी मजकडे अवधान ठेवावें. १३ असें एकनाथ जनार्दन विनंति करीत आहे. सतराव्या व अठराव्या अध्यायांत स्वधर्म-कर्मानें ब्रह्माची प्राप्ति व वर्णाश्रमांची स्थिति यांचें सविस्तर लक्षण उद्धवाला सांगितलें. १४ आतां या एकोणिसाव्या अध्यायांत ज्या ज्ञानानें आत्मज्ञानाची प्राप्ति होते, त्या ज्ञानाचा त्याग कसा करावा, तें लक्षण श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. १५ जीवन्मुक्ताला कर्म-कर्तव्यतेची आवश्यकता नाहीं. उद्धवाच्या यमादि प्रश्नाचेंहि उत्तर श्रीकृष्ण याच अध्यायांत देत आहे. १५ शास्त्रयुक्त विद्वत्तेनें प्रपंच मिथ्या आहे असें सांगणें हें अनुमानानें केलेलें केवळ पुस्तकी ज्ञान झालें. त्यांत सत्यपणा नाहीं. १७ (उदाहरणार्थ) मी पूर्व दिशेकडे जात आहे. पण ‘ पूर्वदिशा ’ या शब्दाचें तेवढें मला स्मरण आहे. (ती दिशा कोणत्या बाजूला आहे याचें निश्चित ज्ञान नाहीं.) तेव्हां दिशाभ्रम होऊन मी पश्चिमेलाच जशी पूर्वदिशा समजूं लागतो, १८ त्याप्रमाणें हें शाब्दिक शास्त्रीय ज्ञान असतें. बोलतो एक व करतो भलतेंच, त्यानें साधकाचें समाधान सर्वथा होत नाहीं; १९ पण ज्याप्रमाणें दिशाभ्रम नाहींसा झाला म्हणजे पूर्वदिशा कोणती हें निश्चयानें कळतें, त्याप्रमाणें साक्षात्काररूप प्रत्यक्ष ज्ञान जेव्हां होतें तेव्हां साधक खऱ्या आत्मानंदाचा अनुभव घेतो. २० तो जेवढें वेदांतश्रवण करितो तेवढें सगळें आपल्या अनुभवाशीं पटवून घेतो. असें हें अनुभवजन्य ज्ञान अति शुद्ध आहे हें सत्य जाण. २१ असें प्रत्यक्ष अनुभवज्ञान होईपर्यंत श्रवण-मनन सोडूं नये. अतिशय आदरानें श्रवणादि साधनांचा पुनः पुनः अभ्यास करावा. २२ एकदां असें आत्म्याचें प्रत्यक्ष ज्ञान झालें कीं, प्रपंच मिथ्या आहे याचें भान होतें. विषयासक्ति शून्य होते व कल्पना

ज्ञान । प्रपंचाचें मिथ्या भान । विषयांसी पडलें शून्य । कल्पना जाण निमाली ॥ २३ ॥ तेणेंचि पुरुषें आपण । त्यागावें ज्ञानसाधन । हेंचि निरूपणीं निरूपण । देव संपूर्ण सांगत ॥ २४ ॥

श्री० उ०--यो विद्याश्रुतसंपन्न आत्मवान्नानुमानिकः । मायामात्रमिदं ज्ञात्वा ज्ञानं च मयि संन्यसेत् ॥ १ ॥

वेदशास्त्रार्थीं परिनिष्ठित । श्रवणमननअभ्यासयुक्त । ज्यासी ब्रह्मविद्या प्राप्त । सुनिश्चित स्वानुभवें ॥ २५ ॥ तोचि अनुभव ऐसा । दोराअंगीं सर्प जैसा । न मारितां नाशे आपैसा । भवभ्रम तैसा त्या नाहीं ॥ २६ ॥ जेवीं कां नटाची रावो राणी । दोघें खेळती लटिकेपणीं । तेवीं प्रकृतिपुरुषउभवणी । मिथ्यापणीं जो जाणे ॥ २७ ॥ जैशीं भिंतीमाजीं नानाकार । चित्रें लिहिलीं विचित्र । ते भिंतीचि एक साचार । तेवीं ऐक्य चराचर जो देखे ॥ २८ ॥ स्वप्नींचीं नाना कर्मं जाण । त्यांचें जागृतीं नव्हे बंधन । तेवीं मिथ्या निजकर्माचरण । जीवित्वेंसीं जाण जो देखे ॥ २९ ॥ ऐशी साचार ज्याची स्थिती । त्या नांव शुद्ध आत्मप्राप्ती । निजानुभव त्यातें म्हणती । हें जाण निश्चितीं उद्धवा ॥ ३० ॥ आणिक एक तेथींची खूण । विषयावीण स्वानंद पूर्ण । हें अनुभवाचें मुख्य लक्षण । सत्य जाण सात्वता ॥ ३१ ॥ ऐसा अनुभव नसतां देख । केवळ ज्ञान जें शाब्दिक । त्यातें म्हणिजे आनुमानिक । जाण निष्टंक निजभक्ता ॥ ३२ ॥ ज्याच्या अनुभवाभीतरीं । नाहीं अनुमानासी उरी । जो अपरोक्षसाक्षात्कारीं ।

नाहींशीं होते. २३ अशा स्थितीस जो साधक पोंचतो, त्यानेंच ज्ञानाच्या साधनाचा त्याग करावा. याचेंच सविस्तर निरूपण श्रीकृष्ण करीत आहे. २४.

[मागच्या अध्यायांत आश्रमधर्माच्या योगानें ज्ञानादिकांचा निर्णय केला. आतां या एकोणिसाव्या अध्यायांत ज्ञानादिकांचा त्याग सांगितला जातो.]

---वर वर्णन केल्याप्रमाणें तर्कानें बाधित केलेलाहि देहादि प्रपंच दिङ्मोहाप्रमाणें अपरोक्ष अनुभवानें जोंवर लीन होत नाहीं, तोंवर ज्ञानाभ्यास करावा; त्यामुळें मुक्ति मिळते, असें 'आदेहान्तात्' [अ. १८-३७ पृ. १२९] इत्यादि वचनानें सांगितलें; पण अपरोक्ष अनुभवानें ज्याचा प्रपंच लीनप्राय झालेला असतो, त्याला कर्तव्य कांहीं नसतें, असें आतां सांगतात---

यः विद्याश्रुतसंपन्नः आत्मवान् नानुमानिकः--जो अनुभवापर्यंत ज्ञानानें संपन्न असलेला, त्यामुळेंच आत्मतत्त्वाला प्राप्त झालेला, केवल परोक्षज्ञानवान् नसतो, सः इदं मयि मायामात्रं ज्ञात्वा ज्ञानं च संन्यसेत्--तो हें द्वैत व त्याच्या निवृत्तीचें साधन माझ्या ठिकाणीं मायामात्र म्ह० कल्पित आहे, असें जाणून ज्ञान व ज्ञानाचें साधन यांचा त्याग करितो. [यालाच विद्वत्संन्यास म्हणतात. 'आत्मवान् आनुमानिकः' असा येथें पाठ घेतल्यास अनुकूल तर्कानें ज्यानें अर्थाचा निर्णय केला आहे, असा 'आनुमानिकः' या पदाचा अर्थ करावा.] १.

वेदशास्त्रार्थांत तत्पर होऊन श्रवण-मनन अभ्यासानें जो युक्त असतो आणि ज्याला ब्रह्मविद्या प्राप्त होते तो स्वानुभवानें निश्चित होतो. २५ तो स्वानुभव कसा म्हणून म्हणाल तर, दोरीवर भ्रमानें भासलेला सर्प जसा न मारतांच आपोआप नाश पावतो, तसा त्याचा भवभ्रम नाहींसा होतो. २६ किंवा नाटकांतील राजा व राणी हीं दोघें मिथ्या असूनच जशीं राजा-राणीचा भाव आणतात, त्याचप्रमाणें प्रकृति-पुरुष या दोघांची उभारणी मिथ्या आहे, असें तो समजतो; २७ किंवा भिंतीवर अनेक आकाराचीं चित्र-विचित्र चित्रें काढिलीं तरी वास्तविक भिंत एकच असते, तसेंच तो या सर्व चराचर सृष्टींत ऐक्य पहातो. २८ किंवा स्वप्नांत केलेलीं नानाप्रकारचीं कर्में जशीं जागें झाल्यावर बद्ध करीत नाहींत, त्याप्रमाणें 'मी जीव अमुक कर्म करितों' असें तो मानीत नसल्यामुळें त्या कर्मानें बद्ध होत नाहीं. २९ जो अशा स्थितीला पोंचतो, त्यालाच खरी आत्मप्रतीति येते. उद्धवा ! त्याला निरुपाधिक आनंद म्हणतात. ३० त्या अवस्थेला पोंचल्याची आणखी एक खूण आहे विषयावांचून पूर्ण स्वानंदाचा अनुभव घेणें हें आत्मसाक्षात्काराचें मुख्य लक्षण आहे. सात्वतकुलांतील भक्तश्रेष्ठ उद्धवा ! हें तूं अगदीं सत्य समज. ३१ अशा अनुभवावांचून जें केवळ शाब्दिक ज्ञान असतें, त्याला आनुमानिक ज्ञान म्हणतात, हेंहि निश्चित समज. ३२

निरंतरीं नांदत ॥ ३३ ॥ ऐसा जो पुरुष जाण । तेणें ज्ञानाचें साधन । आणि वृत्तिरूप जें ज्ञान । तेंही आपण त्यागावें ॥ ३४ ॥ तें न त्यागितां लवलाहें । सहजचि त्याग होये । जेवीं सूर्योदयीं पाहे । सचंद्र तेज जाये तारागणाचें ॥ ३५ ॥ जेवीं हनुमंत देखोनि येतां । नवचंडी पळे तत्त्वतां । मा राहावया येरां भूतां । उरी सर्वथा उरेना ॥ ३६ ॥ तेवीं माझे साक्षात्कारीं । त्यासी बद्धता नाहीं खरी । मा ज्ञान तिचे निवृत्तीवरी । कैशापरी राहेल ॥ ३७ ॥ माझिया अनुभवाच्या ठायीं । बंधमोक्ष मिथ्या पाहीं । तेथ साधनज्ञानाचा कांहीं । उपेगू नाहीं उद्धवा ॥ ३८ ॥ परमात्मस्वरूपाच्या ठायीं । हें अवघें मायिक पाहीं । तेथें ज्ञानध्यान जें कांहीं । न त्यागितां पाहीं त्यागिलें ॥ ३९ ॥ त्यागोनियां ज्ञानध्यान । ज्ञानियांसी माझी प्रीति गहन । तेंचि प्रीतीचें लक्षण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ४० ॥

ज्ञानिनस्त्वहमेवेष्टः स्वार्थो हेतुश्च संमतः । स्वर्गश्चैवापवर्गश्च नान्योऽर्थो मदृते प्रियः ॥ २ ॥

जो मी अद्वयानंद स्थिती । त्या माझी ज्ञानियां प्रीती । ते प्रीतीची उपपत्ती । ऐक निश्चितीं उद्धवा ॥ ४१ ॥ ज्ञानियांसी अतिवल्लभ । जो मी परमात्मा स्वयंभ । ज्ञानियांचा परम लाभ । मी पद्मनाभ निजधन ॥ ४२ ॥ ज्ञानियांसी जो स्वर्ग चांग । तो मजवेगळा नाहीं मार्ग । ज्ञानियांचा जो मोक्षभाग । तो मी श्रीरंग निजात्मा ॥ ४३ ॥ ज्ञानियांचें स्वधर्मसाधन । तें मी परमात्मा नारायण । मज वेगळें कांहीं आन । ज्ञात्यांसी जाण असेना ॥ ४४ ॥ ज्ञात्यांसी स्वर्गमोक्षसुख । मजवेगळे उरलें नाहीं देख । मी चिदात्मा निजव्यापक । भावें निष्टंक पावलें ॥ ४५ ॥ ज्ञात्यांचा अर्थ स्वार्थ परमार्थ । मी

ज्याच्या अनुभवांत अनुमानाचा प्रवेशहि होत नाहीं, तोच अपरोक्ष साक्षात्कारांत निरंतर नांदतो. ३३ अशा साधकानें ज्ञानाचें साधन आणि वृत्तिरूप ज्ञान यांचा आपण होऊन त्याग करावा. ३४ तें जरी टाकिलें नाहीं, तरी सूर्योदय होतांच चंद्रासह नक्षत्रमंडलाचें तेज जसें लोपतें तसें तें काल्पनिक ज्ञान सहज नाहींसें होतें. ३५ हनुमानाला पहातांच अहिरावणाची देवी नवचंडीहि पळत सुटली, मग इतर भूतांची काय कथा! ३६ त्याचप्रमाणें माझा साक्षात्कार झाला असतां साधकाची बद्धताच पळून जाते व ती गेल्यावर मग तिला घालविणारें ज्ञान कशाला राहील! ३७ माझा आत्मानुभव आला कीं, त्याच्यापुढें बंध-मोक्ष मिथ्या ठरतात; तेथें साधनाच्या ज्ञानाचा कांहीं उपयोग नाहीं. ३८ परमात्मस्वरूपापुढें बंध-मोक्ष हें सगळें काल्पनिक आहे. त्याच्यापुढें ज्ञान-ध्यान या सर्वांचा आपोआपच त्याग होतो. ३९ ज्ञान-ध्यानाचा त्याग करूनहि ज्ञानी भक्ताला माझी अत्यंत आवड असते. त्याच्या प्रीतीचें लक्षण आतां श्रीकृष्ण सांगत आहे. ४०.

—त्याविषयीं हेतु सांगतात—

ज्ञानिनः तु अहं एव इष्टः स्वार्थः हेतुः च संमतः—कारण ज्ञान्याला मीच इष्ट स्वार्थ म्ह० अपेक्षित फल व त्याचें साधन म्हणून संमत आहें. **मदृते स्वर्गः च अपवर्गः एव अन्यः अर्थः प्रियः न**—त्याला मजवांचून दुसरा स्वर्ग म्ह० अभ्युदय व अपवर्ग म्ह० संसारनिवृत्ति हा अर्थ प्रिय नाहीं. २.

उद्धवा! अद्वयानंद स्थितींत असणारा जो मी त्या माझी ज्ञानी भक्तास फार आवड असते. त्या प्रीतीचें लक्षण आतां ऐक. ४१ ज्ञानी भक्तांस अत्यंत प्रिय जो मी स्वतःसिद्ध परमात्मा, तोच ज्ञान्यांचा परम लाभ आहे. मी पद्मनाभच त्यांचा श्रेष्ठ ठेवा आहे. ४२ ज्ञान्यांचा श्रेष्ठ स्वर्गहि माझ्याहून वेगळा नाहीं. त्यांचा जो जो मोक्षाचा मार्ग तोहि मी निजात्मा श्रीकृष्ण आहें. ४३ ज्ञान्यांचें जें स्वधर्मसाधन तेंहि मी परमात्मा नारायणच आहें. माझ्यावांचून ते दुसरें कांहींहि जाणत नाहींत. ४४ त्यांना स्वर्गसुख व मोक्षसुख हेंहि मजहून निराळें वाटत नाहीं. ते मज सर्वव्यापी चिदात्म्याला निःसंशय प्राप्त होतात. ४५ ज्ञानी भक्ताचा अर्थ-स्वार्थ-परमार्थ सगळें मी पुरुषोत्तमच

पुरुषोत्तम गा समस्त । आद्य अव्यय अनंत । माझें निजसुख प्राप्त ते जाहले ॥ ४६ ॥ ऐशी ज्ञानियांसी माझी प्रीती । तेहि तैसेच मज प्रिय होती । तेंचि स्वयें श्रीपती । उद्धवाप्रती सांगत ॥ ४७ ॥

ज्ञानविज्ञानसंसिद्धाः पदं श्रेष्ठं विदुर्मम । ज्ञानी प्रियतमोऽतो मे ज्ञानेनासौ बिभर्ति माम् ॥ ३ ॥

ज्ञानविज्ञाननिजसंपत्ती । जाहलियावीण माझी प्राप्ती । कोणासी नव्हे स्वरूपस्थिती । मत्पदीं गति ज्ञानविज्ञानें ॥ ४८ ॥ करितां गुरुशास्त्रशुद्धश्रवण । तेणें जाहलें तें म्हणिजे ज्ञान । त्याचा अनुभव तेंचि विज्ञान । ऐक लक्षण त्याचेंही ॥ ४९ ॥ स्वयें स्वयंपाक केला जाण । न जाणे कटु मधुर लवण । जंव चाखिला नाहीं आपण । ते दशा सज्ञान ' ज्ञान ' म्हणती ॥ ५० ॥ केलिया रसाचें रसास्वादन । स्वयें गोडी सेवी आपण । ऐशी दशा तें ' विज्ञान ' । उद्धवा जाण निश्चितीं ॥ ५१ ॥ एवं विज्ञानज्ञाननिज-संपत्ति । माझ्या उत्तमपदाची पदप्राप्ती । माझें वास्तवस्वरूप जे जाणती । त्यांची मज प्रीती अनन्यत्वें ॥ ५२ ॥ वेदें शास्त्रें युक्तिबळें । माझें स्वरूप कासेनि न कळे । तें ज्यासी वस्तुतां आकळे । मज त्या-वेगळें प्रिय नाहीं ॥५३॥ तेंचि अतिप्रीतीचें लक्षण । त्याच्या पाउलापाउलीं जाण । सर्वांग वोडवीं मी आपण । करीं लिंबलोण सर्वस्वें ॥ ५४ ॥ त्यासी जे वेळे जें लागे । तें मी न मागतां पुरवीं वेगें । त्यासी विरुद्ध ये जेणें मार्गें । तें मी निजांगें निवारीं ॥ ५५ ॥ त्यासी झणीं संसारवारा लागे । यालागीं मीच मी पुढेंमागें । संभवता राहें सर्वांगें । अतिप्रीतिपांगें पांगलों ॥ ५६ ॥ जेणें ज्ञानें ज्ञानी प्रिय होती । त्या ज्ञानाची पवित्र कीर्ती । देवो सांगे उद्धवाप्रती । यथार्थस्थिती निजबोधें ॥ ५७ ॥

आहे. म्हणून ते माझ्या आद्य, अनंत व अव्यय आत्मसुखाला प्राप्त होतात. ४६ ज्ञानी भक्तांची मजवर अशी प्रीति असते आणि मलाहि ते तितकेच प्रिय आहेत. तेंच आतां श्रीपति उद्धवाला सांगत आहे. ४७.

—याविषयीं विद्वदनुभवाचें प्रमाण देतात—

ज्ञान-विज्ञानसंसिद्धाः मम श्रेष्ठं पदं विदुः—ज्ञान व विज्ञान यांनीं संसिद्ध झालेले माझ्या श्रेष्ठपदाला जाणतात. [आतां वर सांगितलेल्या प्रकारच्या ज्ञान्याचें अभिनंदन करितात—] यतः असौ मां ज्ञानेन बिभर्ति अतः ज्ञानी मे **प्रियतमः**— ज्याअर्थीं तो ज्ञानानें मला धारण करितो, त्याअर्थीं ज्ञानी मला अतिशय प्रिय आहे. ३.

ज्ञान-विज्ञानावांचून कोणालाहि माझी प्राप्ति होत नाहीं, किंवा आत्मस्वरूप कळत नाहीं. ज्ञान-विज्ञानानेंच माझें पद लाभतें. ४८ गुरुमुखानें शास्त्रार्थांचें श्रवण केल्यानें जें कळतें, त्याला ' ज्ञान ' असें म्हणतात; आणि त्या ज्ञानाचा अनुभव येणें याला ' विज्ञान ' म्हणतात. त्याचें सविस्तर लक्षण सांगतों, ऐक. ४९ आपण स्वतःच स्वयंपाक करून ठेविला, पण ते पदार्थ जोंवर आपण चाखून पाहिले नाहींत, तोंवर त्याची कडु, गोड, खारट, इत्यादि रुचि कशी आहे, हें बरोबर कळत नाहीं. या स्थितीला विद्वान् लोक ' ज्ञान ' असें म्हणतात; ५० आणि ते पदार्थ सेवन करून आपण जेव्हां त्याची गोडी प्रत्यक्ष अनुभवितो त्या स्थितीला ' विज्ञान ' असें म्हणतात. ५१ अशा ज्ञान-विज्ञानानें संपन्न होतांच भक्ताला परब्रह्मपदाची प्राप्ति होते. जे माझें खरें स्वरूप जाणतात, त्यांच्या ऐक्यभावामुळें माझें त्यांच्यावर अनन्य प्रेम असतें. ५२ वेद-शास्त्र-युक्ति या कशांनींहि न कळणारें माझें स्वरूप जो सहज जाणतो, त्याच्याहून मला दुसरें कोणीहि प्रिय नाहीं. ५३ त्याच्यावरील अत्यंत प्रेमाचें हेंच कारण आहे. अशा भक्तापुढें मी पावलों-पावलीं वाकत असतों व माझ्या सर्वस्वाचें त्याच्यावरून लिंबलोण उतरून टाकितों. ५४ त्या माझ्या भक्ताला ज्यावेळीं ज्याची गरज लागते, तें तो न मागतांच मी पुरवितों. त्याच्या मार्गांत जर कांहीं विघ्न येत असलें तर मी स्वतः पुढें होऊन त्याचें निवारण करितों. ५५ त्याला कदाचित् संसाराचा वारा लागेल, म्हणून मी त्याच्या मागेंपुढें सभोंवार रहातों. उत्कट प्रेमामुळें मी त्याच्या इतका वश होऊन रहातों. ५६ ज्या ज्ञानाच्या योगानें ज्ञानी प्रिय होतो, त्या ज्ञानाची पवित्र कीर्ति (आत्मज्ञानपूर्वक) श्रीकृष्ण उद्धवाला यथार्थ सांगत आहे. ५७.

तपस्तीर्थं जपो दानं पवित्राणीतराणि च। नालंकुर्वन्ति तां सिद्धिं या ज्ञानकलया कृता ॥ ४ ॥

सकळ साधनां नव्हे जे शुद्धी। ते ज्ञानलेशें होय त्रिशुद्धी। ऐक उद्धवा सुबुद्धी। ते ज्ञानसिद्धीचा महिमा ॥ ५८ तप जें करितां पंचाग्नी। तीर्थ गंगादि सरिता त्रिवेणी। जपू जे नाना मंत्रश्रेणी। गो-भू-तिलदानीं सुवर्णादि ॥ ५९ ॥ आणिकही इतर पवित्रें। जें स्वधर्मकर्मादि स्वाचारें। नाना याग अग्निहोत्रें। पवित्रकरें अतिशुद्धें ॥ ६० एवं तपादिक जें साधन। या सकळांची शुद्धी गहन। तें ज्ञानलेशासमान। पवित्रपण तुळेना ॥ ६१ ॥ ज्ञाननिष्ठा अर्धक्षणें। जे पवित्रता स्वयें लहाणें। ते तपादि नाना साधनें। नाहीं पावणें कल्पांतीं ॥ ६२ ॥ ऐसें जें पवित्र ज्ञान। तें मुख्यत्वें धरोनि जाण। माझें करावें भजन। तेंचि निरूपण हरि बोले ॥ ६३ ॥

तस्माज्ज्ञानेन सहितं ज्ञात्वा स्वात्मानमुद्धव। ज्ञानविज्ञानसंपन्नो भज मां भक्तिभावतः ॥ ५ ॥

या कारणें गा उद्धवा। ऐसा पवित्र ज्ञानाचा यावा। तेथ प्रक्षाळूनि निजभावा। जीवू तो बोळखावा परमात्मत्वें ॥ ६४ ॥ जीवू परमात्मा दोनी एक। ऐसें जाणणें तें ज्ञान देख। ऐक्यें भोगणें परमात्मसुख। 'विज्ञान' सम्यक त्या नांव ॥ ६५ ॥ ऐसा ज्ञानविज्ञानसंपन्न। होऊनि करावें माझें भजन। त्या निजभजनाची खूण। ऐक संपूर्ण उद्धवा ॥ ६६ ॥ तेव्हां जेथें देखे जें कांहीं। तें मी वांचूनि आन नाहीं। मग अनन्यभावें तिये ठायीं। भजे पाहीं भावार्थें ॥ ६७ ॥ ऐशिया माझ्या भजनाहातीं। उसंतू नाहीं अहोरातीं। जागृतिस्वप्नसुषुप्तीं। माझी निजभक्ती न मोडे ॥ ६८ ॥ विसरोनि जावें जेथें। तेथेंचि

—त्याच्या ज्ञानाची स्तुति करितात—

या ज्ञानकलया कृता तां सिद्धिं तपः तीर्थं जपः दानं इतराणि च पवित्राणि न अलं कुर्वन्ति—जी सिद्धि ज्ञानाच्या लेशानें संपादन केली जाते, ती तप, तीर्थ, जप, दान व इतर पवित्र साधनें यांतील कशानेंहि प्राप्त होत नाहीं. ४.

सगळ्या साधनांनीं जी शुद्धि होत नाहीं, ती ज्ञानाच्या एका अंशानें होते. हे बुद्धिमान् उद्धवा! त्या ज्ञानसिद्धीचा महिमा ऐक. ५८ जे साधक पंचाग्नि साधनानें तप करितात; गंगा, त्रिवेणी, इत्यादि तीर्थयात्रा करितात; अनेक प्रकारच्या असंख्य मंत्रांचा जप करितात; गायी, भूमि, तीळ व सुवर्णादि यांचें दान देतात; ५९ आणाखीहि नाना प्रकारच्या पवित्र स्वधर्माचें आचरण करितात; अनेक प्रकारचे यज्ञ, अग्निहोत्र इत्यादि अनेक पावन करणारीं कर्में आचरितात, तीं सर्व जरी अत्यंत शुद्ध करणारीं आहेत, ६० तरी माझ्या ज्ञानाच्या एका अंशाबरोबरहि त्यांच्या पवित्रपणाची तुलना करितां येत नाहीं. ६१ ज्ञाननिष्ठेनें अर्ध्या क्षणांत जो पवित्रपणा प्राप्त होतो, तो तपादि साधनांच्या योगानें कल्पांतींहि लाभत नाहीं. ६२ अशा माझ्या पवित्र ज्ञानानें युक्त होऊन मुख्यत्वें माझें भजन करावें. हेंच निरूपण श्रीकृष्ण आतां सांगत आहे. ६३.

तस्मात्—म्हणून, उद्धव—हे उद्धवा! ज्ञानेन सहितं स्वात्मानं ज्ञात्वा—अपरोक्ष साक्षात्कारापर्यंत स्वात्म्याला जाणून, ज्ञान-विज्ञानसंपन्नः भक्तिभावतः मां भज—ज्ञान विज्ञानसंपन्न होऊन भक्तिभावानें मला भज. ५.

बाबा उद्धवा! यासाठींच अशा पवित्र ज्ञानाच्या प्रभावानें जीवाभावाला पावन करून तो परमात्मस्वरूपच आहे, असें जाणावें. ६४ 'जीव आणि परमात्मा हे दोन्ही एकच आहेत' असें ओळखणें हेंच 'ज्ञान' होय व त्याच्याशीं एकरूप होऊन परमात्मस्वरूपाचा अनुभव घेणें याला 'विज्ञान' असें म्हणतात. ६५ अशाप्रकारें ज्ञान-विज्ञानयुक्त होऊन माझें भजन करावें. उद्धवा! त्या माझ्या भजनाची सविस्तर खूण तुला सांगतों, ऐक. ६६ माझा भक्त जेव्हां माझ्याशीं असा समरस होतो, तेव्हां तो कोठेंहि माझ्यावांचून दुसरी वस्तु पहात नाहीं. सर्व पदार्थांत माझीच भावना ठेवून अनन्य भावानें त्यांस तो भजत असतो. ६७ रात्रंदिवस त्याच्या भजनांत खंड पडत नाहीं. जागेपणीं, स्वप्नांत व सुषुप्तींत सुद्धां तो क्षणभरहि मला विसंबत नाहीं. ६८ मला विसरून तो जेथें जातो, तेथें

देखे मातें । मरण आलें विस्मरणातें । स्मरणही तेथें हारपलें ॥ ६९ ॥ यापरी ज्ञानविज्ञानसंपन्न । मज-वेगळें न देखती आन । तैसेंचि माझें अनन्य भजन । शुद्ध भक्ती जाण या नांव ॥ ७० ॥ मागां मुनी-श्वरीं याचि गती । माझी करोनि अनन्य भक्ती । मज पावले जैशा रीतीं । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ७१ ॥

ज्ञानविज्ञानयज्ञेन मामिष्ट्वाऽऽत्मानमात्मनि । सर्वयज्ञपतिं मां वै संसिद्धिं मुनयोऽगमन् ॥ ६ ॥

जे ज्ञानधनें अतिसंपन्न । परम पवित्र विज्ञानें जाण । ऐसे ब्रह्मभूत जे ब्राह्मण । यज्ञद्वारा भजन करिती माझें ॥ ७२ ॥ हृदयाच्या निजभुवनीं । विकल्पाची भूमी खाणोनि । शमदमविरक्ति कुंडें तिन्ही । केलीं आवो साधुनी श्रद्धेचा ॥ ७३ ॥ तेथ क्षराक्षर अरणी दोन्ही । गुरुमंत्रें दृढ मंथुनी । काढिला सूक्ष्म निर्धूमाग्नी । कुंडीं स्थापूनी पेटविला ॥ ७४ ॥ सत्वाचें घृत तेथ । रजतमद्रव्येंसी मिश्रित । वैराग्यस्रुवेनें आहुती देत । मंत्र तेथ युक्तीचे ॥ ७५ ॥ घेऊनि विद्याशस्त्र लखलखित । संकल्पपशूचा करूनि घात । तेणें यज्ञ-पति श्रीअनंत । केला तृप्त निजबोधें ॥ ७६ ॥ तेथ पूर्णाहुतीस कारण । घालितां जीवभावाचें अव-दान । यज्ञभोक्ता श्रीनारायण । परमात्मा जाण सुखी जाला ॥ ७७ ॥ यापरी माझें यजन । करूनियां मुनिगण । निवारूनि जन्ममरण । माझी सिद्धी जाण पावले ॥ ७८ ॥ मुनीश्वरीं साधिली सिद्धी । तेचि उद्धवालागीं त्रिशुद्धी । व्हावया कृष्ण कृपानिधी । प्रपंचनिषेधीं वस्तु सांगे ॥ ७९ ॥

मीच त्याला दिसत असतों. विस्मरणाला मरण आलें कीं, मग स्मरण अर्थातच नाहींसें होतें, ६९ अशाप्रकारें ज्ञान-विज्ञानसंपन्न असलेले भक्त माझ्यावांचून दुसरें कांहीं जाणतच नाहींत, तसेंच एकनिष्ठेनें केलेलें जें माझें भजन त्याला शुद्ध भक्ति असें म्हणतात. ७० पूर्वीं याच मार्गानें मोठमोठे मुनीश्वर माझी अनन्य भक्ति करून मला येऊन मिळाले. त्यांची कथा तुला सांगतों, ऐक. ७१.

—उद्धवाच्या प्रत्ययासाठीं पूर्वींच्या मुनींचा वृत्तांत सांगतात—

मुनयः ज्ञान-विज्ञानयज्ञेन मां आत्मानं आत्मनि इष्ट्वा—मुनी या ज्ञान-विज्ञानयज्ञानें मज आत्म्याला आपल्याच अंतःकरणांत पुजून, सर्वयज्ञपतिं मां वै संसिद्धिं अगमन्—सर्व यज्ञांचा स्वामी असा जो मी त्या मज संसिद्धीला प्राप्त झाले. ६.

जे ज्ञानरूपी धनानें संपन्न व विज्ञानानें परम पावन होऊन ब्रह्मस्वरूपाला पावलेले ब्राह्मण असतात, ते यज्ञ करून माझें भजन करितात. ७२ ते आपल्या हृदयरूपी मंदिरांत विकल्पाची जमीन खणतात व तेथें श्रद्धेच्या आकाराचीं शम, दम, विरक्ति हीं तीन कुंडें रचितात. ७३ त्या कुंडांत क्षर म्ह० सर्व भूतें व अक्षर म्ह० कूटस्थ आत्मा हीं दोन काष्ठें (म्ह० अरणी) गुरुमंत्ररूपी मंथनानें एकावर एक घांसून त्यापासून धुरावांचून तेजस्वी असा सूक्ष्म होमाग्नि उत्पन्न करितात व तो कुंडांत स्थापून पेटवितात. ७४ सत्त्वरूपी तुपांत रज-तम यांनीं मिश्रित अशीं इतर होमद्रव्यें घालून त्यांची वैराग्यरूपी स्रुवेनें (म्ह० होमाच्या पळीनें) आहुति देतात. युक्तिरूपी मंत्र म्हणतात. ७५ नंतर हातांत आत्म-विद्यारूपी लखलखीत शस्त्र घेऊन, संकल्परूपी पशूचा वध करून यज्ञपुरुष जो श्रीपति त्याला आत्मज्ञानानें संतुष्ट करितात. ७६ तेथें पूर्णाहुतीच्या वेळीं जीव-भावाची आहुति दिली असतां यज्ञभोक्ता नारायण परमात्मा तृप्त होतो. ७७ अशा प्रकारें मुनीश्वर माझें यजन करितात व जन्म—मरणांचें निवारण करून माझी सिद्धि करून घेतात. ७८ श्रेष्ठ मुनींनीं जी सिद्धि साध्य करून घेतली, तीच सिद्धि उद्धवाला व्हावी म्हणून कृपा-सागर श्रीकृष्ण प्रपंचाचा निषेध करून वस्तुतत्त्व सांगत आहे. ७९.

त्वय्युद्भवाश्रयति यस्त्रिविधो विकारो मायाऽन्तरा पतति नाद्यपवर्गयोर्यत् ।
जन्मादयोऽस्य यदमी तव तस्य किं स्युराद्यन्तयोर्यदसतोऽस्ति तदेव मध्ये ॥ ७ ॥

मी उद्धव ऐसें म्हणतां । तूं कोण आहेसी तत्त्वतां । ऐक त्या स्वरूपाची कथा । तुज मी आतां सांगेन ॥ ८० ॥ जन्म स्थिति आणि निधन । त्रिविधविकारेंसी त्रिगुण । त्यांची अधिष्ठात्री माया जाण । तिसी चळण तुझेनि ॥ ८१ ॥ मायादि गुणकार्यां समस्तां । तूं आश्रयो पैं सबाह्यता । तुझेनि अंगें यांसी चपळता । तूं यांपरतां चिदात्मा ॥ ८२ ॥ माझेनि गुणकर्मां चळणता । तैं प्रपंचासी आली सत्यता । हें मायामय गा तत्त्वतां । मृगजळता आभास ॥ ८३ ॥ सकळ प्रपंचाचें जें भान । तें तंव मृगजळासमान । दिसे तेंही मिथ्या दर्शन । वस्तुत्वें जाण सत्य नव्हे ॥ ८४ ॥ तूं जन्ममरणापरता । त्रिगुणांतें नातळता । प्रपंचासी अलिप्तता । तुझी तत्त्वतां तूं ऐक ॥ ८५ ॥ तेचि प्रपंचाची अलिप्त युक्ती । ऐशी आहे परम प्रतीती । उत्पत्तिस्थितिप्रळयांतीं । प्रपंचाची वस्ती सत्यत्वें नाहीं ॥ ८६ ॥ उत्पत्तिआदीं प्रपंच नसे । अंतीं कांहीं उरला न दिसे । मध्यें जो कांहीं आभासे । तो मायावशें मिथ्याभूत ॥ ८७ ॥ प्रपंचाआदीं परब्रह्म । अंतीं तेंचि उरे निरुपम । मध्यें स्थितिकाळीं तेंचि ब्रह्म । मिथ्या भवभ्रम भ्रांतासी ॥ ८८ ॥ सूर्याआदीं मृगजळ नसे । अस्तमानीं उरलें न दिसे । मध्यें जें कांहीं

—त्याच ज्ञानाचा संक्षेपतः उपदेश करितात—

उद्धव—हे उद्धवा ! त्वयि यः त्रिविधः विकारः आश्रयति सा माया—तुझ्या ठिकाणीं जो आध्यात्मिकादि त्रिविध विकार प्रतीत होतो, ती माया आहे, (परमार्थ नव्हे,) यत् अंतरापतति—कारण तो विकार मध्येंच प्राप्त होतो, न आद्यपवर्गयोः—रज्जूंतील सर्पमालादि विकारांप्रमाणें पूर्व व उत्तर अवस्थेंत तो नसतो, (अतः) यत् अस्य अमी जन्मादयः स्युः तस्य तव किं—म्हणून जेव्हां या विकाराचे हे जन्मादि भाव होतात, तेव्हां त्या तुज अधिष्ठानभूत आत्म्याला काय आहे ! (तुला त्या जन्मादिकांतील कांहीं नाहीं. वस्तुतः त्या विकारांनाहि अतत्त्व असल्यामुळें जन्मादिक त्यालाहि नाहींत, असें सांगतात.) असतः आद्यन्तयोः यत् अस्ति तत् एव मध्ये—सर्पादि असत् वस्तूंच्या आभासापूर्वीं व त्यांची निवृत्ति झाल्यावर जें रज्वादि तत्त्व असतें, तेंच मध्येंहि असतें. आरोपित सर्पादि केव्हांहि नसतें. [त्याच न्यायानें हा विकारहि वस्तुतः नाहीं किंवा उत्पत्तीच्या पूर्वीं व नाशानंतर जें असतें तें मध्येंहि असतेंच. त्याला जन्मादिक नाहीं, त्यामुळें तूं निर्विकार ब्रह्म आहेस.] ७.

उद्धवा ! त्या स्वरूपाची तुला कथा सांगतों, ऐक. ८० सत्त्व-रज-तम हे तीन गुण जन्म, स्थिति व मृत्यु या त्रिविध विकारांचें कारण आहेत. (त्रिविध विकार म्ह० देह-इंद्रियें-देवता असेंहि कोणी मानितात) माया त्या त्रिगुणाचें अधिष्ठान आहे आणि तूं त्या मायेला चालन देणारा आहेस. ८१ माया व त्रिगुण यांच्या सर्व कार्यांना अंतर्बाह्य तुझाच आश्रय आहे. तुझ्यामुळेंच तीं चपल झालीं आहेत व तूं त्यांच्याहून भिन्न असा चिदात्मा आहेस. ८२ 'माझ्यामुळें गुणकर्मांना चंचलत्व आलें आहे, असें जर म्हटलें, तर सगळा प्रपंच सत्य मानावा लागेल.' परंतु वास्तविक हें सर्व मिथ्या मायामय असून मृगजलासारखा त्याचा केवळ भास होतो. ८३ सगळ्या प्रपंचाचें जें भान होतें तें खरोखर मृगजळा-सारखेंच मिथ्या आहे. तें स्वरूपतः सत्य नव्हे. ८४ तूं जन्म-मरणाहून वेगळा आहेस. तूं त्रिगुणांना स्पर्शहि करीत नाहींस. प्रपंचाहून अलिप्त आहेस. प्रपंचापासून अलिप्त रहाण्याची तुझी ती युक्ति तूंच तत्त्वतः ऐक. ८५ त्या युक्तीचा पूर्ण अनुभवहि असा आहे कीं, उत्पत्ति, स्थिति व लय यांच्या शेवटीं प्रपंचाचें सत्यत्व दिसत नाहीं. ८६ सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वीं प्रपंच नसतो. सृष्टीच्या अंतानंतर तो रहात नाहीं. मध्यंतरीं काय तो भासतो. पण तो मायामय असल्यामुळें मिथ्या होय. ८७ प्रपंचाच्या उत्पत्तीपूर्वीं केवळ परब्रह्मच असतें व सृष्टीचा लय झाल्यावरहि निरुपम ब्रह्मच उरतें आणि मधल्या स्थितिकाळींहि तेंच ब्रह्म भ्रांत जीवाला प्रपंचरूपानें भासतें. ८८ सूर्योदयाच्या पूर्वीं मृगजळ नसतें. सूर्यास्तानंतरहि तें दिसत नाहीं, माध्यान्हीं जो भास

आभासे । तेथही नसे जळलेश ॥ ८९ ॥ सर्पाआदीं दोरुत्वें दोरू । अंतीं दोरू उरे साचारू । मध्यें भ्रमें भासे सर्पाकारू । तोही दोरू दोररूपें ॥ ९० ॥ यापरी आद्यंतीं विचारितां । वस्तु सत्य प्रपंच मिथ्या । हें उद्धवा जाण तत्त्वतां । वेदशास्त्रार्थां संमत ॥ ९१ ॥ ऐशी या प्रपंचाची घडामोडी । होतां जन्ममरणकोडी । उद्धवा तुज न लागे वोढी । तूं परापरथडीं नित्यमुक्त ॥ ९२ ॥ निर्गुण निःसंग निर्विकार । अज अव्यय अक्षर । ब्रह्म अनंत अपरंपार । तें तूं साचार उद्धवा ॥ ९३ ॥ हे ऐकोनि देवाची गोष्टी । उद्धवें बांधिली शकुनगांठीं । हरिखें आनंदू न जिरे पोटीं । एकला सृष्टीं न समाये ॥ ९४ ॥ तूं ब्रह्म म्हणतां यदुराजें । तेणें हरिखाचेनि फुंजे । उद्धव नाचे स्वानंदभोजें । वैकुंठराज तुष्टले ॥ ९५ ॥ स्वमुखें तुष्टोनि श्रीकृष्ण । मज म्हणे तूं ब्रह्म पूर्ण । आजि मी सभाग्य धन्य धन्य । धांवोनि श्रीचरण वंदिलें ॥ ९६ ॥ तूंचि अंगें परब्रह्म । ऐसें बोलिला मेघश्याम । तेंचि अर्थीचें निजवर्म । उद्धव सप्रेम पूसत ॥ ९७ ॥

उद्धवः उवाच—ज्ञानं विशुद्धं विपुलं यथैतद्वैराग्यविज्ञानयुतं पुराणम् ।
आख्याहि विश्वेश्वर विश्वमूर्ते त्वद्भक्तियोगं च महद्विमृग्यम् ॥ ८ ॥

विष्वक्सेना विश्वेश्वरा । विश्वमूर्ति विश्वंभरा । जणें पाविजे ब्रह्मसाक्षात्कारा । त्या ज्ञाननिर्धारा मज सांग ॥ ९८ ॥ नुसधें सांगती ज्ञान । ते केवळ मूढ जाण । सांग तूं वैराग्ययुक्तिलक्षण । जें छेदी बंधन जीवांचें ॥ ९९ ॥ ज्ञानेंवीण वैराग्य आंधळें । अरडीदरडी आदळे । वैराग्येंवीण ज्ञान पांगळें ।

होतो, त्यांत जलाचा जसा एक थेंबहि नसतो, ८९ किंवा दोरीवर सर्पाचा भास होण्याच्या आधीं दोरीच असते व तो भास नाहींसा झाला म्हणजे शेवटींहि दोरीच उरते. मध्यें जो सर्प भासतो तोहि जसा भ्रामक असतो, ९० त्याप्रमाणें सृष्टीचा आदि व अंत यांचा विचार केला असतां आरंभीं व शेवटीं असणारें ब्रह्म सत्य असून मध्यें भासणारा प्रपंच मिथ्या ठरतो. उद्धवा ! वेदशास्त्राला संमत असलेलें हें विधान तूं अगदीं खरें समज. ९१ अशा या मिथ्या प्रपंचाच्या घडामोडी चालल्या असतां असंख्य जन्म-मरणाचे फेरे होत असतात. पण तुला त्यांचा स्पर्शहि होत नाहीं. कारण तूं प्रवृत्ति व निवृत्ति यांच्या पलीकडे असल्यामुळें नित्यमुक्त आहेस. ९२ उद्धवा ! निर्गुण, निःसंग, निर्विकार अज, अव्यय, अक्षर, अनंत व अपरंपार असें जें ब्रह्म तें तूंच आहेस. ९३ हें श्रीकृष्णाचे भाषण ऐकून उद्धवानें मनांत शकुन गांठ बांधून ठेविली. त्याचा आनंद पोटांत मावेनासा झाला. त्याला सृष्टि राहावयास पुरेनाशी झाली. ९४ श्रीकृष्णानें ‘ तूंच ब्रह्म आहेस ’ असें म्हणतांच उद्धव त्या आनंदाच्या भरांत नाचूं लागला. तें पाहून वैकुंठाचा स्वामी श्रीकृष्ण संतुष्ट झाला. ९५ उद्धव म्हणाला कीं, श्रीकृष्ण संतुष्ट होऊन आपल्या मुखानें मला ‘ तूं पूर्ण ब्रह्म आहेस ’ असें म्हणाला, आज मी खरा भाग्यवान् व धन्य झालों. असें म्हणून त्यानें धांवत जाऊन श्रीकृष्णाच्या चरणांना वंदन केलें. ९६ ‘ तूं स्वतःच परब्रह्म आहेस ’ असें जें श्रीकृष्ण म्हणाला त्याचें वर्म उद्धव प्रेमानें त्यास विचारूं लागला. ९७.

—ज्ञानादिकांचा विशेष जाणण्याची इच्छा करणारा उद्धव प्रश्न करितो—

उद्धवः उवाच—उद्धव म्हणाला,—विश्वेश्वर विश्वमूर्ते—हे सर्वेश्वरा विश्वमूर्ते ! विशुद्धं एतत् वैराग्यविज्ञानयुतं विपुलं पुराणं ज्ञानं महद्विमृग्यं त्वद्भक्तियोगं च यथा भवति तथा आख्याहि—अतिशुद्ध वैराग्य व विज्ञान यांनीं युक्त असें हें सनातन ज्ञान ज्याप्रकारें विपुल होतें व ब्रह्मदेवादिकांकडूनहि प्रार्थिलेला तुझा भक्तियोग ज्याप्रकारें प्राप्त होतो, तो प्रकार सांग. ८.

हे विष्वक्सेना, विश्वेश्वरा, विश्वमूर्ते, विश्वंभरा, श्रीकृष्णा, ज्यायोगें ब्रह्मसाक्षात्कार होईल, असें निश्चित ज्ञान मला सांग. ९८ कारण नुस्तें ज्ञान सांगणारे निव्वळ मूर्ख असतात, हें मी जाणतों. म्हणून तूं मला जीवाचें बंधन तोडणारें वैराग्य व शब्दज्ञान यांसह निश्चित विज्ञान प्राप्त होण्याचा उपाय सांग. ९९ कारण ज्ञानावांचून वैराग्य आंधळें आहे; तें खडक, खिंडार यांवर जाऊन आदळतें. वैराग्यावांचून ज्ञान पांगळें आहे. तें युक्ति जाणतें, पण

युक्ति देखे परी न चले पुरुषार्थ ॥ १०० ॥ विवेक वैराग्य दोनी । प्रवेशल्या हृदयभुवनीं । तीं विषयावस्था निरसूनी । सोहंपणीं जीव वर्ते ॥ १ ॥ जंव ज्ञानासी न भेटे विज्ञान । तंव न निरसे जीवपण । यालागीं सांगावें विज्ञान । जें जीवशिवपण निवारी ॥ २ ॥ असंभावनादोषशून्य । तें बोलिजे शुद्ध ज्ञान । जें विपरीत भावनेवीण । त्यातें सज्ञान 'विपुल' म्हणती ॥ ३ ॥ ऐसें विशुद्ध विपुल ज्ञान । तद्युक्त वैराग्य विज्ञान । त्यामाजींही श्रेष्ठ तुझें भजन । कृपा करून सांगिजे ॥ ४ ॥ ज्ञानविज्ञानवैराग्यस्थिती । जुनाट तुझी भगवद्भक्ती । मज सांगावी सुनिश्चितीं । कृपामूर्ति श्रीकृष्णा ॥ ५ ॥ तुझे उत्तमभक्तिकारणें । साधु पडले गवेषणें । धरणें बैसले जीवें प्राणें । ते भक्ति सांगणें मजलागीं ॥ ६ ॥ तुझी करितां उत्तम भक्ती । त्रिविध ताप क्षया जाती । आपुली लाभे निजमुक्ती । उद्धवू ते अर्थीं विनवित ॥ ७ ॥

> तापत्रयेणाभिहतस्य घोरे सन्तप्यमानस्य भवाध्वनीश ।
> पश्यामि नान्यच्छरणं तवाङ्घ्रिद्वन्द्वातपत्रादमृताभिवर्षात् ॥ ९ ॥

जे त्रिविध तापें तापले । जे कामक्रोधीं जर्जर केले । आशातृष्णा विसंचिले । जे निबुजले जन्ममरणें ॥ ८ ॥ संसारमार्ग अतिघोर । दुःखें नुल्लंघवे दुस्तर । ऐसे श्रमले जे नर । त्यांसी निजछत्र हरिपादपद्म ॥ ९ ॥ तुझ्या चरणारविंदापरतें । शरण्य न देखों आणिकांतें । यालागीं कायावाचाचित्तें । शरण भावार्थें तुज आलों ॥ ११० ॥ छत्र निवारी केवळ ताप । चरणछत्राचें भिन्न रूप । त्रिविध तापेंसीं संताप । निरसोनि निष्पाप करी जन ॥ ११ ॥ एक शरण निजचित्तें । एकवैरें मिसळले तूं तें ।

त्याच्याकडून पुरुषार्थ होत नाहीं. १०० म्हणून हृदयमंदिरांत विवेक व वैराग्य या दोहोंचा जेव्हां प्रवेश होतो, तेव्हां विषयांचें निरसन करून जीव 'सोहं' म्ह० ब्रह्मरूप होऊन रहातो. १ जोंपर्यंत ज्ञानाला विज्ञानाची जोड मिळत नाहीं, तोंपर्यंत 'जीवपणा-' ची भावना जात नाहीं. यास्तव जीव-शिवपणाचें निरसन करणारें विज्ञान मला सांग. २ ज्यांत असंभावनेचा लेशहि नसतो, त्यास 'शुद्ध ज्ञान' म्हणतात. ज्यांत विपरीत भावना नसते, त्यास विद्वान् लोक 'विपुल ज्ञान' म्हणतात. ३ असें विशुद्ध विपुलज्ञान आणि त्यांनीं युक्त असें वैराग्य व विज्ञान त्या सर्वांमध्येंहि श्रेष्ठ असें तुझें जें भजन तें कृपा करून मला सांग. ४ हे कृपाळु श्रीकृष्णा ! ज्ञान, विज्ञान, वैराग्य व तुझी सनातन भगवद्भक्ति निश्चितपणानें मला सांग. ५ ज्या तुझ्या उत्तम भक्तीसाठीं साधु शोध करीत हिंडत असतात व ते जीवाभावानें धरणें धरून बसतात ती तुझी भक्ति मला सांग. ६ तुझी उत्तम भक्ति केली असतां त्रिविध तापांचा क्षय होतो व मुक्ति अनायासानें लाभते; म्हणून उद्धव ही विनंति करीत आहे. १०७.

—आतां भक्तियोग ब्रह्मदेवादिकांनाहि प्रार्थनीय कसा आहे तें सांगतात—

ईश तापत्रयेण अभिहतस्य घोरे भवाध्वनि संतप्यमानस्य तवाङ्घ्रिद्वन्द्वातपत्रात् आमृतभिवर्षात् अन्यत् शरणं न पश्यामि–हे भगवन्, आध्यात्मादि तापत्रयानें व्याकुल झालेल्या व या घोर संसारमार्गांत संतप्त होणाऱ्या पुरुषाचें चरणद्वयरूप तुझ्या छत्राहून व अमृताचा वर्षाव करणाऱ्या चरणद्वंद्वाहून निराळें शरण म्ह० रक्षण करणारें दुसरें कांहीं मला दिसत नाहीं. ९.

जे लोक त्रिविध तापानें त्रस्त झालेले, काम-क्रोधांनीं जर्जर केलेले, आशा-तृष्णा यांनीं भरलेले व जन्ममरणांत गुरफटलेले असतात; ८ जे संसाराचा अत्यंत बिकट मार्ग मोठ्या कष्टानेंहि आक्रमण करण्यास समर्थ नसतात; त्यांस हरीच्या चरणकमलाचाच शीतल आश्रय आहे. ९ तुझ्या पदकमलापेक्षां अधिक श्रेष्ठ व शरण जाण्यास योग्य असें दुसरें स्थानच नाहीं. म्हणून मी भक्तिभावानें काया-वाचा-मनानें तुला शरण आलों आहें. ११० छत्र केवळ सूर्याच्या तापाचेंच निवारण करितें; परंतु तुझें चरणरूपी छत्र त्रिविध तापांचा नाश करून लोकांना निष्पाप करितें. ११ कोणी केवळ मनानेंच तुला शरण येतात तर कोणी तुझ्याशीं विरोधिभक्तीनें समरस होतात; कोणी भक्तिभावानें भजन करितात तर कोणी भयानें व्याकुळ होऊन तुझें स्मरण करितात; १२ कोणी तुझ्या कुळांत जन्म

एक ते भजनभावार्थें । एक ते भयार्ते स्मरले तूतें ॥ १२ ॥ एक ते सुहृदत्वें सगोत्र । एकाचें केवळ स्नेहसूत्र । एका अंगसंग कामतंत्र । एक आज्ञाधारक नेमस्त ॥ १३ ॥ एवं नानापरी विचित्र । जिंहीं ठाकिलें चरणछत्र । भवभय जें महाघोर । तें त्यांसमोर हों न शके ॥ १४ ॥ भक्त वैरी आणि सुहृद । अवघ्यां देणें निज ऐक्यपद । ऐसें उदारता अगाध । तूं स्वानंदबोध सर्वांचा ॥ १५ ॥ होम दीजे अग्नीवरी । तें अग्नी आपुल्याऐसें करी । मा अवचटें पडल्यावरी । तेंही करी तैसेंची ॥ १६ ॥ एवं नानायोगें गोविंदा । जे मीनले तुझिया संबंधा । त्यांची निरसोनि संचारबाधा । समत्वें निजपदा तूं नेसी ॥ १७ ॥ त्या तुझें चरणछत्र येथें । निवारी त्रिविध तापांतें । सदा वर्षे परमामृतें । शरण चरणांतें यालागीं ॥ १८ ॥ ज्या संसारभयाभेण । तुझ्या चरणा आलों शरण । त्या भवभयाचें निरूपण । उद्धव आपण सांगत ॥ १९ ॥

दृष्टं जनं संपतितं बिलेऽस्मिन् कालाहिना क्षुद्रसुखोरुतर्षम् ।
समुद्धरैनं कृपयापवर्ग्यैर्वचोभिरासिंच महानुभाव ॥ १० ॥

संसारकुहरामाजीं जन । गृहदाराकूपीं पडले जाण । याहीमाजीं दुःख गहन । काळसर्पें दारुण डंखिलें ॥ १२० ॥ त्या काळसर्पाचें विख । क्षणक्षणां चढे देख । अभिमानें भुलले लोक । विषयसुख वांछिती ॥ २१ ॥ नवल काळसर्पाचा पडिपाडू । विषयप्राय विषय केले गोडू । गोडांचा गोड परमार्थ द्वडू । तो केला कडू जीवेंभावें ॥ २२ ॥ विखाहूनि विषय अधिक । विख एक वेळां मारक । विषयो पुनःपुनः घातक । काळसर्पें लोक भुलविले ॥ २३ ॥ विषय तो केवळ विख । त्यालागीं भुलले मूर्ख ।

घेऊन तुझे सुहृद् बनले, कोणी प्रेमामुळें तुझ्याशीं स्नेहबद्ध झाले, कोणी कामासक्त होऊन तुझा संग करितात, तर कोणी केवल आज्ञाधारक होऊन रहातात. १३ याप्रमाणें नाना प्रकारानें ज्यांनीं तुझ्या चरणरूपी छत्राचा आश्रय केला, त्यांच्यापुढें महाघोर संसारभय उभेंहि रहात नाहीं. १४ तुझा भक्त असो, वैरी असो किंवा सुहृद् असो त्या सर्वांनाहि तूं आपलें पद देतोस. हें तुझें केवढें अगाध औदार्य ! तूं सर्वांना स्वानंदबोध देणारा आहेस. १५ अग्नीमध्यें ज्याचा होम करावा, त्या वस्तूला अग्नि स्वतःशीं एकरूप करून टाकितो आणि अकस्मात् जरी कांहीं अग्नींत पडलें, तरी त्याचीहि तीच स्थिति होते. १६ अशाप्रकारें हे गोविंदा ! ज्यांचा तुझ्याशीं निरनिराळ्या हेतूंनीं संबंध येतो त्या सर्वांची संसारबाधा नाहींशीं करून तूं त्यांना समत्वानें आत्मपदाला नेऊन पोंचवितोस. १७ अशा तुझें हें चरणरूपी छत्र त्रिविध तापांचा नाश करून परम अमृताचा सतत वर्षाव करितें. म्हणून मी तुझ्या चरणांना शरण आहें. १८ ज्या संसारभयाच्या भीतीनें तुझ्या चरणांना शरण आलों त्या संसार भयाचें वर्णन उद्धव स्वतःच करीत आहे. ११९.

—अति कृपा उत्पन्न करणारा उद्धव म्हणतो—

महानुभाव—हे प्रभावशाली ईश्वरा ! अस्मिन् बिले संपतितं कालाहिना दष्टं क्षुद्रसुखोरुतर्षम् एनं जनं कृपया समुद्धर—या संसारकूपामध्यें पडलेल्या, त्यांतच कालरूपी सर्पानें दंश केलेल्या व असें असूनहि क्षुद्र विषयसुखांत आसक्त असलेल्या या जनाचा कृपेनें उद्धार कर. [त्रिविध तापानें संतप्त होणाऱ्या याचा उद्धार कसा करावा ! म्हणून म्हणशील तर सांगतों—] आपवर्ग्यैः वचोभिः आसिंच—मोक्षबोधक अमृतवचनांचा वर्षाव कर. १०.

हे सर्व लोक संसाररूपी दरींत सांपडून घर-दार, स्त्री-पुत्र, एतद्रूप खोल विहिरींत पडतात. येथें त्यांस काळरूपी सर्प कडकडून दंश करितो. १२० त्या काळरूपी सर्पाचें विष क्षणोक्षणीं चढत असतें. तेव्हां ते अभिमानानें भ्रांत झालेले लोक विषयसुख इच्छितात. २१ काळसर्पाचा प्रभाव काय विलक्षण असतो. पहा ! तो विषासारखे कडू असलेले विषयहि गोड भासवितो आणि गोडांतीलहि गोड असा असा परमार्थ त्यांस जीवा-भावानें कडु वाटतो. २२ विषय विषाहूनहि जास्त भयंकर आहेत. कारण विष एकदाच काय तें घात करितें, पण विषय पुनःपुनः घात करणारा आहे. तरीहि या काळसर्पानें लोकांना कशी भुरळ घातली जाहे, पहा ! २३

विषयांची तृष्णा देख । अधिकाधिक वाढती ॥ २४ ॥ ऐसें दुःखनिमग्न जे जन । त्यांचें करावें उद्धरण । म्हणशील हे करिती साधन । तें उद्धरण करीन मी ॥ २५ ॥ स्वामि तुझी कृपा न होतां । कोट्यानुकोटी साधन तें वृथा । तुझी कृपा जाहलिया अच्युता । भवव्यथा स्पर्शेना ॥ २६ ॥ ऐकें कृपाळुवा श्रीअनंता । तुझ्या मोक्षफळरूप ज्या कथा । तेणें अमृतें शिंपोनि कृष्णनाथा । जनां समस्तां उद्धरीं ॥ २७ ॥ तुझे मुखींचें कथापीयूख । बिंदुमात्र लाभतां देख । भवसर्पाचें उतरे विख । उपजवी सुख स्वानंदें ॥ २८ ॥ सकळ जनांच्या विषयीं । म्हणसी आग्रह कां तुझ्या ठायीं । जन मातें प्रार्थित नाहीं । देवा ऐसें कांहीं कल्पिसी ॥ २९ ॥ आंधळें अंधकूपीं पडतां । देखणेनीं लावावें सत्पथा । तेवीं ज्ञानांध दुःखीं बुडतां । उद्धरावया तत्वतां मी प्रार्थितसें ॥ १३० ॥ जन अंध कां जाहले म्हणसी । संसारसर्पें ग्रासिलें त्यांसी । यालागीं विसरोनि निजसुखासी । विषयसुखासी लोधले ॥ ३१ ॥ ऐशिया दीनांतें श्रीअनंता । कृपेनें उद्धरावें तत्वतां । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । श्रीकृष्णनाथा प्रार्थिलें ॥ ३२ ॥ ऐकोनि भक्तांची विनंती । संतोषला भक्तपती । उत्तम सभेची ज्ञानस्थिती । उद्धवाप्रती सांगेल ॥ ३३ ॥ जे सभेसी मुख्यत्वें हृषीकेशी । देवर्षि आणि ब्रह्मर्षि । तेथ मीनले राजर्षि । तपोराशी ज्ञान निधी ॥ ३४ ॥ ते सभेचा ज्ञानमथितार्थ । उद्धवासी सांगेल श्रीकृष्णनाथ । श्रोतीं अवधान द्यावें तेथ । एका विनवीत जनार्दनु ॥ ३५ ॥ ज्ञान आणि पुरातन । वक्ता भगवंत आपण । श्रोता उद्धव सावधान । काय श्रीकृष्ण बोलिला ॥ ३६ ॥

मूर्ख लोक त्याला भाळतात व त्यांची विषयांवरील तृष्णा जास्त जास्त वाढत जाते. २४ असे जें दुःखांत निमग्न झालेले लोक असतात, त्यांचा उद्धार करावा. यावर तूं कदाचित् असें म्हणशील कीं, ते लोक जर साधनाचें आचारण करितील तर मी त्यांचा उद्धार करीन. २५ तर हे प्रभो श्रीकृष्णा ! तुझ्या कृपेवांचून कोट्यवधि साधनें व्यर्थ आहेत. हे अच्युता ! एकदां साधकावर तुझी कृपा झाली कीं, त्याला संसारबाधा स्पर्शहि करीत नाहीं. २६ हे परम कृपालु श्रीकृष्णनाथा ! तुझ्या मोक्षरूपी फल देणाऱ्या ज्या कथा आहेत, त्या कथारूपी अमृतसिंचनानें सर्व लोकांचा तूं उद्धार करावास. २७ तुझ्या मुखांतील त्या कथामृताचा एक थेंब जरी मिळाला, तरी त्यानें संसाररूपी सर्पाचें विष उतरतें व स्वानंदसुख प्राप्त होतें. २८ हे देवा ! तूं म्हणशील कीं, सगळ्या लोकांच्यासाठीं तुझा उगाच आग्रह कां ! लोक कांहीं त्यासाठीं माझी कधीं प्रार्थना करीत नाहींत. (तर त्याचें उत्तर ऐक.) २९ एखादा आंधळा जर खोल विहिरींत पडलेला दिसला, तर पाहणारानें त्याला वर काढून सरळ मार्गाला लावावें, हें जसें त्याचें कर्तव्य आहे, त्याचप्रमाणें हे ज्ञानांध जन म्ह० ज्ञान पहाण्यास असमर्थ असलेले लोक दुःखांत बुडालेले पाहून त्यांचा उद्धार करण्यासाठीं मी तुझी प्रार्थना करीत आहें. १३० हे लोक असे अंध कां होतात असें जर म्हणशील तर संसाररूपी सर्पानें त्यांना गिळिल्यामुळें ते आत्मसुखाला विसरून विषयसुखावर लुब्ध होतात. ३१ म्हणून हे अनंता ! या दीनजनांवर कृपा करून त्यांचा उद्धार करावा. उद्धवानें असें बोलून श्रीकृष्णाच्या चरणांवर मस्तक ठेविलें व त्याची प्रार्थना केली. ३२ ही भक्ताची विनंति ऐकून तो भक्तांचा स्वामी संतुष्ट झाला व त्यानें उद्धवाला उत्तम सभेंतील ज्ञान सांगण्यास आरंभ केला. ३३ त्या सभेंत देवर्षि, ब्रह्मर्षि, राजर्षि तपोनिष्ठ व श्रेष्ठ ज्ञानी जमले होते. ३४ त्या सभेंतील ज्ञानाचा निर्णय श्रीकृष्णनाथ उद्धवाला सांगत आहे. तरी श्रोत्यांनीं लक्ष द्यावें, असें एकनाथ-जनार्दन विनवीत आहे. ३५ ज्ञान आणि तेंहि पुरातन, भगवाना-सारखा वक्ता व उद्धवासारखा सावधान श्रोता, तेव्हां त्याचें वर्णन काय करावें ! आतां श्रीकृष्ण काय बोलला तें ऐका. १३६.

श्री० भ०—इत्थमेतत्पुरा राजा भीष्मं धर्मभृतां वरम् । अजातशत्रुः पप्रच्छ सर्वेषां नो नु शृण्वताम् ॥ ११ ॥

तुवां पुशिलें जैशा रीतीं । तैसियाची गा उपपत्ती । धर्में पुशिलें भीष्माप्रती । देहांतीं शरपंजरीं ॥ ३७ ॥ ऐक त्या धर्माची थोरी । ज्यासी शत्रु नाहीं संसारीं । सत्यवादी निजनिर्धारीं । जो ऋषिमंत्रीं जन्मला ॥ ३८ ॥ करावया पांडवनिर्दळण । वज्रदेही व्हावया आपण । धर्म पुसतां दुर्योधन । धर्म असत्य वचन न बोले ॥ ३९ ॥ ऐसा राजा युधिष्ठिर । निर्मत्सर परम पवित्र । तेणें करूनि अत्यादर । भीष्म महावीर विनविला ॥ १४० ॥ जो परम धार्मिक निजनिर्धारीं । जो स्वधर्मनियमें व्रतधारी । जो यावज्जन्म ब्रह्मचारी । जो महाशूरीं वंदिजे ॥ ४१ ॥ न मोडतां गुरुत्वाची पायरी । जो परशुरामेंसीं युद्ध करी । परी काशीश्वराची कुमरी । जो न करीच नोवरी ब्रह्मचर्यें ॥ ४२ ॥ धनुर्विद्येसी गुरु परशुराम । तो रणीं जिंतिला करूनि नेम । तेणें संतोषोनि परम । आपुलें नाम आंकणां घातलें ॥ ४३ ॥ अधिक संतुष्टे परशुराम । माझ्या ब्रह्मचर्याचा व्रतनेम । भीष्मा तुज कदा बाधिना काम । वर परम दीधला ॥ ४४ ॥ जनकसंतोषाकारणें । आपुलें तारुण्य दीधलें जेणें । वार्धक्य घेऊनि आपणें । सुखी करणें शंतनू ॥ ४५ ॥ पितयें दीधलें आशीर्वादा । ऐक भीष्मा अतिप्रबुद्धा । वार्धकीं क्षीणशक्तीची आपदा । ते तुज कदा बाधेना ॥ ४६ ॥ यालागीं जंव जंव म्हातारपण । तंव तंव त्याचा प्रताप गहन । काळाची शक्ति खुंटली जाण । न करवे क्षीण भीष्मासी ॥ ४७ ॥ यालागीं तोडरीं काळ काम । आंकणां रिघाला परशुराम । हाचि धर्मिष्ठीं वरिष्ठ धर्म । हें साजे नाम भीष्मासी ॥ ४८ ॥ ज्याचिये

——उद्धवाच्या विश्वासासाठीं विद्वत्सभेमध्यें निश्चित झालेला अर्थच मी सांगेन अशा आशयानें——

श्रीभगवान् उवाच—श्रीभगवान् म्हणाला, पुरा राजा अजातशत्रुः नः सर्वेषां शृण्वतां नु धर्मभृतां वरं भीष्मं इत्थं एतत् पप्रच्छ—पूर्वी राजा युधिष्ठिर आम्ही सर्व ऐकत असतां धर्मधारण करणाऱ्यांतील श्रेष्ठ अशा भीष्माचार्याला हें असेंच विचारिता झाला. ११.

हे उद्धवा ! तूं मला ज्या प्रकारचा प्रश्न विचारिलास, तसेंच ज्ञान धर्मराजानें भीष्माचार्य शरपंजरीं मरणोन्मुख होऊन पडले असतां त्यांस विचारिलें होतें. ३७ त्या धर्मराजाची केवढी थोरवी होती, पहा ! ३७ त्याला संसारांत कोणी शत्रु नव्हता. तो स्वतःच्या निश्चयानें सत्यवक्ता होता व दुर्वासऋषींच्या मंत्रानें त्याचा जन्म झाला होता. ३८ पांडवांचाच नाश करण्याच्या इच्छेनें दुर्योधनानें धर्माला वज्रदेही होण्याचा उपाय विचारिला असतां तो त्या प्रसंगींहि असत्य बोलला नाहीं. ३९ अशा मत्सरशून्य, परम पवित्र राजा युधिष्ठिरानें अत्यंत आदरानें आपला शूर पितामह जो भीष्माचार्य त्यास विनंति केली. (या प्रसंगाचें बहारीचें वर्णन श्रीमद्भागवताच्या पहिल्या स्कंधाच्या नवव्या अध्यायांत आहे.) १४० तो आपल्या निर्धारानें परम धार्मिक, स्वधर्मानुसार व्रताचें पालन करणारा, यावज्जन्म ब्रह्मचारी व मोठ्या वीरांनाहि वंदनीय होता. ४१ त्यानें गुरुत्वाची मर्यादा राखून परशुरामाबरोबर युद्ध केलें, परंतु आपली ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा राखण्यासाठीं काशीराजाच्या कन्येबरोबर विवाह केला नाहीं; ४२ धनुर्विद्येंत परशुराम त्यांचा गुरु होता, परंतु त्यांसहि त्यानें रणांगणांत पण लावून जिंकिलें. त्यामुळें परशुरामानें संतुष्ट होऊन त्यास आपल्या नांवानें युक्त असलेला पायांत घालावयाचा पराक्रमसूचक बिरुद नांवाचा अलंकार दिला. ४३ भीष्मानें आपला पिता जो शंतनु राजा त्याच्या संतोषासाठीं आपलें तारुण्य त्यास अर्पण केलें. ४४ त्याचा वृद्धपणा आपण स्वीकारिला व त्यास सुखी केलें. ४५ त्यावेळीं पित्यानें त्यास असा आशीर्वाद दिला कीं, ' हे अत्यंत बुद्धिमान् भीष्मा, वृद्धपणांत तुझी शक्ति कधींहि क्षीण होणार नाहीं. ' ४६ पित्याच्या या आशीर्वादामुळें भीष्माचार्य जसे जसे वृद्ध होत गेले, तसा तसा त्यांचा पराक्रम वाढत गेला. त्यामुळें काळाची शक्ति खुंटली, तो भीष्माचार्यास क्षीण करूं शकला नाहीं. ४७ त्यामुळें काळ आणि काम हे दोघे त्याच्या पायांतील भूषणें आणि परशुराम त्याचें बिरुद झाला. धार्मिकांचा श्रेष्ठधर्म हाच होय. ' भीष्म ' हें नांव त्यालाच शोभलें. ४८ ज्याच्या दृढ प्रतिज्ञेपुढें

प्रतिज्ञेच्या निर्धारीं । देवासी लावूनियां हारी । निःशस्त्रा करी शस्त्रधारी । एवढी थोरी प्रतिज्ञेची ॥ ४९ ॥ न मोडतां भजनमर्यादा । युद्धीं मिसळोनि गोविंदा । हारी लावूनियां मुकुंदा । चरणारविंदा लागला ॥ १५० ॥ आण वाहूनि निर्धारीं । शस्त्रास्त्रें सांडिलीं दूरीं । पुढती बाण भेदितां जिव्हारीं । शस्त्र करीं न धरीच ॥ ५१ ॥ बाणीं कडतरलें जिव्हार । विकळता देखोनि थोर । भीष्में करूनि निजनिर्धार । जाहला तत्पर देहत्यागा ॥ ५२ ॥ हें दक्षिणायन अतिघोर । भीष्में ऐकतां उत्तर । काळासी करूनियां दूर । स्वशरीर राखिलें ॥ ५३ ॥ मग निजात्मनिर्धारीं । भीष्म पहुडे शरपंजरीं । त्यातें युधिष्ठिर प्रश्न करी । महाऋषीश्वरीं परिवारिला ॥ ५४ ॥ आम्हां सकळां देखतां । जाहला युधिष्ठिर पुसता । तेचि पुरातन कथा । तुज मी आतां सांगेन ॥ ५५ ॥

निवृत्ते भारते युद्धे सुहृन्निधनविह्वलः । श्रुत्वा धर्मान् बहून्पश्चान्मोक्षधर्मानपृच्छत ॥ १२ ॥

मी संधि करितां श्रीकृष्ण । तें न मनीच दुर्योधन । व्यास वर्जितां आपण । तरी दृप्तपण युद्धासी ॥ ५६ ॥ एवं दैवबळें कुरुक्षेत्रीं । कौरवापांडवां झुंजारीं । सापत्न दुर्योधनादि वैरी । सपरिवारीं मारिले ॥ ५७ ॥ युद्ध निवर्तल्यापाठीं । धर्म बैसल्या राज्यपाटीं । तेणें अभिमान घेतला पोटीं । महादोषी सृष्टीं मी एक ॥ ५८ ॥ मी राज्यीं बैसतां आपण । म्हणे म्यां मारिला गुरुब्राह्मण । म्यां मारिला कर्ण दुःशासन । राजा दुर्योधन म्यां मारिला ॥ ५९ ॥ उत्पत्तिस्थितिप्रलयकर्ता । येथ ईश्वरू जाण तत्त्वतां । तें सांडोनियां सर्वथा । 'अहं कर्ता' म्हणे धर्म ॥ १६० ॥ देहाभिमानाचे खटाटोपीं । थोर होऊनियां अनुतापी । गोत्रहंता मी महापापी । ऐसें आरोपी निजमाथां ॥ ६१ ॥ त्यासी द्यावया समाधान । समयो भीष्माचें

श्रीकृष्णालाहि हार खावी लागली व त्या निःशस्त्र देवालाहि त्यानें शस्त्र धरावयास लाविलें. एवढी त्याच्या प्रतिज्ञेची थोरवी आहे. ४९ भजनाच्या मर्यादेचें उल्लंघन न करितां त्यानें युद्धांत श्रीकृष्णाचा पराजय करून तो त्याच्या चरणीं लीन झाला. १५० नंतर निर्वाणीची शपथ वाहून त्यानें हातांतील शस्त्रें दूर फेंकून दिलीं व शत्रूच्या बाणांनीं मर्मच्छेद जरी केला, तरी त्यानें पुनः हातांत शस्त्र धरिलें नाहीं. ५१ बाणांनीं आपलीं मर्मस्थानें छिन्न-भिन्न झालीं आहेत व देह अतिशय व्याकुळ झाला आहे, असें पाहून भीष्माचार्य निर्धारानें देहत्यागाला तयार झाले. ५२ परंतु दक्षिणायनांत प्राणोत्क्रमण करणाऱ्या जीवाला अतिशय भयंकर मार्ग आक्रमण करावा लागतो, हें जाणून भीष्माचार्यानें काळाला दूर सारिलें व स्वशरीर राखिलें. ५३ अशा आत्मनिश्चयानें भीष्म शरपंजरीं पडले होते, तेव्हां श्रेष्ठ ऋषींच्या परिवारांत ५४ आम्हां सर्वांच्या देखत युधिष्ठिरानें त्यांस प्रश्न केला. तीच पुरातन कथा मी तुला आतां सांगत आहें. १५५.

भारते युद्धे निवृत्ते–भारत युद्ध होऊन गेलें असतां, **सुहृन्निधनविह्वलः**-आपल्या आप्तांच्या मरणामुळें विह्वल झालेला धर्मराज, **बहून् धर्मान् श्रुत्वा**–राजधर्मादि अनेक धर्म ऐकून, **पश्चात् मोक्षधर्मान् अपृच्छत**–शेवटीं मोक्षधर्म विचारिता झाला. १२.

मी श्रीकृष्ण शिष्टाई करावयास गेलों असतां दुर्योधनानें तें मान्य केलें नाहीं. स्वतः व्यासानें त्याचा निषेध केला, तरीहि तो गर्वानें युद्धाला उभा राहिला. ५६ अशा दुर्दैवामुळें कुरुक्षेत्रांत पांडव व कौरव यांचें तुमुल युद्ध होऊन अखेर दुर्योधनादि शत्रूंचा सर्व परिवारासह संहार झाला. ५७ युद्ध संपल्यावर धर्मराज सिंहासनावर बसला, तेव्हां त्याच्या मनांत असा देहाभिमान उत्पन्न झाला कीं, सगळ्या सृष्टींत मीच काय तो अत्यंत पातकी आहें. ५८ तो म्हणाला कीं, मीं या राज्यपदासाठीं गुरु- ब्राह्मणांचा वध केला. कर्ण-दुःशासन, राजा दुर्योधन यांना मारिलें. ५९ सर्व सृष्टीचे उत्पत्ति-स्थिति-लय करणारा खरोखर ईश्वर आहे. पण धर्मानें तो विचार सोडून स्वतःकडेच कर्तृत्व घेतलें व 'अहं कर्ता' म्ह० मी या सर्वांचा कर्ता आहें, असें तो समजूं लागला. १६० या देहाभिमानाच्या अभिनिवेशानें तो पश्चात्ताप करूं लागला ६१ व मी सगळ्या कुलाचा घात करणारा महापातकी आहें, असा आरोप स्वतःच्याच

निर्याण । तेथें म्यां नेऊनियां जाण । धर्में केले प्रश्न ते ऐका ॥ ६२ ॥ राजधर्म दानधर्म । पुशिला तेणें आपद्धर्म । मुख्यत्वें पुशिला मोक्षधर्म । उत्तमोत्तम परियेसीं ॥ ६३ ॥

तानहं तेऽभिधास्यामि देवव्रतमुखाच्छ्रुतान् । ज्ञानवैराग्यविज्ञानश्रद्धाभक्त्युपबृंहितान् ॥ १३ ॥

ते भीष्ममुखींचे मोक्षधर्म । म्यां परिशिले अतिउत्तम । जे निरसिती भवभ्रम । सकळ कर्मदाहक ॥ ६४ ॥ ज्ञान विज्ञान श्रद्धा भक्ती । अनित्य नासे वैराग्यस्थिती । भीष्में सांगीतली धर्माप्रती । ते मी निश्चितीं सांगेन ॥ ६५ ॥ म्हणणें भीष्मासी 'देवव्रत' । तेणें देवावरी ठेवूनि चित्त । शरपंजरीं सुनिश्चित । निजात्मयुक्त पहुडला ॥ ६६ ॥ तेणें सांगीतला मोक्षधर्म । त्यांत मुख्यत्वें ज्ञान प्रथम । तें ज्ञान सांगे पुरुषोत्तम । अतिउत्तम अवधारीं ॥ ६७ ॥

नवैकादश पंच त्रीन् भावान् भूतेषु येन वै । ईक्षेताथैकमप्येषु तज्ज्ञानं मम निश्चितम् ॥ १४ ॥

प्रकृति पुरुष महत्तत्त्व । पंचतन्मात्रा सूक्ष्मस्वभाव । अहंकारें सगट नव । तत्त्ववैभव हे संख्या ॥ ६८ ॥ एकादश बोलिजे तें तें । अकराही इंद्रियें येथें । पंच ते पंचमहाभूतें । तीनी ते निश्चित तीन गुण ॥ ६९ ॥ हे तत्त्वसंख्या उणखूण । गणितां अठ्ठावीस जाण । इयें सर्व भूतीं समसमान । तत्त्वें जाण वर्तती ॥ १७० ॥ हिरण्यगर्भादि स्थावरांत । तत्त्वें समान गा समस्त । अधिक उणें नाहीं येथ ।

शिरावर करूं लागला. तेव्हां त्याच्या मनाला समाधान होण्यासाठीं भीष्माच्या देहावसानाच्या वेळीं मीं धर्माला त्यांच्यापाशीं नेलें. त्या वेळीं धर्मानें त्यांस जे प्रश्न केले, ते ऐक. ६२ त्यानें राजधर्म, दानधर्म, आपद्धर्म व मुख्यतः सर्वांत श्रेष्ठ असा मोक्षधर्म विचारिला. तो ऐक. १६३.

देवव्रतमुखात् श्रुतान् ज्ञानवैराग्यविज्ञानश्रद्धाभक्त्युपबृंहितान् तान् अहं ते अभिधास्यामि—भीष्माच्या तोंडून ऐकलेल्या आणि ज्ञान, वैराग्य, विज्ञान, श्रद्धा व भक्ति यांनीं युक्त असलेल्या त्या धर्मांचेंच मी तुला कथन करीन. १३.

ते संसारभ्रम घालविणारे व कर्मांला जाळून टाकणारे श्रेष्ठ मोक्षधर्म मीं भीष्माचार्यांच्या मुखानें ऐकिले. ६४ ज्ञान, विज्ञान, श्रद्धा, भक्ति, अनित्य वस्तूंची नश्वरता व वैराग्यस्थिति यांविषयीं भीष्मानें धर्माला जें सांगितलें, तेंच मी तुला निश्चितपणें सांगतों. ६५ भीष्माला देवव्रत असें म्हणतात. त्यानें देवाकडे मन लाविलें व तो स्वस्थ चित्तानें व दृढ निश्चयानें शरपंजरीं पडून राहिला. ६६ त्यानें जे मोक्षधर्म सांगितले, त्यांत मुख्यत्वें करून पहिल्यानें ज्ञान सांगितलें. तेंच अति उत्तम ज्ञान श्रीकृष्ण आतां सांगत आहे, तें ऐका. १६७.

—त्यांतील ज्ञान आगोदर सांगतात—

येन नव एकादश पंच त्रीन् भावान् भूतेषु ईक्षेत वै अथ येन एषु अपि भावेषु एकं ईक्षेत तत् ज्ञानं मम निश्चितं—ज्या ज्ञानानें प्रकृति, पुरुष, महत्, अहंकार व पंचतन्मात्रे मिळून नऊ आणि अकरा इंद्रियें, पांच महाभूतें व तीन गुण, या एकोणीस भावांना म्ह० अठ्ठावीस तत्त्वांना ब्रह्मादि-स्थावरान्त कार्यांमध्यें अनुगत पहातो, त्याचप्रमाणें ज्या ज्ञानानें या भावामध्येंहि एक परमार्थ-तत्त्व अनुगत पहातो. (हें सर्व कार्य-कारणात्मक जगत् परम कारणात्मकच आहे, त्याहून पृथक् नाहीं, असें ज्या ज्ञानानें पहातो,) तेंच निश्चित ज्ञान मला संमत आहे. १४.

प्रकृति, पुरुष, महतत्त्व, पंचतन्मात्रा म्हणजे पांच सूक्ष्म भूतें व अहंकार मिळून तत्त्वांची एकंदर संख्या नऊ होते. ६८ कोणी पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें व मन मिळून तत्त्वांची संख्या अकरा आहे, असें मानितात. अशीं हीं नऊ व अकरा आणि आकाशादि पांच महाभूतें व सत्त्व-रज-तम हे तीन गुण ६९ मिळून एकंदर अठ्ठावीस तत्त्वें होतात. हीं तत्त्वें सर्व भूतांत समान असतात. १७० आब्रह्म-स्तंबपर्यंत सर्व पदार्थांत हीं तत्त्वें सारखीं आहेत. त्यांत मुळींच अधिक उणें नाहीं. [हीं अठ्ठावीस तत्त्वें ब्रह्मदेवापासून स्थावरापर्यंत समान आहेत, असें ज्या

जाण निश्चित उद्धवा ॥ ७१ ॥ तैसेंचि गा जीवचैतन्य । प्रतिबिंबलेंसे समसमान । जें नाम रूप अभिमान । सर्वांसी जाण प्रकाशक ॥ ७२ ॥ थिल्लरीं विहिरीं सागरीं । चंद्र प्रतिबिंब समचि धरी । तेवीं ब्रह्मादि मशकवरी । जीवत्व शरीरीं समसाम्यें ॥ ७३ ॥ भूतें समसमान चैतन्य । एकात्मतां देखणें जाण । या नांव गा शुद्ध ज्ञान । माझाही जाण हा निश्चय ॥ ७४ ॥ आतां विज्ञानाचें लक्षण । तुज मी सांगेन संपूर्ण । ते श्लोकार्धें निरूपण । स्वयें नारायण सांगत ॥ ७५ ॥

एतदेव हि विज्ञानं न तथैकेन येन यत् ॥

उत्तरार्ध ॥ स्थित्युत्पत्त्यप्ययान्पश्येद्भावानां त्रिगुणात्मनाम् ॥ १५ ॥

पूर्वीं देखतेनी स्वभावें । व्यापक वस्तूनि यें सर्वें । व्यापिलीं असती देहादि तत्त्वें । हें मानीं जीवेंभावें निश्चित ॥ ७६ ॥ जेवीं का घटमात्रास । सबाह्य व्यापक आकाश । तेवीं सकळ प्रपंचास । चिदाभास व्यापक ॥ ७७ ॥ ऐसें जें का शुद्ध ज्ञान । तें ज्ञेयप्राप्तीचें कारण । ज्ञेय पावलिया ज्ञान । हारपे जाण वृत्तीसी ॥ ७८ ॥ कां ज्ञानें गम्य वस्तु जे । यालागीं तें ज्ञेय म्हणिजे । ज्ञेय पावलिया ज्ञान लाजे । जेवीं कां सूर्यतेजें खद्योत ॥ ७९ ॥ जळीं रिघाल्या लवण । लवणपणा मुके जाण । तेवीं

ज्ञानानें कळतें व सर्व तत्त्वांमध्यें परमात्मा आहे, असें ज्या ज्ञानानें ज्ञात होतें, तें परोक्ष ज्ञान होय. हें ज्ञान झाल्यावर सर्वत्र ब्रह्मच दिसूं लागलें, म्हणजे तें अपरोक्ष झालें] ७१ तसेंच जीव-चैतन्यहि सम-समान प्रतिबिंबित होतें व तेंच नाम, रूप व अभिमान यांस प्रकाशित करितें. ७२ पाण्याच्या डबक्यांत, विहिरींत किंवा समुद्रांत चंद्राचें प्रतिबिंब जसें एकसारखेंच पडतें, तसेंच ब्रह्मदेवापासून क्षुद्र डांसापर्यंत सर्व शरीरांत जीवत्व सारखेंच असतें. ७३ सर्व भूतांत चैतन्य सारखेंच असल्यामुळें सर्वांचा आत्मा एक आहे, असें समजणें यालाच 'शुद्ध ज्ञान' म्हणतात. माझेंहि असेंच दृढमत आहे. ७४ आतां मी तुला विज्ञानाचें सविस्तर लक्षण सांगतों, ते ऐक. पुढील श्लोकार्धानें त्याचेंच निरूपण स्वतः नारायण सांगत आहे, ७५.

—पुढील अर्ध्या श्लोकानें विज्ञान सांगतात—

यत् येन एकेन (अनुगतान् एकात्मकान् भावान् पूर्वं ऐक्षत) तान् तथा न—जेव्हां ज्या एका तत्त्वानें अनुगत एकात्मक भावाना पूर्वीं पहाता झाला, त्यांना पूर्वींप्रमाणें पाहूं नये, (तर तें एक परम कारण ब्रह्म आहे, असेंच पहावें.) तदा एतत् एव हि विज्ञानं—त्यावेळीं हेंच विज्ञान म्हटलें जातें. (याचा भावार्थ असा—परोक्षज्ञानानें अपरोक्ष भ्रमाची निवृत्ति होत नाहीं, त्यामुळें ब्रह्मात्मक जगत् पाहाणारा तें आत्म्याहून पृथक् आहे असें समजतो; पण अपरोक्ष ज्ञान झालें असतां जीवन्मुक्त बाधित झालेल्या जगालाच संस्कारशेषानें पहातो, म्हणून परोक्ष व अपरोक्ष ज्ञान या अर्थीं ज्ञान व विज्ञान या शब्दांचा उपयोग करितात. कित्येक या श्लोकाची योजना अशी करितात—सर्व कर्मांची अनुवृत्ति व कार्यांचें पृथक् असत्त्व याचें पुढील दीड श्लोकानें उपपादन करितात—जर हें जगत् केव्हांहि याहून निराळ्या प्रकारचें नाहीं, इत्यादि मतानें या भावाचें उत्पत्त्यादिक होत नसतील तर एका कारणाच्या अभावामुळें एकात्मता व मिथ्यात्मता यांतील कांहीं सिद्ध होणार नाहीं. यास्तव त्यांच्या उत्पत्त्यादिकांची सिद्धि करितात—) त्रिगुणात्मनां भावानां स्थित्युत्पत्त्यप्ययान् पश्येत्—त्रिगुणात्मक म्ह० सावयव पदार्थांचे स्थिति-उत्पत्ति-लय पहावे. [याविषयीं असें अनुमान करावें—हे सर्व पदार्थ उत्पत्त्यादिकांनीं युक्त आहेत, कारण ते सावयव आहेत, घटादिकांप्रमाणें.] १५.

चैतन्यस्वभाव व्यापक परमात्म्यानें देहादिक सर्व तत्त्वें पूर्वींच व्यापिलीं आहेत, हें निश्चित जाण. ७६ घटाला आकाश जसें आंतून बाहेरून व्यापितें, ७७ तसें जें शुद्ध ज्ञान, तेंच ज्ञेयाच्या प्राप्तीचें कारण आहे. एकदां ज्ञेय प्राप्त झालें कीं, वृत्तीसह ज्ञानाचा लोप होतो. ७८ ज्ञानानेंच ब्रह्म जाणतां येतें. म्हणून त्याला ज्ञेय असें म्हणतात. तें ज्ञेय म्ह० ब्रह्म एकदां प्राप्त झालें म्हणजे सूर्याच्या प्रकाशापुढें काजवा जसा निस्तेज होतो, तसें ज्ञेयापुढें ज्ञान फिकें पडतें. ७९ मीठ पाण्यांत पडलें म्हणजे आपल्या मीठपणाला जसें मुकतें, त्याप्रमाणें ज्ञान

ज्ञेय पावलिया ज्ञान । ज्ञातेपणा हारवी ॥ १८० ॥ ज्ञेय पावलिया सम्यक । स्वरूपीं चिन्मात्रैक एक । तेथ मिथ्या व्याप्यव्यापक । साधक बाधक असेना ॥ ८१ ॥ जेवीं उदेलिया गभस्ती । सतारा लोपे रोहिणीपती । तेवीं जगेंसी ज्ञानसंपत्ती । ज्ञेयाचे प्राप्तीपुढें लोपे ॥ ८२ ॥ ऐसें अपरोक्ष नव्हतां सांग । देहादि प्रपंचाचें लिंग । आत्म्यावेगळें देखे जग । शब्दें लगबग ब्रह्मज्ञाना ॥ ८३ ॥ शुद्ध शाब्दिक जें ब्रह्मज्ञान । तेंही गुणात्मक जाण । वस्तु निराकार निर्गुण । जन्ममरण तिसी नाहीं ॥ ८४ ॥ त्रिगुण तितुकें नाशवंत । येचि विखींचें प्रस्तुत । सांगताहे श्रीअनंत । अंतवंत साकार ॥ ८५ ॥

जरी नसतें नाशवंत । तरी सगुण मानूं येतें सत्य । उत्पत्तिस्थितिनिदानवंत । जाण येथ त्रिगुणचि ॥ ८६ ॥ रजोगुणें होय उत्पत्ति । सत्वगुणें कीजे स्थिती । तमोगुण नाशी अंतीं । हा गुणप्रवृत्तिस्वभावो ॥ ८७ ॥ या गुणांमाजीं वस्तु असे । जिचेनि गुणकार्य प्रकाशे । परी जन्ममरणादि दोषें । अलिप्त वसे अविनाशी ॥ ८८ ॥ जे तिनी गुणां आश्रयभूत । जिचेनि गुणकर्मे वर्तत । ती वस्तु त्रिगुणातीत । तेचि सांगत श्रीकृष्ण ॥ ८९ ॥

आदावन्ते च मध्ये च सृज्यात्सृज्यं यदन्वियात् । पुनस्तत्प्रतिसंक्रामे यच्छिष्येत तदेव सत् ॥ १६ ॥

गुणां आदि मध्यम अवसानीं । सृष्टि उत्पत्ति स्थिति निधनीं । जें असे अविनाशपणीं । तें मी मानीं संतत्वें ॥ १९० ॥ तेंचि संतत्व गा ऐसें । ज्याचेनि आधारें जग वसे । जें जगा सबाह्य भरलें असे । जग प्रकाशे ज्याचेनी ॥ ९१ ॥ हें जगचि होय जाये । परी तें संचलेंचि राहे । ऐशी जे निजवस्तु आहे । ते तूं पाहें संतत्वें ॥ ९२ ॥ जैसे घट मठ होती जाती । आकाश राहे सहजगती ।

ज्ञेयांत मिळालें, म्हणजे त्याचा ज्ञानपणा नाहींसा होतो. १८० यथार्थ ज्ञेयाची प्राप्ति झाली असतां स्वरूपांत एक चिन्मात्र रहातें. तेथें व्याप्य आणि व्यापक मिथ्या होतात. साधक व बाधक कांहीं उरत नाहीं. ८१ सूर्य उदय पावतांच नक्षत्रांसह चंद्र जसा लोपून जातो, तसें ज्ञेय प्रकट होतांच सगळें जगत् ज्ञानसंपत्तीसह लोपून जातें. ८२ असें सांग अपरोक्ष ज्ञान जोंवर झालेलें नसतें, तोंवर सर्व जगत् देहादि हें प्रपंचाचें चिन्ह आत्म्याहून वेगळें पहातें आणि ब्रह्मज्ञानाची शब्दमात्र वटवट चालते. ८३ शुद्ध शाब्दिक जें ब्रह्मज्ञान तेंहि त्रिगुणात्मक आहे, असें तूं समज. जी निराकार, निर्गुण आत्मवस्तु आहे, तिला जन्म-मरण नाहीं. ८४ जेवढे त्रिगुणात्मक पदार्थ आहेत ते सगळे नाश पावणारे आहेत. त्याच अंतवंत साकार वस्तूंविषयीं आतां श्रीकृष्ण सांगत आहे. १८५.

साकार वस्तु नाशवंत नसल्या तर जेवढें सगुण रूप तेवढें सत्यच मानावें लागलें असतें. उत्पत्ति-स्थिति-लय करणारे त्रिगुणच आहेत, असे समज. ८६ रजोगुणापासून पदार्थांची उत्पत्ति होते. सत्त्वगुणानें स्थिति व तमोगुणापासून शेवटीं नाश होतो. हा गुणांचा स्वभाव आहे. ८७ या त्रिगुणांतच आत्मतत्व असतें. त्यानेंच गुणांचें कार्य प्रकाशित होतें. परंतु तें जन्म-मरणादि दोषांनीं अलिप्त असल्यामुळें अविनाशी होऊन रहातें. ८८ जें तिन्हीं गुणांना आश्रयभूत असलेलें, ज्यामुळें गुणांचीं कार्यें होतात, तें तत्त्व गुणातीत आहे, हेंच आतां श्रीकृष्ण सांगत आहे. १८९.

—त्यानंतर—

आदौ अन्ते च मध्ये च सृज्यात्सृज्यं प्रति यत् अन्वियात् पुनः प्रति संक्रामे यत् शिष्येत तदेव सत्— उत्पत्ति व अन्य परिणामाची प्राप्ति यांमध्यें कारणत्वानें व मध्यें आश्रयत्वानें एका कार्यापासून दुसऱ्या कार्यांत जें अनुवृत्त होतें तसेंच त्या सर्वांच्या प्रलयानंतर जें अवशिष्ट रहातें तेंच सत् आहे, असें पहावें. १६.

गुणांच्या आरंभीं, मध्यें व शेवटीं, सृष्टीच्या पूर्वीं, स्थितिकालीं व प्रलयकालीं जें तत्त्व अविनाशपणानें रहातें, तेंच सत् म्ह० ब्रह्म आहे, असें मी मानितों. १९० ज्याच्या आधारानें हें सर्व जगत् रहातें, जें जगाच्या आंत-बाहेर भरून राहिलें आहे, ज्याच्यायोगें ही सर्व सृष्टि प्रकाशित होते तेंच हें शाश्वत ब्रह्म होय. ९१ हें जगत् उत्पन्न होतें व नाश पावतें; परंतु त्यांतील जी आत्मवस्तु ती कायम रहाते, तेंच सत् ब्रह्म आहे, असें तूं समज. ९२ ज्याप्रमाणें

तेवीं ब्रह्मांडा लयोत्पत्ती । वस्तुची स्थिति संचली ॥ ९३ ॥ जेवीं अलंकारापूर्वीं सोने । अलंकारीं सोनेंपणें । अलंकारनाशीं नाश नेणे । जेवीं कां सोनें निजस्थिती ॥ ९४ ॥ तेवीं आकळोनि चराचर । वस्तु असे अखंडाकार । होतां जातां आकारविकार । वस्तु अणुमात्र विकारेना ॥ ९६ ॥ ऐशी जे वस्तु अखंडपणें तिच्या ठायीं चार प्रमाणें । ईहीं प्रमाणीं वस्तु जाणणें । प्रपंच देखणें मिथ्यात्वें ॥ ९६ ॥

श्रुतिः प्रत्यक्षमैतिह्यमनुमानं चतुष्टयम् । प्रमाणेष्वनवस्थानाद्विकल्पात्स विरज्यते ॥ १७ ॥

एक अद्वैत ब्रह्म पाहीं । दुसरें आणिक कांहीं नाहीं । प्रपंच मिथ्या वस्तूचे ठायीं । हे प्रमाण पाहीं वेदवाक्यें ॥ ९७ ॥ प्रत्यक्ष देखिजे आपण । देहादिकांचें नश्वरपण । हें दुसरें परम प्रमाण । जें क्षणिकत्व जाण प्रपंचा ॥ ९८ ॥ मार्कंडेयो आणि भ्रुशुंडी । ईहीं प्रपंचाची राखोंडी । देखिली गा रोकडी । वेळां कोटिकोटि कल्पांतीं ॥ ९९ ॥ महाजनप्रसिद्ध हें श्रवण । प्रपंचासी क्षणिकपण । हें तिसरें गा प्रमाण । उद्धवा जाण ऐतिह्य ॥ २०० ॥ शास्त्रप्रसिद्धी अनुमान । मिथ्या प्रपंचाचें भान । दिसे मृगजळासमान । वस्तुतां जाण असेना ॥ १ ॥ दोर दोरपणें साचार । भ्रमें भासे नानाकार । काष्ठ सर्प कीं मोत्यांचा हार । ना हे जळधार जळाची ॥ २ ॥ तेवीं वस्तु एक चिद्घन । तेथ भ्रमें मतवाद गहन । हें शून्य किंवा सगुण । कर्मधर्माचरण तें मिथ्या ॥ ३ ॥ या परी करितां अनुमान । मिथ्या प्रवृत्ति-

---

मातीचा घट किंवा झोपडी उत्पन्न होते व नाश पावते, परंतु त्यांस अंतर्बाह्य व्यापून असलेलें आकाश जसें कायम रहातें, त्याचप्रमाणें ब्रह्मांडाची उत्पत्ति व लय झाला तरी त्यांतील वस्तुतत्त्व कायम रहातें; ९३ किंवा अलंकार घडविण्यापूर्वी सोनें असतें, तो घडविल्यावरहि सोनें व दागिन्याचा आकार मोडला तरी तें सोनेंच रहातें, त्यांत जसा बदल होत नाहीं, ९४ त्याचप्रमाणें ही सर्व चराचर सृष्टि व्यापून राहिलेलें हें सत्तत्त्व अखंड असतें. सृष्टींत अनेक बदल झाले, तरी त्यांत अणुभरहि विकार उत्पन्न होत नाहीं. ९५ असें जें हें अविकारी ब्रह्मतत्व त्याविषयीं चार प्रमाणें आहेत. त्या प्रमाणांनीं तें तत्त्व जाणून प्रपंच मिथ्या आहे असा निश्चय करावा. १९६.

—आतां पुढील दोन श्लोकांनीं वैराग्य सांगतात—

श्रुतिः प्रत्यक्षं ऐतिह्यं अनुमानं चतुष्टयं—या आत्मस्वरूपामध्यें अल्पहि भेद नाहीं, अशा अर्थाची श्रुति; पटादिकार्य तत्त्वादिकारणाहून भिन्न दिसत नाहीं, तसेंच चैतन्याहून भिन्न कांहीं दिसत नाहीं, असें प्रत्यक्ष; महाजन-प्रसिद्धि हें ऐतिह्य व जगत् मिथ्या आहे, कारण तें दृश्य आहे. शुक्ति-रजताप्रमाणें; इत्यादि अनुमान अशीं हीं चार प्रमाणें आहेत. प्रमाणेषु अनवस्थानात् विकल्पात् स विरज्यते—या चार प्रमाणांमध्यें अवस्थित होत नसल्यामुळें म्ह० या चारी प्रमाणांनीं बाधित असल्यामुळें व विकल्पाला मिथ्यात्व असल्यामुळें सर्वानुगत सत्य आत्मतत्त्व पहाणारा विवेकी त्यापासून विरक्त होतो. [श्रुत्यादि चार प्रमाणांनीं जगत् बाधित होत असल्यामुळें व विकल्प मिथ्या असल्यामुळें पूर्वोक्तप्रकारें सर्वानुगत सत्य आत्मतत्त्व पहाणारा पुरुष विरक्त होतो.] १७.

केवल एक अद्वैत ब्रह्म आहे. दुसरें कांहींहि नाहीं. ब्रह्मावर प्रपंचाचा मिथ्या आरोप आहे. हें वेदवाक्याचें प्रमाण झालें. (' नेह नानास्ति किंचन०' ' एकमेवाद्वितीयं ब्रह्म ' इत्यादि श्रुति याला प्रमाण आहेत.) ९७ देहादिकांचा नश्वरपणा आपण प्रत्यक्ष पहातों. हें प्रपंचाच्या क्षणभंगुरपणाचें दुसरें प्रमाण आहे. ९८ मार्कंडेय आणि भ्रुशुंडी यांनीं कोट्यावधि कल्पांताच्या वेळीं प्रपंचाची राखरांगोळी झालेली प्रत्यक्ष पाहिली आहे. ९९ थोर लोकांच्या तोंडून प्रपंचाच्या क्षणिकत्वाच्या अनेक दंतकथा आपण नेहमीं ऐकतों. उद्धवा ! हें तिसरें प्रमाण. २०० शास्त्रप्रसिद्धी व अनुमान यांवरूनहि प्रपंचाचें भान मिथ्याच ठरतें. हा प्रपंच मृगजलासारखा भासतो. पण खरोखर नसतो. १ एखादी दोरी आपल्या खऱ्या रूपानेंच पडलेली असते; पण भ्रमानें तिच्यावर नानाप्रकारच्या कल्पना केल्या जातात. कोणी तिला काठी समजतो, कोणाला ती सर्प भासते; कोणी तिला मोत्यांचा हार म्हणतो तर कोणाला ती पाण्याची धार दिसते, २ त्याचप्रमाणें खरें आत्मतत्त्व एकच असतां भ्रमानें त्याविषयीं अनेक मतभेद होतात. कोणी त्याला शून्य म्हणतात, कोणी सगुण म्हणतात, कर्म-धर्माचरणहि मिथ्या आहे, ३ असें अनुमान केलें असतां प्रवृत्ति

प्रपंचज्ञान । हें वेदांतमत प्रमाण । सत्य जाण उद्धवा ॥ ४ ॥ तंतूंवेगळा पट कंहीं । योजेना आणिकिये ठायीं । तेवीं ब्रह्मावेगळा पाहीं । प्रपंचू नाहीं सत्यत्वें ॥ ५ ॥ चहूं प्रमाणीं प्रपंचस्थिती । मिथ्या साधिली निश्चितीं । ते प्रपंचीं विषयासक्ती । सांडूनि विरक्ती धरावी ॥ ६ ॥ येचि विखींचें निरूपण । स्वयें सांगताहे नारायण । उभय लोकीं विषयध्यान । तें मिथ्या जाण अमंगळ ॥ ७ ॥

कर्मणां परिणामित्वादाविरिञ्च्यादमङ्गलम् । विपश्चिन्नश्वरं पश्येददृष्टमपि दृष्टवत् ॥ १८ ॥

करूनि कर्माचें साधन । पाविजे लोक तो नश्वर जाण । आदिकरूनी ब्रह्मसदन । नश्वरत्वें जाण अमंगळ ॥ ८ ॥ जें ते लोकींचें सुख गहन । तें विखें रांखिलें जैसें अन्न । खातां गोड परिपाकें मरण । तेवीं अधःपतन स्वर्गस्था ॥ ९ ॥ जैसा देखिला हा लोक येथ । तैसाचि स्वर्गभोग तेथ । जे दोन्ही जाण अंतवंत । नाश प्राप्त दोहींसी ॥ २१० ॥ काळें पांढरें दोनी सुणीं । जेवीं सम अपवित्रपणीं । तेवीं इहपरलोक दोन्ही । नश्वरपणीं समान ॥ ११ ॥ इहामुत्र भोगासक्ती । यांवरी धरावी विरक्ती । या नांव वैराग्यस्थिती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ १२ ॥ मागील तुझी प्रश्नस्थिती । पुशिली होती माझी भक्ती । ते मी सांगेन तुज प्रती । यथानिगुती निजबोधें ॥ १३ ॥

भक्तियोगः पुरैवोक्तः प्रीयमाणाय तेऽनघ । पुनश्च कथयिष्यामि मद्भक्तेः कारणं परम् ॥ १९ ॥

पूर्वीं भक्तीची महत्ख्याती । तुज सांगीतली निजस्थिती । ते भक्तीची तुज अतिप्रीती । तरी मी मागुतीं सांगेन ॥ १४ ॥ ऐक उद्धवा पुण्यमूर्ती । ज्यासी आवडे माझी भक्ती । तो मज पढिया त्रिजगतीं ।

व प्रपंचज्ञान मिथ्या ठरतें. उद्धवा ! वेदान्ताला संमत असलेलें हें प्रमाण सत्य आहे. असें जाण. ४ वस्त्र सुतापासून जसें निराळें रहात नाहीं, त्याप्रमाणें प्रपंच ब्रह्माहून वेगळा नाहीं; ५ प्रपंचाचें अस्तित्व अशा चार प्रमाणांनीं मिथ्या ठरतें. त्या प्रपंचावरील आसक्ति सोडून विरक्ति धरावी. ६ याविषयींचें निरूपण स्वतः नारायण करीत आहे. विषयांचें चिंतन मिथ्या असून तें इह व परलोकींहि अशुभच आहे. २०७.

—' अहोपण, वेदोक्त स्वर्गादि सुखाच्या आशेनें तो विरक्त होणार नाहीं ' अशी आशंका घेऊन सांगतात—

कर्मणां परिणामित्वात् विपश्चित् आविरिञ्च्यात् अदृष्टं अपि दृष्टवत् अमंगलं नश्वरं पश्येत्—कर्मांना परिणामित्व असल्यामुळें विवेकी पुरुषानें ब्रह्मलोकापर्यंत अदृष्ट सुखालाहि दृष्ट सुखाप्रमाणें दुःखरूप व नश्वर पहावें. [अदृष्ट म्ह० पारलौकिक सुख व दृष्ट म्ह० ऐहिक सुख.] १८.

कर्मांच्या साधनानें जो लोक प्राप्त होतो तो नश्वर असतो, असें समजावें. ब्रह्मलोकापर्यंत सर्व लोक नश्वर असल्यामुळें ते अशुभच होत. ८ विष घालून शिजविलेल्या अन्नाप्रमाणें त्या लोकांतील सुख मोठें गहन असतें, तें अन्न खातेवेळीं गोड लागतें, पण परिणामीं जसें मरण ओढवतें, तसें स्वर्गीं गेलेल्या जीवांचें अखेर अधःपतन होतें. ९ इहलोकींचें सुख जसें नश्वर तसेंच स्वर्गांतील भोगहि विनाशीच असतात. दोहोंचा अखेर नाश होतो. २१० काळ्या रंगाचें व पांढऱ्या रंगाचें अशीं दोन कुत्रीं असलीं तरी दोहोंचा अपवित्रपणा सारखाच असतो; त्याचप्रमाणें इहलोक व परलोक या दोहोंचा नश्वरपणा सारखाच असतो. ११ म्हणून इहलोकीं व परलोकीं मिळणाऱ्या भोगांवरील आसक्ति सोडून त्याविषयीं विरक्त व्हावें. उद्धवा ! यालाच वैराग्य म्हणतात. १२ तूं मागें माझ्या भक्तीविषयीं प्रश्न केला होतास, त्याचें सोपपत्तिक उत्तर मी तुला आतां आत्मबोधानें देतों. २१३.

—आतां कारणासह भक्तियोग सांगतात—

भक्तियोगः पुरा उक्तः एव—भक्तियोग मीं पूर्वीं सांगितलाच आहे; तथापि, हे अनघ-हे निष्पाप उद्धवा ! **प्रीयमाणाय ते पुनः च मद्भक्तेः परं कारणं कथयिष्यामि**—ऐकतांना अतिशय संतुष्ट होणाऱ्या तुला मी पुनरपि माझ्या भक्तीचें परम कारण सांगेन. १९.

पूर्वीं मीं तुला भक्तीचा मोठा महिमा सांगितला होता. त्या भक्तीची तुला अत्यंत आवड असल्यामुळें मी पुनः तुला ती सांगतों. १४ हे पुण्यवान् उद्धवा ! ज्याला माझी भक्ति आवडते, तो सगळ्या त्रिभुवनांत मला प्रिय आहे.

भजनें परम प्राप्ती मद्भक्तां ॥ १५ ॥ ते भक्तीचें निजलक्षण । प्रथम भूमिका आरंभून । देवो सांगे आपण । येथें सावधान व्हावें श्रोतां ॥ १६ ॥

श्रद्धाऽमृतकथायां मे शश्वन्मदनुकीर्तनम् । परिनिष्ठा च पूजायां स्तुतिभिः स्तवनं मम ॥ २० ॥
आदरः परिचर्यायां सर्वाङ्गैरभिवन्दनम् । मद्भक्तपूजाऽभ्यधिका सर्वभूतेषु मन्मतिः ॥ २१ ॥
मदर्थेष्वङ्गचेष्टा च वचसा मद्गुणेरणम् । मय्यर्पणं च मनसः सर्वकामविवर्जनम् ॥ २२ ॥
मदर्थेऽर्थपरित्यागो भोगस्य च सुखस्य च । इष्टं दत्तं हुतं जप्तं मदर्थं यद्व्रतं तपः ॥ २३ ॥
एवं धर्मैर्मनुष्याणामुद्धवात्मनिवेदिनाम् । मयि संजायते भक्तिः कोऽन्योऽर्थोऽस्यावशिष्यते ॥ २४ ॥

अमृतरूपा ज्या माझ्या कथा । श्रद्धायुक्त श्रवण करितां । फिकें करूनियां अमृता । गोडी भक्तिपंथा तत्काळ लागे ॥ १७ ॥ अमर अमृतपान करिती । तेही शेखीं मरोनि जाती । माझें कथामृत जे सेविती । ते नागवती कळिकाळा ॥ १८ ॥ सेवितां कथासारामृत । अतिशयें जाहले उन्मत्त । मातले मरणातें मारित । धाकें बळे समस्त संसारू ॥ १९ ॥ सेवितां कथामृतसार । मद्भावीं रंगलें अंतर । ते माझे गुण माझें चरित्र । गाती सादर उल्हासें ॥ २२० ॥ माझें नाम माझीं पदें । नाना छंदें अद्वैतबोधें । कीर्तनीं गाती स्वानंदें । परमानंदें डुल्लत ॥ २१ ॥ सप्रेम संभ्रमाचे मेळीं । गर्जती नामाच्या कल्लोळीं । नामासरिसी वाजे टाळी । जाहली होळी महापापां ॥ २२ ॥ ऐशिया कीर्तनाचे आवडीं । जाहलीं

माझ्या भक्तांना माझ्या भजनानेंच परमपद मिळतें. १५ त्या भक्तीचें लक्षण पहिल्या भूमिकेपासून देव स्वतः सांगत आहे. तरी श्रोत्यांनीं सावधान व्हावें. २१६.

मे अमृतकथायां श्रद्धा—माझ्या अमृतप्राय कथा ऐकण्याविषयीं आदर, शश्वत् मदनुकीर्तनं—सतत माझें संकीर्तन म्ह० श्रवणानंतर माझ्या कथांचें व्याख्यान, पूजायां च परिनिष्ठा—माझ्या पूजेमध्यें अत्यंत निष्ठा, स्तुतिभिः मम स्तवनं—स्तोत्रांनीं माझें स्तवन. २०. परिचर्यायां आदरः—माझ्या सेवेविषयीं अतिशय आदर, सर्वाङ्गैः अभिवन्दनं—सर्वांगांनीं अभिवंदन, अभ्यधिका मद्भक्तपूजा—माझ्या भक्तांची अतिशय पूजा, सर्वभूतेषु मन्मतिः—सर्वभूतांमध्यें माझी दृष्टि. २१ मदर्थेषु अङ्गचेष्टा—माझ्या भजनासाठींच सर्व अंगांचा व्यापार म्ह० सर्व लौकिक क्रिया, वचसा मद्गुणेरणं—लौकिक वचनानेंहि माझ्या गुणांचें कथन, मनसः च मयि अर्पणं—मनाचें माझ्या ठिकाणीं समर्पण, सर्वकामविवर्जनं—सर्व विषयांचा त्याग. २२. मदर्थे अर्थपरित्यागः—माझ्या भजनासाठीं भजनविरोधी अर्थाचा परित्याग, भोगस्य च सुखस्य च—चंदनादि भोगसाधनांचा व पुत्रलालनादि सुखाचाहि परित्याग, यत् इष्टं दत्तं हुतं जप्तं व्रतं तपः तत् अपि मदर्थं—जें वेदोक्त यजन दान, हवन, जप, व्रत व तप तेंहि माझ्यासाठीं केलें असतां भक्तीला कारण होतें. २३. उद्धव—हे उद्धवा ! एवं आत्मनिवेदिनां मनुष्याणां धर्मैः मयि भक्तिः संजायते—याप्रमाणें आत्मनिवेदन करणाऱ्या मनुष्यांच्या धर्मांनीं माझ्याविषयीं प्रेमलक्षणा भक्ति उत्पन्न होते. यस्य अन्यः कः अर्थः अवशिष्यते—या भक्ताचा दुसरा कोणता साध्यरूप किंवा साधनरूप अर्थ अवशिष्ट रहातो ! [कोणताहि नाहीं. त्याचा सर्व इष्ट अर्थ स्वतःच सिद्ध होतो.] २४.

माझ्या ज्या अमृतासारख्या कथा आहेत, त्या श्रद्धेनें श्रवण केल्या असतां भक्तांना त्याच्या पुढें अमृतहि फिकें वाटतें व भक्तीमार्गाची तत्काळ गोडी लागते. १७ इंद्रादिक जे श्रेष्ठ देव अमृतपान करितात तेहि अखेर मृत्युमुखांत पडतात; पण माझ्या कथामृताचें सेवन करणारे भक्त कलिकाळाच्याहि हातीं सांपडत नाहींत. १८ माझें कथासारामृत सेवन करून ते इतके उन्मत्त होतात कीं; प्रबल मरणालाहि ते मारतात. त्यांच्या धाकानें सगळा संसार पळत सुटतो. १९ माझें कथामृतसार प्राशन करून ज्यांचें अंतःकरण माझ्या भक्तींत रंगून जातें, ते माझे गुण व माझें चरित्र मोठ्या उल्हासानें व आदरानें गात असतात. २२० ते माझें नांव व माझीं पदें, आत्मज्ञानपर कीर्तनांत, नाना प्रकारच्या रागांत मोठ्या आनंदानें गातात व परमानंदानें डुलत असतात. २१ मोठ्या समारंभांत प्रेमानें माझ्या नांवाचा गजर करितात. नामघोषाबरोबर टाळ्या वाजवितात. त्यानें महापातकांची होळी होते. २२

प्रायश्चित्तें देशधडी । तीर्थें होऊनि ठेलीं बापुडीं । फिटलीं सांकडीं जपतपांचीं ॥ २३ ॥ ऐकोनि कीर्तनाचा गजर । ठेला यमलोकींचा व्यापार । रिकामे यमकिंकर । यमें पाशभार लपविला ॥ २४ ॥ देखोनि कीर्तनाची गोडी । देव धांवले लवडसवडी । वैकुंठींहूनि घालीं उडी । अतितांतडी स्वानंदें ॥ २५ ॥ ऐसा कीर्तनाचा गजर । करितां नित्य निरंतर । त्याआधीन मी श्रीधर । भुललों साचार कीर्तनें ॥ २६ ॥ जैसें कीर्तन तैशीच पूजा । आदरें पूजी गरुडध्वजा । पुष्पादिसंभारसमाजा । अतिवोजा घवघवित ॥ २७ ॥ अतिनिष्ठा सावधान । यापरी करी माझें पूजन । माझी स्तुति माझें स्तवन । रिकामा अर्ध क्षण जावों नेदी ॥ २८ ॥

इंद्रियें वेंचिलीं पूजाविधानें । वाचा वेंचिलीं हरिकीर्तनें । हृदय वेंचिलें माझेनि ध्यानें । अष्टांग नमनें वेंचिलें ॥ २९ ॥ ऐसा अत्यादरें वाडेंकोडें । सबाह्य वेंचिला मजकडे । माझे भक्त देखिल्या पुढें । हरिखें मजकडे येवोंचि विसरे ॥ २३० ॥ माझे भक्त भाग्यें येती घरा । तें पर्वकाळ दिवाळी दसरा । तेथें तीर्थें धांवती माहेरा । जेवीं सासराहूनि कुमारी ॥ ३१ ॥ पहावया भक्तपूजेची आवडी । सनकादिकांची पडे उडी । नारदप्रल्हादादि भक्तकोडी । चढोवढी धांवती ॥ ३२ ॥ तेथ सिद्ध येती गा अलोटे । सुरवरांचें टेक फुटे । महानुभावांचा ढीग दाटे । पितर नेटेंपाटें धांवती ॥ ३३ ॥ वेदासी रिघावा न घडे । विधि निबुंजला मागें मुरडे । माझ्या भक्तपूजेचेनि कोडें । दारापुढें थाट दाटे ॥ ३४ ॥ मद्भक्तपूजेचिया उल्हासा । मज टक पडे हृषीकेशा । इतरांचा पाड काइसा । भक्तपूजनीं ऐसा महिमा आहे ॥ ३५ ॥ मागां सांडूनि माझी पूजा । जेणें मद्भक्त पूजिले वोजा । तेणें मज पूजिलें अधोक्षजा । परिवारसमाजासमवेत ॥ ३६ ॥ प्रतिमा माझ्या अचेतन व्यक्ती । भक्त माझ्या सचेतन मूर्ती । त्यांसी

माझ्या नाम-संकीर्तनाचा गजर सुरू झाला म्हणजे प्रायश्चित्तें देशोधडीला लागतात. तीर्थें बापडीं दीन होतात. जप-तपांचें संकट दूर होतें. २३ कीर्तनाचा गजर ऐकून यमलोकींचा व्यवहार बंद पडतो. यमदूत रिकाम्या हातांनीं फिरूं लागतात व यम जीवांना बांधून आणण्याचा आपला पाशांचा भारा लपवून ठेवितो. २४ कीर्तनाची गोडी पाहून श्रीकृष्ण गडबडीनें धांवतो. वैकुंठाहून स्वानंदानें व त्वरेनें उडी टाकितो. २५ अशा रीतीनें जे नित्य निरंतर कीर्तनाचा गजर करितात त्यांच्या अधीन मी श्रीकृष्ण होतों. व मी सर्वतोपरी कीर्तनावर लुब्ध होतों. २६ कीर्तना-प्रमाणेंच ते आवडीनें गंध-पुष्पादि साहित्यांनीं गरुडध्वज श्रीकृष्णाची घवघवीत पूजा करितात. २७ मजवर अत्यंत निष्ठा ठेवून सावधान चित्तानें ते माझें पूजन करून माझें स्तवन करीत असतात. एक क्षणहि रिकामा जाऊं देत नाहींत. २२८.

ज्यानें इंद्रियें पूजेंत गुंतविलीं, वाणी हरिकीर्तनांत लाविली, अंतःकरण माझ्या ध्यानाकडे नियुक्त केलें आणि आठहि अंगें नमनाकडे योजिलीं; २९ असा अतिशय आदरानें व प्रेमानें अंतर्बाह्य मलाच वाहून घेतलेला साधक माझे भक्त पुढें आलेले पहातांच हर्षानें मजकडे येण्याचें विसरतो. २३० मोठ्या भाग्यानें माझे भक्त जेव्हां घरीं येतात, तेव्हां त्याला तो दिवाळी-दसऱ्यासारखा मोठा पर्वकाळच वाटतो. नुक्तेंच लग्न झालेली अल्पवयी मुलगी सासराहून जशी मोठ्या आनंदानें माहेरीं येते, तशीं सगळीं तीर्थें तेथें धांवत येतात. ३१ जेथें भक्तानें आवडीनें केलेली पूजा पहाण्यासाठीं सनकादिकांनीं उड्या टाकिल्या, नारद-प्रल्हादासारखे असंख्य भक्त मोठ्या चढा-ओढीनें धांवले ३२ तेथें अगणित सिद्धहि येतात. देवादिकांचें तर पेंवच फुटतें; सत्पुरुषांची गर्दी होते व पितर मोठ्या तांतडीनें धांवतात. ३३ वेदाला रीघ मिळत नाहीं. विधि त्या गर्दीनं बुजून मागें वळतो. माझ्या पूजेच्या आवडीनें दारापुढें गर्दी जमते. ३४ माझ्या भक्तांचा पूजेचा उल्हास पाहून मज भगवानाला जेथें भूल पडते तेथें इतरांची काय कथा ! भक्तांच्या पूजेचा असा महिमा आहे. ३५ पूर्वी ज्यांनीं माझी पूजा सोडून माझ्या भक्तांचें मोठ्या प्रेमानें पूजन केलें, त्यांनीं मज श्रीहरीचीच सर्व परिवारासह पूजा केली, असें मी समजतों. ३६ प्रतिमा या माझ्या निर्जीव मूर्ति

पूजिल्या मी श्रीपती । यथानिगुतीं संतोषें ।। ३७ ।। जैसा मद्भाव मद्भक्ती । तोचि भावो सर्वांभूतीं । नानाकार भूताकृती । परी आत्मस्थिति अविकार ।। ३८ ।। दिसे देहाकृती मुंडली । तीतें म्हणती हे रांड जाली । परी आत्म्याची रांड नाहीं जाहली । असे संचली आत्मस्थिती ।। ३९ ।। दीर्घ वक्र आणि वर्तुळ । दिसती भिन्न भिन्न इंगळ । परि अग्नि एकचि केवळ । तेवीं भूतें सकळ मद्रूपें ।। २४० ।। चित्रांमाजीं नानाकृती । पाहतां अवघी एकचि भिंती । तेवीं मी चिदात्मा सर्व भूतीं । निजभावें निश्चितीं जाणावा ।। ४१ ।। सांडूनि अहंकार दुजा । सर्व भूतीं भावो माझा । हे उत्तमोत्तम माझी पूजा । मज अधोक्षजा पढियंती ।। ४२ ।। ऐशी जो माझी पूजा करी । तो मज पढियंता गा भारी । मी सर्वांगें राबें त्याच्या घरीं । तो मजवरी मिराशी ।। ४३ ।। त्याच्या चेष्टांची जे गती । तेचि माझी भजनस्थिती । हेंचि स्वमुखें श्रीपती । उद्धवाप्रती सांगत ।। ४४ ।।

लौकिक शारीर कर्मगती । तद्द्वारा निपजे माझी भक्ती । अभिनव माझी भजनस्थिती । सांगों किती उद्धवा ।। ४५ ।। बैसोनियां हाटवटी । सांगतां लौकिकीही गोष्टी । त्यांमाजीं माझें कीर्तन उठी । मद्गुणें गोमटी गर्जे वाचा ।। ४६ ।। स्वधर्मक्रिया करणें । तेंही अर्पी मजकारणें । मजवेगळें कांहीं करणें । करूं नेणे अणुमात्र ।। ४७ ।। सर्वेंद्रियांचिये स्थितीं । सहजें निपजे माझी भक्ती । माझें नाम माझी कीर्तीं । वाचा रिती राहों नेणे ।। ४८ ।। मनासी आवडे जें जें कांहीं । तें तें अर्पी मजचि पाहीं । शेखीं आपुलें मन तेंही । माझ्या ठायीं समर्पी ।। ४९ ।। माझे स्वरूपाचे ठायीं जाण । केवीं घडे मनाचें अर्पण । तेचिविषयीं निरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ।। ५० ।।

आहेत व भक्त माझ्या सजीव मूर्ति आहेत. त्यांची पूजा केली असतां मी श्रीपति फारच संतुष्ट होतों. ३७ जसा माझा भाव व माझी भक्ति तसाच भाव सर्व भूतांमध्यें ठेवावा. भूतांचे आकार भिन्नभिन्न असतात; पण त्यांतील आत्मस्थिति एकरूप असते. ३८ स्त्रीच्या मस्तकाचें मुंडण केलें म्हणजे तिला अशुभा समजतात; पण वास्तविक तिचा आत्मा कांहीं अशुभ होत नाहीं. तो आपल्या मूळ स्वरूपांतच निश्चल असतो; ३९ किंवा अग्नीचे निखारे दीर्घ, चक्र किंवा वर्तुलाकार इत्यादि निरनिराळ्या आकारांचे दिसले तरी अग्नीचें रूप एकच, त्याप्रमाणें हीं सर्व भिन्नभिन्न भूतें मद्रूप आहेत; २४० भिंतीवरील चित्रांत नाना प्रकारच्या आकृति दिसतात; परंतु खरें पाहूं गेलें असतां भिंत एकच असते; त्याप्रमाणें मी एकच परमात्मा सर्व भूतांमध्यें आहें, हें निश्चित जाण. ४१ म्हणून सर्व प्रकारें अहंकार टाकून द्वैतभाव सोडून जो सर्व भूतांमध्यें मद्भाव ठेवितो तोच मज परमेश्वराला अत्यंत प्रिय आहे. तीच माझी उत्तमोत्तम पूजा होय. ४२ जो माझी अशी पूजा करितो, तो तर मला फारच आवडतो. मी स्वतः त्याच्या घरीं राबत असतों. त्याचा माझ्यावर हक्क चालतो. त्याच्या हाता-पायांची जी हाल-चाल तेंच माझें भजन होय. हेंच आतां श्रीकृष्ण स्वमुखानें उद्धवाला सांगत आहे. २४४.

हे उद्धवा ! शरीरानें होणारें जें लौकिक कर्म त्याच्या द्वारांहि माझी भक्ति होते. माझ्या भजनाचा प्रकार अपूर्व आहे. तो किती सांगावा ! ४५ बाजारांत बसून लौकिक गोष्टी सांगत असतांहि त्यांत माझें कीर्तन होतें व वाणी माझ्या गुणांचा गजर करिते. ४६ माझा भक्त जेवढा स्वधर्म आचरितो तेवढा सर्व मला अर्पण करितो. माझ्यावांचून इतरांसाठीं तो अणुभरहि कांहीं करीत नाहीं. सर्व इंद्रियांच्या व्यापारामध्येंहि सहजच माझी भक्ति होते. माझें नांव व माझी कीर्ति यांवांचून वाणीला रिकामें राहूं देणें त्याला ठाऊकच नाहीं. ४८ त्याच्या मनाला जें कांहीं आवडतें, तें सर्व तो मलाच अर्पण करितो. शेवटीं तो आपलें मनहि मलाच समर्पितो. ४९ माझ्या स्वरूपांत मन कसें अर्पण होतें, त्याविषयीं श्रीकृष्ण स्वतः निरूपण करीत आहे. २५०.

मी परमात्मा परम स्वार्थ । ऐसा करूनि निश्चितार्थ । वेंचितां धन धान्य सर्वार्थ । निजपरमार्थ साधावया ॥ ५१ ॥ परमार्थ साधावया अव्यंग । साचार पोटींचा विराग । मी भेटावया श्रीरंग । सकळ भोग सांडिती ॥५२॥ छत्र चामर हस्ती घोडे । त्यागूनि होती गा उघडे । ऐसें वैराग्य धडफुडें । मज रोकडें पावावया ॥ ५३ ॥ माझें पावावया निजसुख । द्रव्यदारापुत्रादिक । त्यागूनि सांडिती निःशेख । यापरी देख अनुतापी ॥ ५४ ॥ आवडीं करितां माझें भजन । विसरे भोगांची आठवण । माझे प्राप्तीलागीं जाण । रिता क्षण जावों नेदी ॥ ५५ ॥ माझेनि उद्देशें परम । करी श्रौत स्मार्त स्वकर्म । अग्निहोत्रादि याग परम । व्रत नेम मजलागीं ॥ ५६ ॥ माझे ठाकावया चिद्रूप । गायत्र्यादि मंत्रजप । माझें पावावया निजस्वरूप । दुष्कर तप आचरती ॥ ५७ ॥ मी विश्वात्मा विश्वतोमुखीं । विश्वंभर होतसें सुखी । यालागीं तो दीनमुखीं । करी आवश्यकीं अन्नदान ॥ ५८ ॥ हृदयीं मी स्वतःसिद्ध जाण । त्या माझें करूनि आवाहन । आपण करी जें भोजन । तेंही मदर्पण तो करी ॥ ५९ ॥ कवळकवळीं हरिस्मरण । तें अन्नचि होय ब्रह्म पूर्ण । यापरी माझे भक्त जाण । कर्म मदर्पण स्वयें करिती ॥ २६० ॥ ऐशीं सर्व कर्में कृष्णार्पण । सर्वदा जो करी जाण । त्याचें मन होय मदर्पण । तेंचि निरूपण देवो सांगे ॥ ६१ ॥

सर्व कर्में मदर्पण । करितां शुद्ध होय मन । जेवीं लोह कमावितां जाण । होय दर्पण सोज्ज्वळ ॥ ६२ ॥ पुटीं घालितां सुवर्ण । अधिक तेज चढे जाण । करितां वस्त्राचें क्षाळण । स्वच्छपण धोंवटी ॥ ६३ ॥ तैसीं सर्व कर्में मदर्पण । करितां निर्मळ होय मन । ते काळीं मनाचें अर्पण । मद्रूपीं जाण हों लागे ॥ ६४ ॥ पूर दाटलिया सरितांसी । सवेग ठाकती सिंधूसी । तेवीं निर्मळत्वें मनासी । माझ्या स्वरूपासी पावणें ॥ ६५ ॥ माझे स्वरूपीं मनाची स्थिती । तैं आर्त जिज्ञासु अर्थार्थी । हे तीनही ते काळीं हारपती । माझी भक्ति चौथी उल्हासे ॥ ६६ ॥ माझें भांडवल मज एक भक्ती । तेथ दुजी तिजी आणि

मी परमात्माच श्रेष्ठ स्वार्थ आहें, असा मनाचा निश्चय करून, धन-धान्यादि सर्वस्व खर्च करून, परमार्थ साधावा. ५१ पूर्ण परमार्थ साधावयासाठीं अंतःकरणांत खरी विरक्ति उत्पन्न झाली पाहिजे. मज श्रीहरीला भेटण्यासाठीं सर्व सुखोपभोग सोडावे. ५२ छत्र, चामर, हत्ति, घोडे इत्यादि वैभवांचा त्याग करून माझे भक्त अगदीं निष्कांचन होतात. माझ्या प्राप्तीसाठीं इतकें तीव्र वैराग्य लागतें. ५३ माझें आत्मसुख मिळविण्यासाठीं ते द्रव्य व स्त्री-पुत्रादिक यांचा निःशेष त्याग करितात. इतकी त्यांस संसाराची विरक्ति येते. ५४ आवडीनें माझें भजन करीत असतां ते विषय-भोगांची आठवणहि विसरतात. माझ्या प्राप्तीसाठीं भजनावांचून एक क्षणहि रिकामा जाऊं देत नाहींत. ५५ श्रौत-स्मार्तादि स्वकर्म; अग्निहोत्रादि श्रेष्ठ याग; व्रत-नेम हीं सर्व मला उद्देशून करितात. ५६ माझ्या स्वरूपाला प्राप्त होण्या-साठीं ते गायत्र्यादि मंत्रांचा जप करितात व खडतर तपश्चर्या करितात. ५७ सर्वात्मा, विश्वव्यापी व विश्वंभर अशा मीं सुखी व्हावें, म्हणून ते दीन लोकांना अन्नदानानें तृप्त करितात. ५८ मी त्याच्या हृदयांतच स्वयंसिद्ध आहें. त्या माझें आवाहन करून ते स्वतः जें अन्न ग्रहण करितात तेंहि मलाच अर्पण करितात. ५९ प्रत्येक घासाला हरिस्मरण केलें असतां तें अन्नच साक्षात् ब्रह्म बनतें. अशाप्रकारें माझे भक्त कर्म मदर्पण करितात. २६० याप्रमाणें जो सर्व कर्में मदर्पण करितो, त्याचें मनच मदर्पण होतें. त्याचेंच निरूपण श्रीकृष्ण आतां करीत आहे. २६१.

लोखंड घांसून अतिशय निर्मल केलें असतां, तें जसें स्वच्छ आरशासारखें होतें, तशीं सर्व कर्में मला अर्पण केलीं असतां चित्त शुद्ध होतें. ६२ किंवा सोनें जेवढें तापून सुलाखून काढावें, तेवढें तें अधिकच शुद्ध होतें; किंवा वस्त्र जसें धुवावें तसें स्वच्छ होतें, ६३ त्याप्रमाणें सर्व कर्में मदर्पण केलीं असतां मन निर्मल होतें व तें माझ्या स्वरूपांतच अर्पण होऊं लागतें. ६४ नद्यांना पूर आला कीं, त्या जशा मोठ्या वेगानें जाऊन समुद्राला मिळतात, त्याप्रमाणें मन निर्मल झालें कीं, तें माझ्याच स्वरूपाला येऊन मिळतें. ६५ मन माझ्या स्वरूपांत स्थिर झालें कीं, साधकाची आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी ही अवस्था जाऊन केवळ चवथी भक्तीच तेथें उल्हासानें प्रकट होते. ६६ माझी भक्ति हें एक

चौथी । हे साधकांची साधनभ्रांती । बहुत भक्ती मज नाहीं ॥ ६७ ॥ तेचि माझी मुख्य भक्ती । येणें साधनें होय प्राप्ती । जे भक्तीस्तव भक्त म्हणविती । ब्रह्मा उमापति सनकादिक ॥ ६८ ॥ निःशेष मावळल्या अहंकृती । भूतें निजात्मरूप दिसती । माझ्या स्वरूपाची सहजस्थिती । ते माझी मुख्य भक्ति उद्धवा ॥ ६९ ॥ ये भक्तीच्या लेशस्थिती । आर्त जिज्ञासु अर्थार्थी । प्रकाशले गा वर्तती । निजस्वार्थी साधक ॥ २७० ॥ हेंचि आर्ताच्या विषयीं । आर्तीतें प्रकाशी पाहीं । मग आर्तु ऐसें त्याच्या ठायी । नांवाची नवायी उपतिष्ठे ॥ ७१ ॥ रोगिया नांव आर्तता । हें व्याख्यान नव्हे परमार्था । भगवत्प्राप्ती चित्तीं व्यथा । ते आर्तता परमार्थीं ॥ ७२ ॥ जो भगवंताचे प्राप्तीलागीं । कडां घालूं धांवे वेगीं । कां रिघों पाहे जळते आगीं । ते आर्त सवेगीं बोलिजे ॥ ७३ ॥ आर्ताची स्थिति ऐसी । जिज्ञासु वारी त्यासी । मनुष्यदेह ब्रह्मप्राप्तीसी । तो आत्महत्येसी नका योजूं ॥ ७४ ॥ मागील भक्त कोणे रीतीं । जाणोनि पावले भगवद्भक्ती । जीवेंभावें त्या विवरी युक्ती । जिज्ञासु निश्चितीं या नांव ॥ ७५ ॥ मज जाणावयाची ऐशी जे आशा । तीतें म्हणती शुद्ध जिज्ञासा । तेही प्रकाशक माझ्या प्रकाशा । मी जिज्ञासु ऐसा तेणें जाणें ॥ ७६ ॥ ब्रह्मप्रापका युक्तीचा ठसा । या नांव शुद्ध जिज्ञासा । वेदशास्त्रजाणीववळसा । लौकिक जिज्ञासा त्या नांव ॥ ७७ ॥ सर्वां अर्थीं मीचि अर्थना । शुद्ध अर्थार्थी या नांव जाणा । म्हणती अर्थार्थी द्रव्यकामना । ते मंद व्याख्याना प्रवर्तती ॥ ७८ ॥ दृष्टी पडे नाना अर्थीं । जो विवंचोनि लावी परमार्थीं । त्या नांव बोलिजे अर्थार्थी । त्यातेंही निजभक्ती प्रकाशे माझी ॥ ७९ ॥ एवं आर्त जिज्ञासु अर्थार्थी । त्यांतें प्रकाशे माझी सहजभक्ती । तीतें भक्त चतुर्धा मानिती । अधिकारस्थितिविभागें ॥ २८० ॥ भक्त कल्पनेचिया भ्रांती । माझी भक्ति चतुर्धा मानिती । ते मिथ्या गा वदंती । माझी निजभक्ती एकली ॥ ८१ ॥ ऐशिये निजभक्तीची प्राप्ती । आत्मनिवेदनाची स्थिती ।

खरोखर माझें भांडवल आहे. तिला दुसरी, तिसरी, चवथी समजणें ही साधकाची निव्वळ भ्रांति आहे. माझ्या अनेक भक्ति नाहींत. ६७ ज्या साधनानें माझी प्राप्ति होते, तीच माझी मुख्य भक्ति होय. याच भक्तीमुळें ब्रह्मदेव, शंकर, सनकादिक हे माझे भक्त म्हणवितात. ६८ उद्धवा ! अहंकार निःशेष नाहींसा झाला, सर्व प्राणिमात्र आत्मरूप दिसूं लागले म्हणजे सहजच कळणारें माझें स्वरूप जाणतां येतें. हीच माझी श्रेष्ठ भक्ति होय. ६९ या भक्तीचा अंश प्राप्त होतांच आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी या नांवांनीं हे साधक स्वार्थांत प्रवृत्त होतात. २७० हीच भक्ति आर्त जीवाच्या मनांत आर्तता उत्पन्न करिते, म्हणून आर्त या शब्दांत नावीन्य येतें. ७१ रोग्यालाहि आर्त म्हणतात. पण येथें आर्त शब्दाचा तो अर्थ विहित नाहीं. परमार्थिक आर्तता म्ह० भगवत्प्राप्तीसाठीं मनाला वाटणारी तळमळ, हाच अर्थ येथें उत्पन्न होतो. ७२ जो साधक परमात्म्याच्या प्राप्तीसाठीं उंच कड्यावर धांवत जातो, जळल्या आगींत उडी टाकितो, त्याला खरा आर्त असें म्हणतात. ७३ आर्ताची स्थिति अशी असते. जिज्ञासु त्याचें निवारण करितो. (तो म्हणतो कीं,) मनुष्यदेह ब्रह्मप्राप्तीसाठीं आहे. त्याचा आत्महत्येनें नाश करूं नका. ७४ पूर्वीचे भक्त कोणत्या साधनानें भगवद्भक्तीला प्राप्त झाले, हें समजून घेऊन जो जीवा-भावानें त्या युक्तीचा विचार करीत असतो, त्याला जिज्ञासु असें म्हणतात. ७५ मला जाणण्याची जी आशा तिला जिज्ञासा म्हणतात. ७६ माझ्या स्वरूपाला प्रकट करणारा परब्रह्मप्राप्तीचा जो युक्तीचा ठसा त्यालाच शुद्ध जिज्ञासा म्हणतात. वेदशास्त्राच्या अर्थज्ञानासंबंधानें जो प्रयत्न ती लौकिक जिज्ञासा होय. ७७ सर्व अर्थांमध्यें माझेंच मागणें, याला खरा अर्थार्थी म्हणतात. अर्थार्थी म्हणजे द्रव्याची इच्छा करणारा, असा जे अर्थ करितात, ते मंद-मति चुकीचा अर्थ लावितात, असें समज. ७८ जेवढ्या वस्तु त्याच्या दृष्टीस पडतात, त्या सर्वांचा विचार करून जो परमार्थ वस्तूकडे लक्ष लावितो, त्यालाच अर्थार्थी म्हणतात. त्यालाहि माझी भक्ति प्रकाशित करिते. ७९ याप्रमाणें आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी यांना माझी सहज भक्ति प्राप्त होते, पण भक्त आपापल्या अधिकाराप्रमाणें ती भक्ति चार प्रकारची मानितात. २८० भक्त केवळ कल्पनेच्या भ्रमानें माझी भक्ति जरी चार प्रकारची समजतात, तरी तें त्यांचें म्हणणें खोटें आहे. माझी भक्ति फक्त एकच आहे. ८१ उद्धवा ! अशी माझी श्रेष्ठ भक्ति कशी प्राप्त करून घ्यावी व आत्मनिवेदन

उद्धवा म्यां तुजप्रती । यथानिगुती निरूपिली ॥ ८२ ॥ माझिये निजभक्तीचें सार । भक्त पावले जे साचार । त्यांचे सर्वही व्यापार । मदाकार होऊनि ठाकती ॥ ८३ ॥ तो जेउती वास पाहे । ते दिशाचि मी होऊनि ठायें । तो जेउतें चालत पायें । ते धरा मी होयें धराधर ॥ ८४ ॥ तो करूं बैसल्या भोजन । षड्रस होयें मी आपण । त्यासी करावया प्राशन । निजजीवन मी होयें ॥ ८५ ॥ त्यासी चालतां निजपदीं । बोधें दृश्याची निवारी मांदी । शांति पायघड्या घालीं आधीं । करीं पदोपदीं निंबलोण ॥ ८६ ॥ शम दम आज्ञाधारी । हात जोडूनि उभे द्वारीं । ऋद्धिसिद्धी दासी घरीं । विवेक कामारी घरींच सदा ॥ ८७ ॥ त्याचा बैसता अवकाश । अंगें मी होय हृषीकेश । तो निजावया सावकाश । समाधि मी त्यास आंथुरीं ॥ ८८ ॥ तो जे कांहीं बोल बोले । तें निःशब्द ब्रह्म शब्दा आलें । यालागीं श्रोत्यांसी वहिलें । होय भलें समाधान ॥ ८९ ॥ तो अवलीला बोले बोठीं । शब्दासवें माझीं गोठी उठी । श्रोत्यांची तेथ पडे मिठी । स्वभावें गोठी ऐकतां ॥ २९० ॥ चढतां परेचे उपरी । वैकुंठ कैलास पायरी । उन्मनी घालोनि बाहेरी । सुखशेजारीं तो पहुडे ॥ ९१ ॥ मिळोनियां मुक्ती चारी । पाणी वाहती त्याच्या घरीं । श्रीसहित राबें मी श्रीहरी । येरांची थोरी कोण पुसे ॥ ९२ ॥ अवचटें ये त्याच्या मुखासी । म्हणे ज्यासी तूं उद्धरलासी । तो माथां वाहें मी हृषीकेशी । शब्दें निजधामासी पाठवीं वेगीं ॥ ९३ ॥ जे पावले माझी सहजभक्ती । त्यांचे लळे पाळीं मी या रीतीं । त्यांची मज अनन्य प्रीती । सांगो किती उद्धवा ॥ ९४ ॥ बहुत बोली काय कारण । मी देहो तो आत्मा जाण । तो माझा जीवप्राण । हे जाणती खूण निजभक्त ॥ ९५ ॥ नांदतां सहजभक्तिआंत । मी देवो तो माझा भक्त । येरवीं मी सगळा त्याआंत । तो समस्त मजमाजीं ॥ ९६ ॥ निजभक्त मजभीतरीं । मी तया आंतबाहेरी । ऐसें सामरस्यें नांदों भारी । वेगळे बाहेरीं नाममात्रें ॥ ९७ ॥ माझिया सायुज्या जे आले । ते मीचि होऊनियां ठेले । परी मी होऊनि मज भजले ।

कसें करावें; हें मीं तुला स्पष्टपणें सांगितलें. ८२ माझें हें भक्तीचें सार ज्या भक्तांच्या हातीं आलें त्यांचे सर्व व्यवहार मद्रूपच होऊन रहातात. ८३ जो जिकडे वाट पहातो, ती दिशाच मी होतों. तो जेथें पाऊल ठेवून चालतो, ती भूमीच मी पृथ्वीधारक होतों. ८४ तो जेवीत असतां मीच षड्रस होतों. त्याचें पिण्याचें पाणीहि मीच होतों. तो पायांनीं चालत असतां मी आत्मज्ञानानें दृश्याचें निवारण करितों. शांति पायघड्या घालीत असते व पावलो-पावलीं लिंब-लोण उतरीत असते. ८६ शम-दम त्याचे आज्ञाधारक होऊन हात जोडून दारांत उभे रहातात. ऋद्धिसिद्धि त्याच्या घरीं दासी होऊन रहातात आणि विवेक त्याचा चाकर होऊन घरीं राबत असतो. ८७ त्याची बसण्याची जागा मी स्वतः श्रीहरि होतों. त्याला स्वस्थपणें झोंप यावी म्हणून मीच त्याला समाधीचें अंथरूण घालून देतों. ८८ तो जेवढे शब्द उच्चारितो, त्यांत निःशब्द परब्रह्मच प्रकट होतें. त्यामुळें श्रोत्यांचें तत्काल समाधान होतें. ८९ तो सहज जरी कांहीं बोलला तरी त्याच्या शब्दाबरोबर माझीच गोष्ट त्याच्या तोंडांतून बाहेर पडते व ती ऐकत असतां श्रोते स्वभावतःच त्यांत तल्लीन होतात. २९० परावाणीच्या पलीकडे असतां वैकुंठ व कैलास या पायऱ्या ओलांडून व उन्मनीलाहि बाहेर घालवून तो आत्मसुखाशेजारीं जाऊन निजतो. ९१ चारी मुक्ति एकत्र जमून त्याच्या घरीं पाणी भरतात आणि मी स्वतः श्रीहरि लक्ष्मीसह त्याच्या घरीं राबत असतों. तेव्हां त्याची थोरवी काय सांगावी ! ९२ 'तूं उद्धरलास' असे शब्द सहज जरी तो एखाद्याला बोलला, तरी मी श्रीहरि त्याचे ते शब्द शिरसा मान्य करितों व तत्काल त्या जीवाला वैकुंठाला पाठवितों. ९३ उद्धवा ! जे भक्त माझ्या परम भक्तीला पोंचविले आहेत, त्यांचे सगळे लाड मी अशाप्रकारें पुरवितों. त्यांच्यावर माझें केवढें निःसीम प्रेम असतें, तें किती वर्णावें ! ९४ फार काय सांगावें, उद्धवा ! मी देह व तो आत्मा, तो मला जीव कीं प्राण वाटतो. त्याची खूण माझा भक्तच काय तो जाणे. ९५ सहज भक्तीमध्यें असतांना मी देव व तो माझा भक्त असतो. एरवीं मी सगळा त्याला व्यापून असतों व तो मजमध्यें असतो. ९६ माझा भक्त माझ्या आंत व मी त्याच्या आंत-बाहेर अशा एकत्वानें आम्ही रहात असतों. बाहेरून नांवाला मात्र आम्ही वेगळें दिसतों. ९७ जे भक्त माझी सायुज्य मुक्ति मिळविण्यासाठीं आले, ते मद्रूपच होऊन

ते भक्त मानिले म्यां ऐसे ॥ ९८ ॥ सायुज्यापरीस भक्ति गोड । याचि निरूपणाचें कोड । उद्धवा तुझी जाणोनि चाड । विशद निवाड सांगीतला ॥ ९९ ॥ ऐशिया माझ्या निजभक्तांसी । अवशेष अर्थ नुरेचि त्यांसी । मी तुष्टलों गा हृषीकेशी । निजभावासी सर्वस्वें ॥ ३०० ॥ भक्तिप्राधान्य भागवतशास्त्र । तें भक्तीचें निजसार । तुज मी सांगीतलें साचार । अत्यादरपूर्वक ॥ १ ॥ उद्धवा तुझे प्रीतीचेनि व्याजें । मज गुह्याचें निजगुह्य हें जें । तें भक्तीचें करूनियां खाजें । तुज म्यां वोजें दीधलें ॥ २ ॥ म्यां सांगीतलें जैशा रीतीं । तैशी सेवावी माझी निजभक्ती । ऐसें बोलतां श्रीपती । उद्धव प्रीतीं उचलिला ॥ ३ ॥ मागां टाकूनि पीतांबरें । सांडोनियां शंखचक्रें । उद्धव उचलिला श्रीधरें । तरी प्रेम न सांवरे देवाचें ॥ ४ ॥ हाव न बाणेचि दों करीं । मग चारी भुजा पसरी । उद्धवातें हृदयावरी । प्रीती थोरीं आलिंगी ॥ ५ ॥ हृदयीं हृदय एक जाहलें । ये हृदयींचें ते हृदयीं घातलें । कृष्णें सर्वस्व जें आपुलें । तें हृदयीं सूदलें उद्धवाचे ॥ ६ ॥ देव अवाप्तकाम निचाड । त्यासी ही भक्तीची ऐसी चाड । अतिशयें उद्धवा लागली गोड । स्वानंदें कोड पुरवी त्याचें ॥ ७ ॥ उद्धवप्रेमाचा लवलाहो । आलिंगन सोडूं विसरे देवो । कृष्णहृदया हृदय जडल्या पहा वो । उद्धवा उद्धवो विसरला ॥ ८ ॥ ऐसें स्वानन्दीं वाडाकोडा । दोघेही मिसळले निचाडचाडा । भक्तिसुखाच्या सुरवाडा । उद्धव गाढा मीनला ॥ ९ ॥ कृष्णें सर्वस्व आपुलें । उद्धवाचे हृदयीं सूदलें । हें उद्धवा कळों नाहीं दीधलें । लाघव केलें गोविंदें ॥ ३१० ॥ हा अर्थ कळला उद्धवासी । हा येईल मजसीं ऐक्यासी । पुढील कथा सुरस ऐसी । मग कोणापाशीं सांगावी ॥ ११ ॥ उद्धवा मज वाडेंकोडें । अखंड हेंचि बोलों आवडे । परी तैसा श्रोता न जोडे । हें थोर सांकडें मजलागीं ॥ १२ ॥ भक्तिसुखाचा सुरवाड । सांगतां माझें पुरे कोड । ऐसा श्रोता कैंचा गोड । यालागीं उद्धवा आड प्रेम सूये ॥ १३ ॥ सूर्यापासूनि फांकती किरण । तैसें सुटलें आलिंगन ।

राहिले. पण मद्रूप होऊनच ज्यांनीं माझी भक्ति केली, ते माझे भक्त मला माझ्यासारखेच वाटतात. ९८ सायुज्य-मुक्तीहून भक्ति गोड असते. उद्धवा ! या निरूपणाची तुला आवड आहे, असें जाणून मीं तुला हें स्पष्ट करून सांगितलें. ९९ असे जे माझे भक्त असतात, त्यांना दुसऱ्या कसल्याहि लाभाची अपेक्षा नसते. मी हरि त्यांच्या भक्तीनेंच सर्वस्वीं संतुष्ट होतों. ३०० हें भागवतशास्त्र भक्तिप्रधान आहे. त्या भक्तीचें सार मीं तुला अतिशय आदरपूर्वक सांगितलें. १ उद्धवा ! तुझ्यावरील प्रीतीमुळें माझ्या गुह्याचेंहि गुह्य अशा भक्तीचें खाजें करून तें मीं तुला मोठ्या प्रेमानें दिलें. २ मीं सांगितलेल्या प्रकारानें माझी भक्ति करावी, असें बोलून श्रीकृष्णानें उद्धवाला मोठ्या प्रेमानें उचलून घेतलें. ३ पीतांबर सांवरून, हातांतील शंख-चक्र बाजूला टाकून, देवानें उद्धवाला उचलिलें, तरी त्याच्या प्रेमाचा भर कमी होईना. ४ त्याला दोन हातांनीं कंवटाळून तृप्ति होईना; तेव्हां भगवानानें आपले चारी हात पसरले व उद्धवाला हृदयाशीं धरून परम प्रीतीनें आलिंगन दिलें. ५ तेव्हां दोन हृदयें एक झालीं व या हृदयांतील गुह्य त्या हृदयांत शिरलें. कृष्णानें आपलें सर्वस्व उद्धवाच्या हृदयांत घातलें. ६ देव पूर्णकाम व निष्काम असूनहि त्याला भक्तीची अशी आवड आहे. उद्धवाला हरिभक्तीची गोडी लागली, म्हणून त्यानें आनंदानें त्याचे लाड पुरविले. ७ उद्धवावरील प्रेमातिशयामुळें देव त्याला घातलेली मिठी सोडण्यास विसरला व श्रीकृष्णाच्या हृदयाला हृदय भिडतांच उद्धव स्वतःला विसरला. ८ अशा स्वानंदांत ते दोघेहि मोठ्या प्रेमानें मिसळले. भक्तिसुखाच्या पुरांत उद्धव बुडाला. ९ तेव्हां श्रीकृष्णानें आपलें सर्वस्व उद्धवाच्या हृदयांत ओतलें; पण तें उद्धवाला कळूं दिलें नाहीं. असें गोविंदानें आपलें चातुर्य दाखविलें. ३१० (कारण त्यास असें वाटलें कीं,) 'उद्धवाला जर हें कळलें तर तो मद्रूपच होईल. मग पुढली ही सुरस कथा कोणाला सांगावी !' ११ उद्धवाचें मजवर फार प्रेम आहे. त्याला अखंड हेंच बोलणें आवडतें. पण त्याच्यासारखा दुसरा श्रोता मला मिळणार नाहीं; हेंच मला मोठें संकट पडलें आहे. १२ भक्तिसुखाचा महिमा सांगण्याची मला फार हौस आहे, पण असा प्रेमळ श्रोता मला कोठें मिळणार ! म्हणून त्यानें उद्धवाच्या आड आपलें प्रेम ठेविलें. १३ सूर्यापासून त्याचे किरण जसे फांकतात, तसें त्या दोघांचें आलिंगन सुटलें व श्रीकृष्ण आणि उद्धव

कृष्ण उद्धव जाहले भिन्न । परी अभिन्नपण मोडेना ।। १४ ।। पुढील कथेची संगती । दूर ठेली श्लोक- संगती । श्रोतां विरुद्ध न घ्यावें चित्तीं । समूळार्थ निश्चितीं विचारावा ।। १५ ।। मूळींचें पद संकोचित । तेथ उत्तम भक्तिभावार्थ । स्वयें बोलिला श्रीकृष्णनाथ । तोचि म्यां अर्थ विस्तारिला ।। १६ ।। नारळां- तल्या वस्त्राची घडी । उकलितां थोर वाढे वाढी । तेवीं मूळपदाची घडामोडी । कथा एवढी विस्तारली ।। १७ ।। मूळपदाचा पदपदार्थ । श्लोकीं पहावा सावचित्त । श्लोकउत्तरार्धीं भगवंत । ध्वनितार्थ बोलानि गेला ।।१८।। त्याचि ध्वनिताचे पोटीं । होती भक्तिरहस्याची पेटी । ते म्यां उघडूनि दाविली दिठीं । वृथा चावटी झणें म्हणाल ।।१९।। तंव श्रोते म्हणती नवल येथ । मूळींचें पद होतें गुप्त । तें काढिलें भक्ति- सारामृत । हृदयस्थ हरीचें ।। ३२० ।। तुझे हृदयीं कृष्णनाथ । प्रकटोनि आपुलें हृद्गत । ग्रंथीं असे बोलवित । हें सुनिश्चित कळलें आम्हां ।। २१ ।। आह्मां ऐकतां भक्तिसारामृत । चित्तीं चैतन्य उधळत । होशी देखणा सुनिश्चित । ग्रंथ यथार्थ अर्थिला ।। २२ ।। हें ऐकोनि संतांचें वचन । हरिखला एकाजनार्दन । मस्तकीं वंदिले श्रीचरण । पुढील निरूपण अवधारा ।। २३ ।। निजभक्तीचें दृढीकरण । आदरें करिताहे श्रीकृष्ण । सांगीतलें तेंचि निरूपण । पुढती जाण सांगत ।। २४ ।।

यदात्मन्यर्पितं चित्तं शान्तं सत्त्वोपबृंहितम् । धर्मं ज्ञानं सवैराग्यमैश्वर्यं चाभिपद्यते ।। २५ ।।

आपुलें जें कां अंतःकरण । तें करितां मदर्पण । माझी निजभक्ति उल्हासे जाण । जिचें निरूपण म्यां केलें ।। २५ ।। मद्रूपीं अर्पावया मन । सुगम वर्म सांगेन जाण । माझें करितां नामस्मरण ।

एकमेकांपासून दूर झाले. तरी त्यांचें परस्पर ऐक्य सुटलें नाहीं. १४ पुढल्या कथासंदर्भानें श्लोकाची संगति लांब राहिली, म्हणून श्रोत्यांनीं मनांत विकल्प आणूं नये; मुळांतील अर्थाचा चांगला विचार करावा. १५ मुळांतील पद संक्षिप्त आहे. त्यांत श्रीकृष्णानें स्वतः भक्तिभावार्थ उत्तम प्रकारें विशद केला आहे. तोच अर्थ मीं विस्तार करून सांगितला. १६ नारळांत घालून आणलेल्या वस्त्राची घडी उलगडली असतां ती जशी लांब होते, त्याप्रमाणें मूळ पदाचें व्याख्यान करितांच एवढा विस्तार झाला. १७ मुळांतील पदें व त्या पदांचा अर्थ श्लोकांत विचारपूर्वक पहावा, म्हणजे त्या श्लोकाच्या उत्तरार्धांत भगवानानें आपला हाच मथितार्थ ध्वनित केल्याचें दिसेल. १८ त्या ध्वनितार्थांत भक्तिरहस्याची पेटी होती. तीच मीं उघडून तुम्हांला दाखविली, म्हणून ही कांहीं तरी बडबड आहे, असें समजूं नका. १९ तेव्हां श्रोते म्हणाले कीं, हें मोठेंच आश्चर्य घडलें. मुळांतील पद अत्यंत गूढ असूनहि त्यांतील हरीच्या हृदयींचें हें भक्तिसारामृत तूं काढिलेंस; ३२० श्रीकृष्णनाथानें तुझ्या हृदयांत प्रवेश करून आपलें हृद्गतच ग्रंथरूपानें बोलविलें; हें आम्हांला आतां पक्कें कळून चुकलें. २१ हें भक्तिसारामृत श्रवण करितांच आमचें हृदय ज्ञानानें उचंबळूं लागलें. तूं निःसंशय चतुर खरा, म्हणूनच ग्रंथाचा खरा अर्थ आम्हांला सांगितलास. २२ हें संतांचें बोलणें ऐकून एका जनार्दन संतुष्ट झाला. त्यानें श्रीचरणांस मस्तकानें वंदन केलें. आतां पुढील निरूपण ऐका. २३ श्रीकृष्ण आपली भक्ति आदरपूर्वक दृढ होण्यासाठीं पूर्वीं सांगितलेलें कथानकच पुढें चालवीत आहे. ३२४.

—यापुढील दोन श्लोकांनीं 'फार काय सांगूं ! अंतर्निष्ठ चित्तच अर्थाचें कारण आहे. बहिर्निष्ठ चित्त अनर्थाचें कारण आहे' असें सांगतात—

यदा आत्मनि अर्पितं चित्तं शांतं सत्त्वोपबृंहितं भवति—ज्यावेळीं मज आत्म्यामध्यें अर्पिलेलें चित्त शांत व शुद्ध सत्त्वयुक्त होतें, तदा पुमान् धर्मं सवैराग्यं ज्ञानं ऐश्वर्यं च अभिपद्यते—तेव्हां पुरुष धर्म, वैराग्यासह ज्ञान व ऐश्वर्य यांस प्राप्त होतो. २५.

आपलें अंतःकरण मला अर्पण केलें असतां माझी भक्ति उल्हासानें वाढते, हें मीं पूर्वीं सांगितलेंच आहे. २५ आतां माझ्या स्वरूपांत मन अर्पण करण्याची सोपी युक्ति मी तुला सांगतों. माझें नामस्मरण केलें असतां सर्व पातकांचा

पापनिर्दळण तेणें होय ॥ २६ ॥ सकाम स्मरतां नाम । नाम पुरवी सकामकाम । निर्विकल्पें स्मरतां नाम । करी भस्म पापाचें ॥ २७ ॥ होतां पापाचें क्षाळण । रजतमें जिणोनि जाण । सहजें वाढे सत्वगुण । धर्मपरायण धार्मिक ॥ २८ ॥ स्वयें धर्मनिष्ठ सत्वगुणें । अढळ पडे वैराग्याचें ठाणें । वैराग्यें विषय निर्दळणें । निजज्ञान तेणें प्रकाशे ॥ २९ ॥ वाढल्या सविवेक ज्ञान । लागे स्वरूपाचें अनुसंधान । चढे शांतीचें समाधान । तैं मदर्पण मन होये ॥ ३३० ॥ मन जाहल्या मदर्पण । निजभक्ति उल्हासे जाण । जिचे गत श्लोकीं निरूपण । मी संपूर्ण सांगीतलें ॥ ३१ ॥ निजभक्ति पावल्या संपूर्ण । भक्तें न मागतां जाण । अष्ट महासिद्धी आपण । त्याचें आंगण वोळंगती ॥ ३२ ॥ जो सिद्धींकडे कदा न पाहे । त्यासी अवशेष कोण अर्थ राहे । माझी संपूर्ण पदवी लाहे । मदैक्य होये मद्भक्तां ॥ ३३ ॥ ऐशी न जोडतां माझी भक्ती । न लभतां आत्मस्थिती । वर्तणें जैं विषयासक्तीं । तैं अनर्थप्राप्ति अनिवार ॥ ३४ ॥

यदर्पितं तद्विकल्पे इन्द्रियैः परिधावति । रजस्वलं चासन्निष्ठं चित्तं विद्धि विपर्ययम् ॥ २६ ॥

जो सत्य न मानी वेदशास्त्रार्थ । साच न म्हणे जो परमार्थ । जो गृहदाराद्रव्यासक्त । लोलंगत विषयासी ॥ ३५ ॥ तेणें अत्यंत समळमेळें । दारुण रजोगुण खवळे । तेणें चित्त होय ज्ञानांधळें । विपरीत कळे ज्ञानार्थ ॥ ३६ ॥ ज्यासी विषयांच्या युक्ति गहन । त्यासी म्हणती अतिसज्ञान । जो करी युक्तीचें छळण । तो होय मान्य पंडितपणें ॥ ३७ ॥ ज्यासी प्रपंचाचा अतिविस्तार । त्यास म्हणती भाग्य थोर । जो नाना भोगीं पाळी शरीर । सुकृती नर त्या म्हणती ॥ ३८ ॥ जो अनुतापी

नाश होतो. २६ मनांत कामना ठेवून नामस्मरण केल्यास तें नाम सर्व इच्छा पूर्ण करितें. निष्काम बुद्धीनें नामस्मरण केलें असतां सर्व पातकें जळून जातात. २७ पातकांचा नाश झाला म्हणजे रज व तम यांना जिंकून धर्मपरायण धार्मिक सत्त्वगुण सहजच वाढतो. २८ सत्त्वगुणानें तो धर्मनिष्ठ होतो. वैराग्याचें कायमचें ठाणें बसतें आणि त्यायोगें आत्मज्ञान प्रकट होतें. २९ विवेकासह ज्ञान वाढलें म्हणजे स्वरूपाचें चिंतन अनायासें होतें, शांतीचें समाधान वाढत जातें व मन मदर्पण होतें. ३३० मन मदर्पण झालें कीं, माझ्या भक्तीचा विकास होतो. तिचें सविस्तर निरूपण मीं मागल्या श्लोकांत केलेंच आहे. ३१ अशी माझी पूर्ण भक्ति साध्य झाली कीं, अष्टसिद्धि आपण होऊनच त्याच्या दारांत तिष्ठत रहातात; ३२ पण त्या सिद्धींकडे तो भक्त कधीं ढुंकूनहि पहात नाहीं. कारण माझ्या भक्ताचें माझ्याशीं तादाम्य झाल्यामुळें त्यांस माझी सगळी सत्ता प्राप्त होते; मग त्यांस मिळविण्यासारखें बाकी काय उरणार ! ३३ पण माझी अशी भक्ति न जोडितां व आत्मस्थितीला न पोंचतां केवळ विषयासक्तींतच प्रवृत्त झाल्यावर अनिवार अनर्थ कोसळतो. ३३४.

—आतां हाच अर्थ व्यतिरेकानें दृढ करितात—

यत् तत् चित्तं विकल्पे अर्पितं इंद्रियैः परिधावति— ज्यावेळीं तें चित्त देह-गृहादि विकल्पांमध्यें अर्पिलेलें असें होत्सातें इंद्रियांच्या द्वारां सर्व विषयांकडे धांवतें तेव्हां तें, **रजस्वलं च असन्निष्ठं विपर्ययं विद्धि**—अत्यंत मलिन व असत् विषयांमध्यें तत्पर होतें व त्यामुळें अधर्मादिक उत्पन्न होतात, असें तूं जाण. २६.

जो वेद-शास्त्रार्थ खरा मानीत नाहीं; परमार्थाला सत्य म्हणत नाहीं, घर-दार-स्त्री-पुत्र-द्रव्य यांत आसक्त होऊन विषयांतच लोलुप होतो, ३५ त्यामुळें त्यांच्याच दृढ सहवासानें त्याचा रजोगुण खवळतो व त्याचें चित्त ज्ञानाविषयीं आंधळें होतें. त्याला ज्ञानाचा विपरीत अर्थ दिसूं लागतो. ३६ ज्यांना विषयोपभोगाचे नाना प्रकारचे उपाय सुचतात, त्यांना तो मोठा ज्ञानी समजतो व जे छळवादाच्या युक्ति लढवितात त्यांना तो पंडित म्हणत असतो. ३७ ज्यांच्या मागें प्रपंचाचा फार मोठा विस्तार असतो, त्यांना तो फार भाग्यवान् मानितो व जे लोक अनेक उपचारांनीं शरीराचें पोषण करितात त्यांस तो पुण्यवान् म्हणतो. ३८ ज्यांना परमार्थाविषयीं तळमळ लागते, त्यांस तो अति दुःखी सम-

परमार्थविखीं । त्यासी म्हणती परम दुःखी । जो नाना विषयांतें पोखी । त्यातें महासुखी मानिती ॥ ३९ ॥ ज्याचेनि बोलें मनुष्य मरे । त्याचें सिद्धत्व मानिती खरें । जो उदास राहटे अनाचारें । मुक्त निर्धारें तो म्हणती ॥ ३४० ॥ ज्याचा दांभिक आचार । त्यातें म्हणती पवित्र नर । जे स्त्रियादि शूद्रां देती मंत्र । ते ज्ञाते थोर मानिती ॥ ४१ ॥ जो कां अनुतापी वैरागी । त्यातें म्हणती अतिअभागी । जो उघड विषयांतें भोगी । तो राजयोगी मानिती ॥ ४२ ॥ स्वयें द्रव्याचा अभिलाखी । द्रव्य वेंची मूर्ख लोकीं । त्यातें म्हणती अतिविवेकी । धर्मज्ञ लोकीं हा एक ॥ ४३ ॥ ज्याचे गांठी बहुसाल धन । तो सर्वांसी अवश्य मान्य । तोचि पवित्र तोचि सज्ञान । ऐसें विपरीत ज्ञान हों लागे ॥ ४४ ॥ आपण सर्वात्मा सर्वेश । हें विसरोनियां निःशेष । अधर्मी अकर्मी अनीश । मी अज्ञान पुरुष हें मानी ॥ ४५ ॥ तेथ कैं उपजे माझी भक्ती । कैसेनि होईल माझी प्राप्ती । ऐसे भ्रमले नेणों किती । संसारआवर्तीं वर्तता ॥ ४६ ॥ परमात्मप्राप्तीचीं कारणें । अतिगुह्य चारी लक्षणें । पोटांतील कृपागुणें । उद्धवाकारणें हरि सांगे ॥ ४७ ॥ धर्माची भजनभोय । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य । माझी प्राप्ति अवश्य होय । हे चारी उपाय अवधारीं ॥ ४८ ॥

धर्मो मद्भक्तिकृत्प्रोक्तो ज्ञानं चैकात्म्यदर्शनम् । गुणेष्वसङ्गो वैराग्यमैश्वर्यं चाणिमादयः ॥ २७ ॥

ऐक उद्धवा निजधर्म । गुह्य सांगेन मी परम । माझी भक्ति जे सप्रेम । उत्तम धर्म तो जाण ॥ ४९ ॥ ऐक्यें एकात्मता निजबोध । परतोनि कदा नुपजे भेद । या नांव गा ज्ञान शुद्ध । कृष्ण परमानंद सांगत ॥ ३५० ॥ धनधान्य रत्नांच्या राशी । उर्वशी आल्या शेजारासी । तें अवघें तृणप्राय

जतो व जे अनेक विषयांचा उपभोग घेतात, त्यांस तो महासुखी मानितो. ३९ ज्याच्या तोंडून शब्द निघतांच एखादा मनुष्य मरण पावतो, त्याचा सिद्धपणा तो खरा समजतो व दुराचारी स्वच्छंदानें वागणारास तो मुक्त म्हणतो. ३४० दांभिक आचरण करणारांस मोठा पवित्र मनुष्य म्हणतो. जे लोक ढोंगी स्त्रियांना व शूद्रांना गुरुमंत्र देतात, त्यांना तो मोठा ज्ञानी समजतो. ४१ जे पश्चात्तापानें विरक्त झालेले लोक असतात त्यांना तो अतिशय अभागी म्हणतो आणि जे उघडपणें विषयभोग घेतात त्यांना तो राजयोगी म्हणतो. ४२ जो स्वतः द्रव्याचा अभिलाष करणारा व मूर्ख लोकांत द्रव्याचा अपव्यय करणारा, त्याला तो मोठा विवेकी व जगांत हाच मोठा धर्मज्ञ असें समजतो. ४३ ज्याच्यापाशीं विपुल द्रव्य असतें त्याला सर्व लोक मान देतात. तो मोठा पवित्र व ज्ञानी समजला जातो. असें विपरीत ज्ञान होऊं लागतें. ४४ आपण स्वतःच सर्वात्मा सर्वेश आहोंत हें विसरून अज्ञ जीव स्वतःला अधर्मी, अकर्मी व दुर्बल मानितो. ४५ अशा स्थितींत माझी भक्ति कशी उपजणार व माझी प्राप्ति कशी होणार ! अशा प्रकारें या संसाररूपी भोंवऱ्यांत सांपडून किती जीव भ्रमांत पडले आहेत, त्याची गणति नाहीं. ४६ परमात्म्याच्या प्राप्तीला कारण होणारीं चार लक्षणें आहेत. तीं जरी अतिशय गुह्य आहेत तरी तीं हृदयांतील वात्सल्यामुळें श्रीहरि उद्धवाला सांगत आहे. ४७ भक्तीचीं मुख्य साधनें, अशा धर्म, ज्ञान, वैराग्य व ऐश्वर्य या चार उपायांनीं माझी प्राप्ति अवश्य होते. यास्तव तीं साधनें आतां ऐक. ३४८.

—आतां आपल्याला अभिप्रेत असलेल्या धर्मादिकांचें व्याख्यान करितात—

धर्मः मद्भक्तिकृत् प्रोक्तः—धर्म माझी भक्ति उत्पन्न करितो. म्हणूनच शास्त्रामध्यें त्याला सर्वोत्तम म्हटलें आहे, **ऐकात्म्यदर्शनं च ज्ञानं**—आणि सर्वत्र एकात्मत्वदर्शन हें ज्ञान आहे, **गुणेषु असङ्गः वैराग्यं**—विषयांमध्यें आसक्ति नसणें हेंच वैराग्य होय. **अणिमादयः च ऐश्वर्यं**—आणि अणिमादिक हेंच ऐश्वर्य आहे. २७.

हे उद्धवा ! आतां माझें परम गुह्यरहस्य तुला सांगतों, तें ऐक. माझी सप्रेम भक्ति हाच सर्वांत श्रेष्ठ धर्म होय, हें निश्चित जाण. ४९ ऐक्यानें एकात्मतेचा साक्षात् बोध होतो व पुनः कधीं भेद उत्पन्न होत नाहीं. त्यालाच शुद्ध ज्ञान असें म्हणतात, असें परमानंदरूपी श्रीकृष्ण म्हणाला. ३५० धनधान्यांच्या व रत्नांच्या राशी व

ज्यासी । वैराग्य त्यासी आम्ही म्हणों ॥ ५१ ॥ ऐक उद्धवा सुबुद्धी । माझ्या ज्या अष्ट महासिद्धी । मजवेगळ्या दूरी कधीं । जाण त्रिशुद्धी न ढळती कदा ॥ ५२ ॥ माझे निजभक्तीच्या निर्धारीं । जो माझी पदवी घे ऐक्यकरीं । माझ्या सिद्धि त्याच्या घरीं । होती किंकरी निजदासी ॥ ५३ ॥ सिद्धि सेवा करिती । हेंचि नवल सांगों किती । श्रीसहित मी श्रीपती । भक्तांची भक्ती सर्वस्वें करीं ॥ ५४ ॥ ऐश्वर्याचें मुख्य लक्षण । अतिशयेंसीं संपूर्ण । भगवत्पदवी घेणें आपण । अतिसंपन्न ऐश्वर्यें ॥ ५५ ॥ म्यां हे सांगीतली जे बोली । ते निजगुह्यभांडाराची किल्ली । येणें उघडूनि स्वानंदखोली । भोगीं आपुली सुखसिद्धि ॥ ५६ ॥ चहूं पदांचीं उत्तरें । वाखाणिलीं अतिगंभीरें । ऐकोनि उद्धव चमत्कारें । अत्यादरें विस्मित ॥ ५७ ॥ धर्मादि चहूं पदांचा अर्थ । अलोलिक सांगे श्रीकृष्णनाथ । यालागीं यमादिकांचा उत्तमार्थ । देवासी प्रत्यक्ष पुसों पां ॥ ५८ ॥ गुह्यार्थ सांगेल श्रीकृष्ण । यालागीं यमादिकांचे प्रश्न । उद्धव पुसताहे आपण । परमार्थ पूर्ण आकळावया ॥ ५९ ॥ पांच श्लोक पंचतीस प्रश्न । उद्धवें केले ज्ञानगहन । ज्यांचें ऐकतां प्रतिवचन । समाधान जीवशिवां ॥ ३६० ॥ पहिल्या श्लोकींचे सहा प्रश्न । दुसऱ्यामाजीं नव जाण । तिसरा चौथा आठ आठ पूर्ण । चारी प्रश्न पंचमीं ॥ ६१ ॥

उद्धव उवाच—यमः कतिविधः प्रोक्तो नियमो वाऽरिकर्षण ।
कः शमः को दमः कृष्ण का तितिक्षा धृतिः प्रभो ॥ २८ ॥

अहंरिपुदळणा श्रीपती । यमनियमप्रकार किती । शम दम कोण म्हणिजेती । तितिक्षा धृती ते कैशी ॥ ६२ ॥

उर्वशीसारख्या अप्सरा यांनाहि तो तृणासारखें मानितो. त्याच्याच अंगीं खरें वैराग्य बाणलें आहे, असें आम्ही म्हणतों. ५१ हे बुद्धिमान् उद्धवा, ऐक. ज्या माझ्या अष्टसिद्धि माझ्यापासून कधीं दूर जात नाहींत, ५२ त्या माझ्या भक्तिबळावर माझ्याशीं तादात्म पावणाऱ्या माझ्या भक्ताच्या घरीं, दासी होऊन राबत असतात. ५३ सिद्धि त्यांची सेवा करितात यांत आश्चर्य कसलें! मी प्रत्यक्ष श्रीपति लक्ष्मीसह भक्ताची सर्वस्वानें सेवा करीत असतों. ५४ ऐश्वर्याचें मुख्य लक्षण हें आहे कीं, आपण स्वतः भगवानाच्या योग्यतेस पोंचून ऐश्वर्यसंपन्न व्हावें. ५५ मीं जें हें तुला रहस्य सांगितलें, त्यानें मीं तुला ही माझ्या भांडाराची किल्लीच दिली आहे. तिनें आतां स्वानंदसुखाची खोली उघडून आपल्या आत्मसुखाचा अनुभव घे. ५६ चार पदांचें हें गंभीर व्याख्यान ऐकून उद्धवाला अत्यंत चमत्कार वाटला व तो अतिशय आदरानें विस्मित झाला. ५७ धर्मादिक चार पदांचा अर्थ श्रीकृष्णानें इतक्या उत्तम प्रकारें सांगितला, तेव्हां आतां यमादिकांचाहि गूढ अर्थ यासच विचारावा, ५८ असा विचार करून उद्धवानें परमार्थ समजून घेण्यासाठीं श्रीकृष्णाला यमादिकांविषयीं प्रश्न विचारिला. ५९ पुढील पांच श्लोकांत उद्धवानें गहन ज्ञानाविषयीं पस्तीस प्रश्न केले आहेत. त्या प्रश्नांचें उत्तर ऐकून जीव-शिवांना समाधान होईल. ३६० पहिल्या श्लोकांत सहा प्रश्न, दुसऱ्या श्लोकांत नऊ, तिसऱ्या व चवथ्या श्लोकांत प्रत्येकीं आठ व पांचव्या श्लोकांत चार प्रश्न आहेत. ३६१.

—श्रेष्ठ लोकांमध्यें प्रसिद्ध असलेल्या धर्मादिकांचें व्याख्यान तुम्हीं अगदीं निराळ्याप्रकारें केलें आहे, त्यावरून यमादिकांच्या संख्येमध्यें व स्वरूपामध्येंहि तुमच्या मतें कांहीं वैलक्षण्य असेल, असें समजून त्यांना विशेष जाणण्याची इच्छा करणारा उद्धव पुढील पांच श्लोकांनीं प्रश्न करितो—

उद्धवः उवाच—उद्धव म्हणाला, **अरिकर्षण**—हे शत्रुनाशका, **यमः नियमः वा कतिविधः प्रोक्तः**—यम किंवा नियम कितीप्रकारचा सांगितला आहे ! **कृष्ण**—हे श्रीकृष्णा ! **शमः कः दमः कः**—शम कोणता, दम कोणता, **प्रभो**—हे प्रभो ! **तितिक्षा का धृतिः का**—तितिक्षा कोणती व धृति कोणती ! २८.

अहंकाररूपी शत्रूचा नाश करणाऱ्या हे श्रीकृष्णा ! यम-नियमांचे किती प्रकार आहेत ? शम-दम कशाला म्हणतात ? तितिक्षा व धृति कशी असते ? ३६२.

किं दानं किं तपः शौर्यं किं सत्यमृतमुच्यते । कस्त्यागः किं धनं चेष्टं को यज्ञः का च दक्षिणा ॥ २९ ॥

कोण दान कोण तप येथ । शौर्य कोण कैसें तें सत्य । ऋत जें कां म्हणिजेत । तेंहि निश्चित सांगावें ॥ ६३ ॥ कोणता जी त्याग येथें । इष्ट धन कोण पुरुषातें । यज्ञ कशातें म्हणिजेतें । दक्षिणा येथें ते कायी ॥ ६४ ॥

पुंसः किंस्विद्बलं श्रीमन् भगो लाभश्च केशव । का विद्या ह्रीः परा का श्रीः किं सुखं दुःखमेव च ॥ ३० ॥

पुरुषासी बळाची कोण शक्ति । दया बोलिजे कोणे स्थितीं । लाभ कोणता गा श्रीपती । सांग कृपामूर्ती केशवा ॥ ६५ ॥ विद्या म्हणावें कशातें । लज्जा कोणे ठायीं वर्ते । उत्कृष्ट लक्ष्मी कोण येथें । तेंहि अनंतें सांगावी ॥ ६६ ॥ येथील कोण पां कैसें सुख । मज सांगावें कृपापूर्वक । सुखाचे सांगातीचें जें दुःख । त्याचेंही रूपक सांगावें ॥ ६७ ॥

कः पण्डितः कश्च मूर्खः कः पन्था उत्पथश्च कः । कः स्वर्गो नरकः कः स्वित्को बन्धुरुत किं गृहम् ॥३१॥

पंडिताचें काय लक्षण । मूर्ख म्हणावया कोण गुण । सुमार्ग म्हणावा तो कोण । सांगें निरूपण उन्मार्गाचें ॥ ६८ ॥ स्वर्ग कैशातें बोलिजे । नरक कैसा वोळखिजे । सखा बंधु कोण म्हणिजे । गृह माझें तें कोण ॥ ६९ ॥

क आढ्यः को दरिद्रो वा कृपणः कः क ईश्वरः । एतान् प्रश्नान्मम ब्रूहि विपरीतांश्च सत्पते ॥ ३२ ॥

दानं किं तपः किं शौर्यं सत्यं ऋतं किं उच्यते–दान कोणतें, तप कोणतें, शौर्य, सत्य व ऋत कशाला म्हणतात ! **त्यागः कः इष्टं धनं च किं**–त्याग कोणता ! इष्ट धन कोणतें ! **यज्ञः कः दक्षिणा च का**:–यज्ञ कोणता व दक्षिणा कोणती ? २९.

तप कोणतें व दान कोणतें ? शौर्य म्हणजे काय व सत्य कसें असतें ? ऋत कशाला म्हणतात, तेंहि मला निश्चित सांग. ६३ त्याग कोणता ? व पुरुषाचें इष्ट धन कोणतें ? यज्ञ कशाला म्हणतात ? दक्षिणा म्हणजे काय ? ३६४.

श्रीमन्–हे श्रीमन, **पुंसः किंस्वित् बलं**–पुरुषाचें बल कोणतें ! **केशव**–हे केशवा ! **भगः लाभः च कः**–ऐश्वर्य व लाभ कोणता ! **परा विद्या ह्रीः श्रीः का**–परा विद्या, लज्जा व मंडन कोणतें ! **सुखं दुःखं एव च किं**–सुख व दुःख कोणतें. ३०

पुरुषाचें बळ कोणतें ? दया कशाला बोलतात ? हे श्रीपते ! लाभ कोणता ? हे कृपामूर्ते केशवा ! ६५ विद्या कशाला म्हणतात, तें सांग. लज्जा कोठें रहाते व श्रेष्ठ लक्ष्मी कोणती, तेंहि सांग. ६६ सुख कोणतें व तें कसें असतें ! सुखाबरोबर असणारें जें दुःख त्याचेंहि स्वरूप कृपा करून मला सांगावें. ३६७.

पण्डितः कः मूर्खः कः–पंडित कोण व मूर्ख कोण ! **पन्था कः उत्पथः च कः**–मार्ग कोणता व अमार्ग कोणता ! **स्वर्गः कः नरकः कः स्वित् बन्धुः कः गृहं किं उत**–स्वर्ग कोणता, नरक कोणता, बंधु कोण व गृह कोणतें ! ३१.

पंडिताचें लक्षण कसें असतें ? मूर्खाचें लक्षण कोणतें ? सुमार्ग कोणता व दुर्मार्ग कोणता ? ६८ स्वर्ग कशाला बोलावें व नरक कसा ओळखावा ? सख्खा भाऊ कोणाला म्हणावें व माझें घर कोणतें ? ३६९.

आढ्यः कः दरिद्रः कः वा कृपणः कः ईश्वरः कः–श्रीमान् कोण व दरिद्री कोण ! कृपण कोण व ईश्वर कोण ! **सत्पते-हे स्वामिन्, मम एतान् प्रश्नान् विपरीतान् च ब्रूहि**–मीं विचारिलेलें हे शमादि व यांच्या उलट असलेले अशमादिक मला सांग. ३२.

आढ्य कैसेनि म्हणिजे । दरिद्री कैसेनि जाणिजे । कृपण कोणातें बोलिजे । ईश्वर बोळखिजे तो कसा ॥ ३७० ॥ हे माझे प्रश्न जी समस्त । यांचा सांगावा विशदार्थ । जो लौकिकाहूनि विपरीत । उपयुक्त परमार्थी ॥ ७१ ॥ लौकिकाहूनि विपरीतार्थ । त्यातें बोलती गा विपरीत । या अवधियांचा मथितार्थ । परमार्थयुक्त प्रश्न सांगा ॥ ७२ ॥ ज्ञानें सज्ञान संतमूर्ती । त्यांचा स्वामी तूं निश्चितीं । यालागीं तूतें गा सत्पती । सज्ञान म्हणती शास्त्रार्थे ॥ ७३ ॥ माझ्या प्रश्नांची प्रश्नोक्ती । परमार्थप्राप्ती-लागीं श्रीपती । मज सांगावें यथार्थस्थिती । देवासी विनंती उद्धवें केली ॥ ७४ ॥ ऐकोनि भक्ताची विनवण । कृपा द्रवला नारायण । परमार्थरूप त्याचे प्रश्न । स्वयें श्रीकृष्ण सांगेल ॥ ७५ ॥ प्रथम तीं श्लोकींचे यम नियम । विशद सांगेल पुरुषोत्तम । इतर प्रश्न अतिउत्तम । सांगेल मेघश्याम अध्यायांतीं ॥७६॥

श्री० भ०– अहिंसा सत्यमस्तेयमसङ्गो ह्रीरसञ्चयः । आस्तिक्यं ब्रह्मचर्यं च मौनं स्थैर्यं क्षमाऽभयम् ॥३३॥

प्रथम श्लोकींचा उभारा । यमाचीं लक्षणें बारा । पुशिल्या प्रश्नानुसारा । प्रतिउत्तरा हरि बोले ॥ ७७ ॥ पुढां प्रश्न आहेत फार । यालागीं यमनियमांचें उत्तर । आवरूनि संक्षेपाकार । स्वयें श्रीधर सांगत ॥ ७८ ॥ अहिंसा कायावाचामनें । परपीडात्याग करणें । सत्य तें यथार्थ बोलणें । अचौर्यलक्षणें तीं ऐक ॥ ७९ ॥ हातें चोरी नाहीं करणें । परी परद्रव्याकारणें । मनीं अभिलाष नाहीं धरणें । अस्तेयलक्षण त्या नांव ॥ ३८० ॥ असतां देहगेहसंगती । ज्याचे पोटीं नाहीं आसक्ति । जेवीं यात्रेमाजीं लोक येती । परी संगासक्ती त्यां नाहीं ॥ ८१ ॥ स्फटिक ठेविला ज्या रंगावरी । त्यासारिखा दिसे बाहेरी । आपण निर्विकार अंतरीं । तेवीं जो शरीरीं असंगत्वें ॥ ८२ ॥ निंद्य कर्माकारणें । पोटांतूनि

आढ्य कोणाला म्हणावें ? दरिद्री कसा ओळखावा ? कृपण कोणाला बोलावें ? ईश्वराला कसें जाणावें ? ३७० या माझ्या सगळ्या प्रश्नांचें सविस्तर उत्तर दे व त्यांचा लौकिक अर्थ न सांगतां परमार्थिक अर्थ सांग. ७१ लौकिकाच्या विरुद्ध अर्थाला विपरीत म्हणतात. करितां या सर्वांचा मथितार्थ व परमार्थपर अर्थ मला सांग. ७२ ज्ञानसंपन्न संतांचाहि तूं स्वामी आहेस, म्हणून तुला सत्पति म्हणतात व शास्त्रार्थांतहि तुला ज्ञानसंपन्नच म्हटलें आहे. ७३ हे श्रीकृष्णा ! परमार्थप्राप्तीसाठीं माझ्या या प्रश्नांचें यथार्थ उत्तर सांगावें, अशी उद्धवानें देवाला विनंति केली. ७४ तेव्हां भक्ताची ही विनंति ऐकून नारायण कृपेनें द्रवला व त्याच्या परमार्थरूप प्रश्नांचें उत्तर सांगूं लागला. ७५ पहिल्यानें पुरुषोत्तम तीन श्लोकांतील यम-नियमांचें सविस्तर वर्णन करून इतर अत्युत्तम प्रश्नांचें उत्तर अध्यायाच्या शेवटीं सांगेल. ३७६.

—अहिंसा इत्यादि तीन श्लोकांनीं यम व नियम सांगतात—

श्रीभगवान् उवाच–श्रीभगवान् म्हणाले, **अहिंसा**–कोणत्याहि प्राण्याला पीडा न देणें, **सत्यं**–आपल्याला अवगत असेल तसेंच भाषण करणें, **अस्तेयं**–मनानेंहि परधनाचें ग्रहण न करणें, **असङ्गः**–कोठेंहि आसक्त न होणें, **ह्रीः**–अकार्याविषयींची लज्जा, **असंचयः**– कशाचाहि संग्रह न करणें, **आस्तिक्यं च**–व धर्मावरील विश्वास, **ब्रह्मचर्य**–ब्रह्मचर्य व्रत, **मौनं**–वाणीची निवृत्ती, **स्थैर्य**–स्थिरता, **क्षमा**–कोणीं शिव्या दिल्या किंवा ताडन केलें तरी मनांत निर्विकार असणें, **अभयं**–स्वधर्माचरणा-विषयीं कोणाची भीति न बाळगणें. ३३.

पहिल्या श्लोकांत यमाचीं बारा लक्षणें आहेत. प्रश्नाच्या अनुक्रमानें श्रीकृष्ण त्यांचें उत्तर देत आहे. ७७ पुढले प्रश्न पुष्कळ आहेत. म्हणून श्रीकृष्ण यम-नियमांचें उत्तर थोडक्यांत सांगत आहे. ७८ काया-वाचा-मन यांनीं दुसऱ्याला पीडा न देणें, याला अहिंसा म्हणतात. आपल्याला जसें कळलें असेल, त्यांत कांहीं बदल न करितां बोलणें हें सत्य होय. आतां अचौर्याचें लक्षण ऐक. ७९ आपण स्वतःच्या हातांनीं चोरी करावयाची नाहींच, परंतु दुसऱ्याच्या वस्तूचा अभिलाषहि मनांत ठेवावयाचा नाहीं. हें अचौर्य होय. ३८० यात्रेकरूंची यात्रेसाठीं गेलेल्या स्थलावर जशी आसक्ति नसते, तशीच घर-दारावर व स्वतःच्या देहावरहि ज्याची आसक्ति नसते, ८१ किंवा स्फटिक जसा ज्या रंगावर ठेवावा त्या रंगाचा दिसतो, तसें ज्याचें मन आंतून निर्विकार असतें, जो शरीरावरहि आसक्ति ठेवीत नाहीं, तो असंग होय. ८२ निंद्य कर्मांचा ज्याला तिटकारा असतो व लौकिकांतील निंद्य कर्मांसहि जो

कंटाळणें । लौकिकीं निंद्य कर्मा लाजणें । ह्री म्हणणें या नांव ॥ ८३ ॥ इहलोकीं संग्रहो करूं नेणे । जाणे दैवाधीन देहाचें जिणें । स्वर्गसुखभोगाकारणें । नाहीं संग्रहणें पुण्यातें ॥ ८४ ॥ पुण्यें स्वर्गभोगप्राप्ती । पुण्यक्षयें पुनरावृत्ती । जेणें क्षयो पावे पुण्यसंपत्ती । तें न संचिती निजभक्त ॥ ८५ ॥ या नांव गा असंचयो । ऐक आस्तिक्याचा निर्वाहो । सर्वत्र माझा ब्रह्मभावो । कोठेंही अभावो घेऊं नेणे ॥ ८६ ॥ ब्रह्मचर्य ऐसें येथ । जैसें आश्रमप्रयुक्त । बोलिलें शास्त्रीं यथोचित । तेंचि निश्चित करावें ॥ ८७ ॥ मौनीं न बोलावें इतुकें जाण । मिथ्यालाप असंभाषण । नित्य करावें वेदपठण । गायत्रीस्मरण कां हरिनाम ॥ ८८ ॥ स्थिर वृत्ति आत्मारामीं । कां असावी निजधर्मीं । भावार्थें संतसमागमीं । स्थिरता उपक्रमीं या नांव ॥ ८९ ॥ स्वदेह दंडिले कां वंदिलें । परी क्षमा सम दोहीं काळें । देहाचा भोगू तो दैवमेळें । येणें विवेकमळें क्षमावंत ॥ ३९० ॥ या नांव क्षमा म्हणिजे । अभय तें ऐसें जाणिजे । जें जें पारिखें देखिजे । तें तें होइजे आपणची ॥ ९१ ॥ आत्मा एक पंचभूतें एक । दुजे पाहतां नाहीं देख । निमालें भयाचें महादुःख । अभय निःशेख या नांव ॥ ९२ ॥ निमाल्या दुजयाच्या गोठी । बोखदासी भय न मिळे सृष्टीं । अभयाची स्वानंदपुष्टी । निजदृष्टीं ठसावे ॥ ९३ ॥ या नांव गा बाराही यम । उद्धवा सांगितले सवर्म । आतां जयाचें नाम नेम । तेंही सुगम अवधारीं ॥ ९४ ॥

शौचं जपस्तपो होमः श्रद्धातिथ्यं मदर्चनम् । तीर्थाटनं परार्थेहा तुष्टिराचार्यसेवनम् ॥ ३४ ॥

शौचाची ऐक ऐशी परी । अंतरीं शुचि विवेकें करीं । बाह्य तें वेदाज्ञेवरी । शौच करीं मृज्जलें ॥ ९५ ॥ परिसें जपाचा विचार । ज्यासी जैसा अधिकार । तैसा जपावा मंत्र । कां स्वतंत्र गुरुनाम ॥ ९६ ॥ ब्राह्मणाचा जप वेदोद्गार । संन्यासी जपे ओंकार । द्विजन्म्यासी आगममंत्र । कां नाममंत्र

लाजतो, त्याला 'ह्री' म्ह० लज्जा असें म्हणतात. ८३ या लोकीं जो संग्रह करीत नाहीं, ८४ अन्न-वस्त्र केवल प्रारब्धाधीन आहे, असें मानितो, स्वर्गांतील सुखोपभोगासाठींहि जो पुण्यसंचय करीत नाहीं, पुण्यानें स्वर्गभोग मिळतात, पण तें पुण्य क्षीण होतांच पुनः जन्म-मरणपरंपरा प्राप्त होते, ज्यायोगें पुण्यसंपत्तीचा क्षय होतो, अशा कोणत्याहि वस्तूचा माझे भक्त संग्रह करीत नाहींत. ८५ अशा वृत्तीला असंचय असें म्हणतात. आतां आस्तिक्याचें लक्षण ऐक. जो सर्वत्र माझें ब्रह्मस्वरूपच पहातो, त्याला माझा अभाव कोठेंच दिसत नाहीं, याला आस्तिक्य म्हणतात. ८६ ब्रह्मचर्य म्हणजे आश्रमाला विहित असलेले जे शास्त्रोक्त नियम आहेत, त्याप्रमाणें कडक आचरण ठेवणें. ८७ मौन म्हणजे खोटें व अनुचित भाषण न करणें. नित्य वेदपठण, गायत्रीजप व भगवंताचें नामस्मरण, ८८ आत्मस्वरूपांत व स्वधर्मांत स्थिर वृत्ति व संतसमागमाची आवड याला स्थैर्य असें म्हणतात. ८९ आपल्या देहाला कोणी दंड करो किंवा वंदन करो, दोहोंविषयीं सारखीच क्षमा ठेवणें, प्रारब्धाप्रमाणें देहाला बरा-वाईट भोग प्राप्त होतो, असें जो समजतो तोच खरा क्षमावान् होय. ३९० यालाच क्षमा म्हणतात. आतां अभय कशाला म्हणतात तें सांगतों. जेवढें म्हणून परकें दिसतें तेवढें सर्व आपणच व्हावें. ९१ आत्मा एकच आहे. पंचभूतेंहि सगळीं एकच आहेत, वास्तविक त्यांत दुसरें कांहींच नाहीं. अशी एकदां दृढ भावना झाली म्हणजे भयाचें महादुःखच नाहींसें होतें. यालाच पूर्ण अभय म्हणतात. ९२ दुजेपणाची वार्ताच नाहींशी झाल्यावर मग सगळ्या सृष्टींत 'भय' औषधालाहि मिळत नाहीं. अभयाच्या आनंदाची पुष्टि आत्मदृष्टीमध्यें ठसते. ९३ उद्धवा, हेंच बारा यम होत. त्यांतील रहस्य मीं तुला सांगितलें. आतां ज्यांस नेम (नियम) म्हणतात, त्यांचेंहि लक्षण सांगतों, ऐक. ३९४.

शौचं०—बाह्य व आभ्यंतर असें दोन प्रकारचें शौच, मंत्रादिकांचा जप, तप, होम, धर्माविषयीं आदर, अतिथिसत्कार, माझें पूजन, तीर्थयात्रा, श्रेष्ठपुरुषार्थाची इच्छा, संतोष, आणि आचार्यशुश्रूषा. ३४.

आतां शुचिर्भूतपणाचा प्रकार ऐक. विवेकानें अंतःकरण शुद्ध करावें आणि वेदाज्ञेप्रमाणें माती व जल यांनीं बाह्य शुद्धि म्हणजे देह स्वच्छ करावा. ९५ आतां जपाचा विचार ऐक. ज्याचा जसा अधिकार असेल त्यानें तशा मंत्राचा जप करावा. किंवा स्वतंत्रपणें गुरुनामाचें स्मरण करावें. ९६ ब्राह्मणांचा जप वेदघोष; संन्याश्यांचा जप प्रणव;

सर्वांसी ॥ ९७ ॥ तपाचा जो मुख्य प्रकार । जेणें शुद्ध होय अभ्यंतर । तो स्वधर्मीं गा सादर । अत्यादर करावा ॥ ९८ ॥ शरीरशोषणा नांव तप । हा मूर्खांचा खटाटोप । हृदयीं श्रीहरि चिंतणें सद्रूप । परम तप या नांव ॥ ९९ ॥ ऐक होमाचा विचार । देवाचें मुख वैश्वानर । पंच महायज्ञ अग्निहोत्र । होम साचार या नांव ॥ ४०० ॥ माझ्या भजनाची अतिआवडी । कां धर्माची अधिक गोडी । या नांव श्रद्धा रोकडी । जाण धडफुडी उद्धवा ॥ १ ॥ नसतांही अन्न धन । आतिथ्यें दे समाधान । मस्तकीं वंदूनि चरण । निववी वचनें सुखरूपें ॥ २ ॥ दीन देखोनि तत्त्वतां । अतिनम्र विनीतता । यथाशक्ति अर्पणे अर्था । आतिथ्य तत्त्वतां या नांव ॥ ३ ॥ पोटींच्या कळवळेनि वोजा । अत्यादरें गरुडध्वजा । साङ्ग साजिरी करणें पूजा । श्रद्धा समाजासंभारीं ॥ ४ ॥ मेळवूनि ब्राह्मणसंभार । श्रद्धायुक्त षोडशोपचार । पूजितां संतोषें मी श्रीधर । पूजा पवित्र ब्राह्मणांची ॥ ५ ॥ शुद्ध व्हावया अंतःकरण । करावें गा तीर्थगमन । तीर्थयात्रीं श्रद्धा गहन । तीर्थाटन या नांव ॥ ६ ॥ पदोपदीं माझें नाम । गर्जतां स्मरती माझें कर्म । यात्रा करणें निज निष्काम । तीर्थयात्रा परम या नांव ॥ ७ ॥ परोपकारार्थ पर्वत । जेवीं कां सामग्री वहात । तेवीं क्रियामात्रें उपकारार्थ । सदा वर्तत उपकारीं ॥ ८ ॥ जेवीं कां चंद्राचे किरण । लागतांचि निववितीं जाण । तेवीं जयाचें आचरण । उपकारें जन सुखी करी ॥ ९ ॥ जें प्राप्त जाहलें अदृष्टीं । तेणें काळ यथासुखें लोटी । कदा समासम नाहीं पोटीं । यथालाभसंतुष्टी या नांव ॥ ४१० ॥ कायावाचामनें धनें । जो विनटला गुरुकारणें । त्याचें उठे संसारधरणें । गुरुसेवा म्हणणें या नांव ॥ ११ ॥ उभय शौचाचे दोनी गुण । जपादि येर दशलक्षण । हे बारा नेम जाण । देवो आपण बोलिला ॥ १२ ॥

क्षत्रिय व वैश्य या द्विजांनीं वेदशास्त्रांचा जप करावा किंवा 'माझें नामस्मरण' हा मंत्र तर सर्वांसाठींच आहे. ९७ ज्यानें चित्तशुद्धि होते व जो तपाचा मुख्य प्रकार तो स्वधर्मातील आदर आहे. म्हणून स्वधर्माविषयीं आदर ठेवावा. ९८ तप म्हणजे शरीराला कष्टविणें. हा मूर्ख लोकांचा खटाटोप आहे. हृदयांत सद्रूप श्रीहरीचें चिंतन करणें हेंच खरें तप होय. ९९ होमाचा प्रकार ऐक. वैश्वानर म्ह० अग्नि हेंच देवाचें मुख होय. म्हणून पंचमहायज्ञ व अग्निहोत्र होम करावे. ४०० उद्धवा ! माझ्या नांवाची अतिशय आवड व धर्माची अत्यंत गोडी यालाच खरी श्रद्धा म्हणतात. १ उद्धवा ! जवळ फारसें द्रव्य किंवा अन्न नसतांहि जो आलेल्या अतिथीला शिरसा वंदन करून गोड शब्दानें त्याचा सत्कार करितो, २ दीन मनुष्य पहातांच विनयानें त्याच्या पुढें नम्र होतो व आपल्या सामर्थ्यानुसार त्याला द्रव्य देतो, याला अतिथिसत्कार असें म्हणतात. ३ जो अंतःकरणांतील कळवळ्यानें व आदरानें मज भगवंताची सांग पूजा मोठ्या श्रद्धेनें करितो, ४ त्यानें ब्राह्मणांचा समुदाय जमवून अशी षोडशोपचार पूजा श्रद्धेनें केली असतां मी श्रीपति संतुष्ट होतों. कारण ब्राह्मणांची पूजा फार पवित्र आहे. याचेंच नांव मदर्चन. ५ अंतःकरण शुद्ध होण्यासाठीं तीर्थयात्रा कराव्या. तीर्थयात्रेवर दृढ श्रद्धा ठेवणें याला तीर्थाटन म्हणतात. ६ पावलो-पावलीं माझ्या नामाचा गजर करीत व माझ्या चरित्राचें वर्णन करीत निष्कामबुद्धीनें यात्रा करणें याला श्रेष्ठ तीर्थयात्रा म्हणतात. ७ पर्वत जसा परोपकारासाठीं वनस्पत्यादिक सामग्री वहात असतो, त्याप्रमाणें ज्याच्या सर्व क्रिया दुसऱ्यावर उपकार करण्यासाठीं असतात व जो निरंतर दुसऱ्यावर उपकार करीत असतो, त्याला परार्थ असें म्हणतात. ८ चंद्राचे किरण जसे आपल्या स्पर्शानें जीवांचा ताप शांत करितात, त्याप्रमाणेंच परोपकारी मनुष्य आपल्या आचरणानें लोकांना सुखी करितो. ९ दैवानें जें कांहीं प्राप्त होईल त्यांत समाधान मानून जो काळ लोटीत असतो, ज्याच्या मनांत 'सम-विषम' हा भाव नसतो, त्याला 'यदृच्छालाभसंतुष्ट' असें म्हणतात. ४१० जो काया-वाचा-मनानें व धनानें गुरूला शरण जातो, त्याचें संसाररूपी धरणें नाहींसें होतें. यालाच गुरुसेवा म्हणतात. ११ असे हे दोन्ही प्रकारच्या शुद्धीचे दोन गुण व जपादि दहा गुण मिळून हे बारा नियम श्रीकृष्णानें स्वतः सांगितले. ४१२.

एते यमाः सनियमा उभयोर्द्वादश स्मृताः । पुंसामुपासितास्तात यथा कामं दुहन्ति हि ॥ ३५ ॥

दोहीं श्लोकीं यम नियम । निरूपिले उत्तमोत्तम । बारा बारा यांचें वर्म । गुह्य परम शास्त्रार्थीं ॥ १३ ॥ पुरुष यांचें उपसन । जरी करी सकामन । तैं कामधेनूच्या ऐसें जाण । करिती पूर्ण सकळ कामना ॥ १४ ॥ हेंचि पैं गा यम नेम । पुरुष उपासी निष्काम । तयासी माझें निजधाम । अतिसुगम निजाप्ती ॥ १५ ॥ आतां शमदमादिक तुझे प्रश्न । जेणें हातीं पावे ब्रह्मज्ञान । तें सांगेन गुह्य निरूपण । सावधान उद्धवा ॥ १६ ॥ प्रश्नोत्तर सांगेल श्रीकृष्ण । तें अवधारितां सावधान । तत्काळ होय ब्रह्मज्ञान । हें परम प्रमाण अतिगुह्य ॥ १७ ॥ तृप्त व्हावया बाळकासी । निजकरें माता ग्रास दे त्यासी । तेवीं श्रीकृष्ण उद्धवासी । ब्रह्मरसासी देतसे ॥ १८ ॥ जो रस गोड लागे पित्यासी । तो बळेंचि पाजी बाळकासी । तेवीं श्रीकृष्ण उद्धवासी । ब्रह्मरसासी देतसे ॥ १९ ॥ आधींचि तनयाचें प्रेम मोटें । वरी लागतां त्याचें मुखवटें । मग स्वानंदाचेनि नेटें । पान्हा लोटे अनिवार ॥ ४२० ॥ तेवीं स्वयें श्रीकृष्ण । दाटूनि देतसे ब्रह्मज्ञान । तेथें उद्धवें पुशिले प्रश्न । तेणें अधिक जाण तुष्टला ॥ २१ ॥ आधींच पर्जन्य खरा । वरी मीनलासे वीजवारा । मग अनिवार वर्षे धारा । खणोनि धरा वाहतसे ॥ २२ ॥ तेवीं द्यावया ब्रह्मज्ञान । मिष उद्धवाचे प्रश्न । स्वानंदें तुष्टला श्रीकृष्ण । ब्रह्म पूर्ण देतसे ॥ २३ ॥ निमोले देतां मिठाचे खडे । चिंतामणी हातीं चढे । कां विटेसाठीं परीस जोडे । न घे तो नाडे निजस्वार्था ॥ २४ ॥ तेवीं उद्धवाचे थोडे प्रश्न । तेणें आतुडे ब्रह्म पूर्ण । एका विनवी जनार्दन । श्रोतां अवधान मज द्यावें २५ ॥ उद्धवाचे चौतीस प्रश्न । त्यांत यम नियम जाहले जाण । उरले बत्तीस गुण ।

उभयोः एते द्वादश सनियमाः यमाः स्मृताः—वरील दोन श्लोकांमध्यें असे हे बारा यम व नियम सांगितले आहेत. (किंवा ' उभयोः ' म्ह० प्रवृत्त व निवृत्त यांमध्यें बारा यम-नियम सांगितले आहेत. त्यांतील यम मुमुक्षूला मुख्य आहेत.) हि तात—कारण कीं, हे उद्धवा ! उपासिताः पुंसां यथाकामं दुहन्ति—सेवन केलेले हे यम-नियम प्रवृत्त व निवृत्त पुरुषांच्या इच्छेप्रमाणें मोक्ष व अभ्युदय देतात. ३५.

वरील दोन श्लोकांत यम व नियम यांचें उत्तमप्रकारें निरूपण केलें. प्रत्येकाचीं बारा बारा लक्षणें सांगितलीं. त्यांनाच शास्त्रार्थाचें परम गुह्य म्हटलें आहे. १३ पुरुष मनांत कामना धरून जर यांची उपासना करील, तर कामधेनूप्रमाणें हे त्याच्या सर्व कामना पूर्ण करतील. १४ याच यम-नियमांचें जर निष्काम मनानें आचरण केलें तर साधकास माझें परमपद सहज प्राप्त होतें. १५ आतां तुझे जे शम-दमादिकांविषयीं प्रश्न, ज्यांच्या योगानें ब्रह्मज्ञान हस्तगत होतें, त्यांचें गुह्य निरूपण सांगतों, उद्धवा ! तें सावधान चित्तानें ऐक. १६ आतां श्रीकृष्ण त्या प्रश्नांचें उत्तर सांगेल. तें ऐकतांच तत्काल ब्रह्मज्ञान होईल. हेंच त्याचें अत्यंत गूढ प्रमाण आहे. १७ बाळकाला तृप्त करण्यासाठीं त्याची माता जशी आपल्या हातानें त्याला घांस देते, त्याप्रमाणें श्रीकृष्ण उद्धवाला हा ब्रह्मरस देत आहे. १८ पित्याला जो रस गोड लागतो, तो रस जसा पिता लगेंच आपल्या बाळाला पाजितो, त्याप्रमाणें श्रीकृष्ण उद्धवाला ब्रह्मरस पाजीत आहे. १९ आधींच मातेचें तान्ह्या लेंकरांवर अतिशय प्रेम असतें, त्यांत त्याच्या मुखाचा स्पर्श होतांच तिला प्रेमभरानें जो पान्हा फुटतो, तो अनिवार असतो, ४२० तसा श्रीकृष्ण स्वतःच ब्रह्मज्ञान देत असतांनाच त्यांत आणखीं उद्धवानें प्रश्न केला ! मग काय विचारतां ! श्रीकृष्ण अधिकच संतुष्ट झाला. २१ आधींच पर्जन्य सुरू असावा, त्यांत त्याला वारा व विजा यांचें साहाय्य मिळावें, म्हणजे मग जशी अनिवार मुसळधार वृष्टि सुरू होते व सगळी पृथ्वी खणून वाहून नेते, २२ त्याप्रमाणें ब्रह्मज्ञान देण्यासाठीं उद्धवाच्या प्रश्नांचें निमित्त मिळालें मात्र, श्रीकृष्ण स्वानंदानें संतुष्ट होऊन पूर्णपणें ब्रह्म देऊं लागला. २३ कवडीमोल मिठाचे खडे देऊन जर चिंतामणि हातीं आला किंवा विटेच्या मोबदल्यांत परीस मिळाला, तर तो न घेणारा जसा खरोखरच आपल्या स्वार्थाला आंचवतो, २४ त्याप्रमाणें उद्धवाच्या थोड्याशा प्रश्नानें पूर्णपणें ब्रह्मज्ञान मिळत आहे. यास्तव एका-जनार्दन श्रोत्यांना विनवीत आहे कीं, आतां माझ्याकडे लक्ष द्या. २५ उद्धवानें चवतीस प्रश्न केले; त्यांपैकीं यम-नियम हे दोन सांगितले. आतां बत्तीस प्रश्न उरले आहेत.

तेंही विवंचन अवधारा ।। २६ ।। प्रश्नीं दयेचें प्रतिउत्तर । न सांगेचि शारंगधर । त्या अर्थीं भावगर्भ सार । षड्गुणैश्वर्य बोलिलें ।। २७ ।। एहीविखींचें आख्यान । पुढें सांगेल श्रीकृष्ण । दयेच्या ठायीं भाग्य संपूर्ण । कोण कारण सांगावया ।। २८ ।। एवं उरले एकतीस प्रश्न । अधिक एक सांगेल श्रीकृष्ण । सर्वस्वसंगम शौच जाण । कार्यकारणसंबंध ।। २९ ।। ऐसे हे तेतीस गुण । व्याख्यानें सांगेल श्रीकृष्ण । तें करतळीं ब्रह्मज्ञान । उद्धवासी जाण देतसे ।। ४३० ।।

शमो मन्निष्ठता बुद्धेर्दम इन्द्रियसंयमः । तितिक्षा दुःखसंमर्षो जिह्वोपस्थजयो धृतिः ।। ३६ ।।

बुद्धी जे कां विवेकवती । असार सांडूनि सार धरिती । तिणें मनाच्या सकळ वृत्ती । विवेकस्थिती आवरोनी ।। ३१ ।। त्या वृत्तीसमवेत आपण । बुद्धि परमात्मीं मिळे जाण । जेवीं सागरासी लवण । दे आलिंगन भावार्थें ।। ३२ ।। समुद्रीं मिसळतां लवण । समुद्रचि होय आपण । तेवीं आत्मनिश्चयें बुद्धि पूर्ण । चैतन्यघन स्वयें होय ।। ३३ ।। ऐसा बुद्धीचा उपरम । त्यातें म्हणिजे गा शम । यापूर्वीं करावया दम । तोही अनुक्रम अवधारीं ।। ३४ ।। शत्रूचें जें दुर्दमन । तो दमू येथें नव्हे जाण । करावें इंद्रियदमन । तेंही लक्षण अवधारीं ।। ३५ ।। जेणें सहाय होती शमासी । त्या युक्ती राखणें इंद्रियांसी । विधीवेगळें नेदी भोगासी । आवरी अहर्निशीं वैराग्यें ।। ३६ ।। ऐसें इंद्रियांचें निग्रहण । त्या नांव गा दमगुण । आतां तितिक्षेचें लक्षण । ऐक संपूर्ण सांगेन ।। ३७ ।। महासुख आलें होये । तें जेणें उल्हासें अंगीं वाहे । तेणेंचि उल्हासें पाहे । दुःखही साहे निजांगीं ।। ३८ ।। तेज आणि आंधारी । नभ समत्वें अंगीं धरी । तेवीं जो अविकारी । सुखदुःखपरी साहता ।। ३९ ।। गोफणेचा

त्यांचाहि विचार ऐका. २६ प्रश्नामध्यें दयेचें उत्तर श्रीकृष्णानें दिलेलें नाहीं; पण त्याचाहि गूढार्थ षड्गुणैश्वर्यसंपन्न ईश्वरानें ध्वनित केला आहे. २७ त्याचें निरूपण पुढें श्रीकृष्ण करतील. दयेमध्यें संपूर्ण भाग्य सांठविलेलें असतें. तेव्हां त्याचें निरूपण करण्याचें काय कारण ! २८ याप्रमाणें एकंदर एकतीसच प्रश्न बाकी राहिले. त्यांत श्रीकृष्ण शौच आणखी एक अधिक सांगेल. कारण तें कार्य-कारणसंबंधानेंच प्राप्त होणारे आहे. २९ अशा या तेहतीस गुणांचें व्याख्यान करून श्रीकृष्ण उद्धवाला तळहातावरील आंवळ्याप्रमाणें ब्रह्मज्ञान सुलभ करून देत आहे. ४३०.

—मुमुक्षूला ग्राह्य असलेले शमादि व त्याज्य असलेलें दुःखादि यांची महाजनांमध्यें प्रसिद्ध असलेल्या लक्षणांहून विलक्षण लक्षणें श्रीकृष्ण अध्यायसमाप्तीपर्यंत सांगत आहेत, त्यांवरूनच तद्विपरीत असलेल्या अशमादिकांची कल्पना करावी—

बुद्धेः मन्निष्ठता शमः–बुद्धीची मत्परता हा शम आहे. इंद्रियसंयमः दमः–इंद्रियांचा संयम हा दम. (चोरादिकांचें दमन हा दम नव्हे.) दुःखसंमर्षः तितिक्षा–विहित दुःख सहन करणें ही तितिक्षा भारादिकांचे दुःख सहन करणें ही तितिक्षा नव्हे.) जिह्वोपस्थजयः धृतिः– जिव्हा व उपस्थ यांचा वेग धारण करणें ही धृति होय. (केवल उद्वेगशून्यत्व ही धृति नव्हे.) ३६.

विवेकयुक्त बुद्धि असार टाकून केवळ साराचेंच ग्रहण करिते. तिच्यामुळें मनाच्या निरनिराळ्या वृत्ति विवेकांत येऊन मिळतात. ३१ मीठ जसें समुद्राशीं मोठ्या आवडीनें एकरूप होतें, तशीच ही बुद्धि सगळ्या वृत्तींसह आपण होऊन परमात्म्याशीं तादाम्य पावते. ३२ समुद्रांत मीठ मिसळलें कीं, तेंहि जसें समुद्रमयच होऊन रहातें, त्याप्रमाणें आत्मनिश्चयाच्या योगानें बुद्धीहि स्वतःच ज्ञानमय होऊन जाते. ३३ अशा प्रकारें बुद्धीचें शान्तस्वरूप म्हणजेच शम; पण याच्या आधीं ' दम ' अवश्य आहे. त्याचेंहि लक्षण ऐक. ३४ शत्रूचें दमन करणें हा येथील 'दम-' शब्दाचा अर्थ नव्हे; इंद्रियांचें दमन हा अर्थ येथें विवक्षित आहे. त्याचें लक्षण ऐक. ३५ शमाला साह्य होईल अशा युक्तीनें इंद्रियांना स्वाधीन ठेवणें, त्यांना विषयांकडे जाऊं न देणें, रात्रं-दिवस वैराग्यानें त्यांना आंवरून धरणें, ३६ अशा प्रकारचा जो इंद्रियनिग्रह, तो दम होय. तितिक्षा म्ह० सहनशीलता. तिचें सविस्तर लक्षण आतां सांगतों, तें ऐक. ३७ महत् सुख प्राप्त झालें असतां पुरुष तें जितक्या उल्हासानें भोगतो तितक्याच उल्हासानें त्यानें दुःखहि सहन करावें. ३८ आकाश जसें प्रकाश व अंधकार या दोहोंना सारखेंच धारण करितें, त्याप्रमाणें सुख-दुःख निर्विकार मनानें सोसावें. ३९ गोफणी-

सुवर्णपाषाण । लागे तो दुःखी होय पूर्ण । तोचि बोळखिलिया सुवर्ण । दुःख जाऊन सुख होय ॥ ४४० ॥ तैसें द्वंद्वांचें निजस्वरूप । बोळखिलिया मद्रूप । तेव्हां द्वंद्वें होती चिद्रूप । हें मुख्य स्वरूप तितिक्षेचें ॥ ४१ ॥ सांडूनियां देहअहंते । सुखदुःखांहीपरतें । देखणें जें आपणातें । तेचि येथें तितिक्षा ॥ ४२ ॥ स्वप्नींचें दरिद्र आणि सधनता । जागृतीसी दोन्ही मिथ्या । तेवीं सुखदुःखापरता । देखणें तत्त्वतां ते तितिक्षा ॥ ४३ ॥ जिव्हा आणि दुसरें शिश्न । यांचा जयो करावा आपण । या नांव धृति संपूर्ण । विद्याधारण धृति नव्हे ॥ ४४ ॥ जेवीं कृष्णसर्प धरिजे हातीं । हे दोनी धरिजे तैशिया रीतीं । अळुमाळ ढिलावतां धृती । परतोनि खाती धरित्यासी ॥ ४५ ॥ ज्यासी द्रव्यदारासक्ती । तेथ कदा न रिगे हे धृती । द्रव्यदाराअनासक्ती । त्याचे घरीं धृती पोषसणी सदा ॥ ४६ ॥

दंडन्यासः परं दानं कामत्यागस्तपः स्मृतम् । स्वभावविजयः शौर्यं सत्यं च समदर्शनम् ॥ ३७ ॥

सर्व भूतांसी न द्यावें दुःख । त्याचें पोटीं आलें द्यावें सुख । महादान तें हेंचि देख । द्यावें सुख सर्वांसी ॥ ४७ ॥ दुःख निरसूनि भूतांसी । सुख देणें गा सर्वांसी । हेंचि उत्तम दान पृथ्वीसी । अनायासीं तुकेना ॥ ४८ ॥ जन्ममरणांचें दुःख । निरसूनि द्यावें निजसुख । याचि नांवें दान देख । अलोलिक उद्धवा ॥ ४९ ॥ या नांव गा परम दान । उद्धवा निश्चयेंसीं जाण । ऐक तपाचें लक्षण । तुज संपूर्ण सांगेन ॥ ४५० ॥ करूनियां कामाचा त्याग । तप करणें अतिचांग । हृदयीं असतां कामदांग । तपाचें लिंग शोभेना ॥ ५१ ॥ सकाम वना जाय तपासी । तो वनींही चिंती वनितेसी । तें तपचि बाधक होय त्यासी । काम आंगेंसीं वर्ततां ॥ ५२ ॥ त्यागोनि कामाची कामस्थिति । तैं तपाची

तून मारलेला सोन्याचा दगड लागला कीं, प्रथम दुःख होतें, पण लगेच तो सोन्याचा गोळा आहे हें कळतांच दुःख नाहींसें होऊन जसें सुख होतें, ४४० त्याप्रमाणें द्वंद्वाचें स्वरूप मद्रूपच आहे, हें जाणल्यानें सर्व द्वंद्वें चिद्रूप होतात. हें तितिक्षेचें मुख्य लक्षण आहे. ४१ देहाभिमान सोडून सुख-दुःखाच्याहि पलीकडे आत्मस्वरूप आहे, असें पहाणें यालाच तितिक्षा म्हणतात. ४२ स्वप्नांतील दारिद्र्य व श्रीमंती हीं दोन्ही जशीं जागृतींत मिथ्या, त्याप्रमाणेंच सुख-दुःखांहून आपण भिन्न आहोंत, असें समजणें हीच खरी तितिक्षा होय. ४३ रसना व कामासक्ति यांवर जय मिळविणें यालाच धृति म्हणतात. विद्याधारण ही खरी धृति नव्हे. ४४ कृष्णसर्पाचें तोंड दाबून त्याला जसें हातानें सतत घट्ट धरून ठेवावें, त्याप्रमाणेंच या दोहोंना ताब्यांत ठेवावें. त्यांस जर कां यत्किंचित्‌हि सैल सोडलें तर धरणारासच तीं खातात. ४५ ज्याला द्रव्य स्त्री यांची आसक्ति असते त्याला ही धृति केव्हांहि प्राप्त होत नाहीं. ज्याची धन व दारा यांवर आसक्ति नसते, त्याच्या घरीं धृति निरंतर दासी होऊन रहाते. ४४६.

दंडन्यासः परं दानं—दंड म्हणजे भूतांचा द्रोह, त्याचा त्याग हेंच श्रेष्ठ दान आहे. (धनार्पण हें दान नव्हे.) **कामत्यागः तपः स्मृतं**—भोगांची उपेक्षा करणें हेंच तप आहे. (कृच्छ्रादि नव्हे.) **स्वभावविजयः शौर्यं**—स्वभाव म्ह० वासना, तिचा जय म्हणजे तिला प्रतिबंध करणें हेंच शौर्य आहे. (प्रबल शत्रूवर चालून जाणें हें शौर्य नव्हे.) **समदर्शनं सत्यं**—सम म्ह० ब्रह्म, त्याचें आलोचन करणें हेंच सत्य आहे. कारण त्याला सत्यविषयत्व आहे. (केवल यथार्थ भाषण हें सत्य नव्हे.) ३७.

कोणत्याहि प्राण्याला दुःख देऊं नये. ज्याला जें हवें तें सुख त्याला द्यावें. सर्वांस सुख देणें हेंच महादान आहे. ४७ अशा प्रकारें प्राण्यांचें दुःख निवारण करून त्यांस सुख देणें हें सर्वांत उत्तम दान होय. पृथ्वीच्या दानाबरोबरहि त्याची तुलना होणार नाहीं. ४८ उद्धवा ! जन्म-मरणांचें दुःख नाहींसें करून आत्मसुखाचा लाभ करून देणें, हेंच अलौकिक दान होय. यालाच श्रेष्ठ दान म्हणतात. ४९ आतां तुला तपाचें सविस्तर लक्षण सांगतों, तें ऐक. ४५० सर्व कामनांचा त्याग करून उत्तम रीतीनें तप करावें. हृदयांत वासनांचें जाळें पसरलें असतां तपाचा डौल आणणें शोभत नाहीं. ५१ साधक मनांत वासना ठेवून वनांत गेला व तेथेंहि स्त्रीचें चिंतन करीत बसला, तर कामासक्तीमुळें तें तपच त्याला बाधक होतें. ५२ वासना निःशेष टाकून विषयांविषयीं उदासीन असणें हेंच तपाचें खरें साधन

उत्तम गति । अखंड लागे माझी स्मृति । शुद्ध तपप्राप्ती या नांव ॥ ५३ ॥ माझ्या ठायीं अनुताप । त्या नांव गा शुद्ध तप । कां हृदयीं चिंतितां चित्स्वरूप । हें परम तप तपांमाजीं ॥ ५४ ॥ ऐक शौर्याचा विचार । रणीं मर्दूनि अरिवीर । जिंतिला शत्रूंचा संभार । तो एथ शूर मानेना ॥ ५५ ॥ प्रवाहरूपें अनिवार । जीवभाव लागला थोर । त्यातें जिंके जो महावीर । तो परम शूर बोलिजे ॥ ५६ ॥ माझा सदाचार निर्वाहो । मी सज्ञान निःसंदेहो । माझा पवित्र ब्राह्मणदेहो । हा जीवभावो जीवाचा ॥ ५७ ॥ देहाचे माथां वर्णाश्रम । आश्रमाचे माथां कर्म । तो कर्माभिमान ज्यां परम । त्यांसी देहभ्रम अनिवार ॥ ५८ ॥ जिणोनि जीवाचे स्वभाव । चिदानंदाची राणीव । भोगिजे स्वराज्यवैभव । हें परम गौरव शौर्याचें ॥ ५९ ॥ ज्या नांव बोलिजे निजसत्य । तें मी सांगेन निश्चित । सम ब्रह्म देखणें संतत । तें परम सत्य उद्धवा ॥ ४६० ॥ वस्तु न देखतां सर्वसम । जें जें देखणें गा विषम । तेंचि असत्य अतिदुर्गम । सत्य तें ब्रह्म समसाम्यें ॥ ६१ ॥ केवळ जें सत्य भाषण । तें निजसत्य नव्हे जाण । तेंचिविखींचें निरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ६२ ॥

ऋतं च सूनृता वाणी कविभिः परिकीर्तिता । कर्मस्वसङ्गमः शौचं त्यागः संन्यास उच्यते ॥ ३८ ॥

इतर कवींची वदंती । ऋत या नांव सत्य म्हणती । हें सत्य मानावें प्रवृत्तीं । समब्रह्म निवृत्तीमाजीं सत्य ॥ ६३ ॥ ऋत म्हणिजे तें ऐसे येथ । सत्य वाचा जें श्रोत्यांचें हित । तेंही दुःखसंबंधरहित । ऋत निश्चित बोलिजे ॥ ६४ ॥ चित्र पाहतां दिसे विषम । त्यामाजीं भिंती सदा सम । तेवीं जग दिसतां

होय. अखंड माझेंच स्मरण करणें यालाच शुद्ध तप म्हणतात. ५३ पश्चात्तापपूर्वक मत्स्वरूपाचें ध्यान, हेंच शुद्ध तप होय. किंवा हृदयांत माझ्या ज्ञानस्वरूपाचें चिंतन हेंच सर्वांत श्रेष्ठ तप आहे. ५४ आतां शौर्याचा विचार ऐक. जो रणांगणांत बलाढ्य शत्रूला त्याच्या सेनेसह जिंकितो, त्याला लौकिकांत शूर असें म्हणतात. परंतु येथें तो अर्थ विहित नाहीं. ५५ जो अनिवार जीव-भाव प्रवाहरूपानें आपल्या मागें लागलेला असतो, त्याला जिंकणारा महावीर खरा शूर होय. ५६ 'मी नेहमीं सदाचरणानेंच चालतों, मीच तेवढा निःसंशय ज्ञानी, माझा ब्राह्मण देहच काय तो पवित्र' असे जे अहंकाराचे विकार तोच जीव-भाव होय. ५७ देहाच्या मस्तकावर वर्णाश्रम व आश्रमाच्या माथीं कर्म येतें. त्या कर्मावर अतिशय अभिमान ठेवणारास देहाविषयीं अनिवार भ्रम उत्पन्न होतो. ५८ यास्तव जीवाचा स्वभाव जिंकून, चिदानंदाच्या राज्यावर बसून, आपल्या खऱ्या आत्मरूपी स्वराज्याचें वैभव भोगणें यालाच खरें शौर्य म्हणतात. ५९ आतां सत्य कशाला बोलतात, तें निश्चित सांगतों, ऐक. उद्धवा ! निरंतर सर्वत्र सम ब्रह्म पहाणें, यालाच परम सत्य म्हणतात. ४६० सर्व वस्तु सम न पाहतां त्या भिन्न समजणें हें अत्यंत असत् होय. ब्रह्म सर्वव्यापक असून अत्यंत दुर्गम आहे, असें पहाणें हेंच सत्य. ६१ केवल सत्य भाषण करणें म्हणजे सत्य नव्हे. त्याविषयीं श्रीकृष्ण स्वतः निरूपण करून सांगत आहे. ४६२.

—**ऋतं च सूनृता वाणी कविभिः परिकीर्तिता** – सत्य व प्रिय वाणी हेंच ऋत म्हणून विद्वानांनीं म्हटलें आहे. (अर्थात् हें सत्य पूर्वोक्त सत्याहून भिन्न आहे.) **कर्मसु असङ्गमः शौचं** —कर्मामध्यें आसक्ति न ठेवणें हें शौच आहे. (पूर्वोक्त क्रमानें ऋतानंतर त्याग म्हणजे काय हें सांगावयास पाहिजे होतें, पण त्या त्यागाचें व्याख्यान करण्यासाठीं अगोदर भिन्न अर्थानें शौचाचें व्याख्यान केलें; कारण शौचहि मलत्यागरूप आहे, त्यामुळें त्याग व शौच यांच्या भिन्न अर्थांची प्रतीति होत नाहीं.) **त्यागः संन्यासः उच्यते**—संन्यासाला त्याग म्हणतात. ३८.

कित्येक विद्वान् ऋत म्हणजेच सत्य म्हणतात. तें प्रवृत्तीच्या दृष्टीनें खरें आहे. पण निवृत्तींत ब्रह्माला सम मानणें हेंच सत्य होय. ६३ येथें 'ऋत' म्हणजे ऐकणाराचें हित करणारी व दुःखसंबंधरहित अशी सत्य वाणी, तिलाच खरोखर ऋत म्हणतात. ६४ भिंतीवर काढलेलें चित्र विविध प्रकारचें असतें; परंतु त्या चित्राची आश्रयभूत भिंत जशी एकच असते, त्याप्रमाणें हें जगत् जरी भिन्न-भिन्न प्रकारचें भासत असलें तरी आत्मैक्यदृष्टीनें त्याचें

विषम । ज्यां ब्रह्म सम निजबोधें ।। ६५ ।। या नांव गा सत्य जाण । उद्धवें केला नाहीं जो प्रश्न । त्या शौचाचें निरूपण । देवो आपण सांगत ।। ६६ ।। नव्हतां शुद्ध अंतःकरण । त्याग संन्यास न घडे जाण । अंतरशुद्ध्यर्थ शौच पूर्ण । स्वधर्माचरण हरि सांगे ।। ६७ ।। अंतरीं कर्ममळाचें बंधन । त्याचें स्वधर्में करावें क्षालन । कर्में कर्मांचें निर्दळण । करूनि आपण निष्कर्म व्हावें ।। ६८ ।। ते स्वधर्मीं फळाशा न सुटतां । कर्मबंधनें न तुटती सर्वथा । यालागीं फळनिराशता । अंतरशौचता अतिशीघ्र ।। ६९ ।। नैराश्यें स्वधर्माचरण । तेणें अंतरमळाचें क्षालन । या नांव गा शौच जाण । शौच संपूर्ण नैराश्यें ।। ४७० ।। ऐसें शौचें शुद्धांतःकरणीं । ते भूमिका संन्यासग्रहणीं । यालागीं शौच अप्रश्नीं । सारंगपाणी बोलिला ।। ७१ ।। सकळ संकल्पांचा त्याग । हाचि पैं संन्यास चांग । ऐसें बोलिला तो श्रीरंग । त्याग तो चांग या नांव ।। ७२ ।। मी देह हे दृढता जीवीं । संकल्पें तगमग नित्य नवी । बाह्य दंड कमंडलु भगवीं । हे संन्यासपदवी लौकिक ।। ७३ ।।

धर्म इष्टं धनं नृणां यज्ञोऽहं भगवत्तमः । दक्षिणा ज्ञानसंदेशः प्राणायामः परं बलम् ।। ३९ ।।

धन धान्य पशु रत्न । हें प्राण्यासी नव्हे इष्ट धन । मोक्षमार्गीं सबळ जाण । इष्ट धन तो धर्म ।। ७४ ।। घरीं जें पुरिलें धन । तें घरींच राहे जाण । धर्म तो सवें चालतें धन । अंगा बंधन येवों नेदी ।। ७५ ।। धर्मिष्ठायेवढा कृपण । न देखें मी आणिक जाण । मरतांही स्त्रीपुत्रां वंचून । अवघेंचि धन सवें ने ।। ७६ ।। धार्मिकीं धर्मार्थ वेंचूनि धन । मी भांडारी केला नारायण । जे समयीं जें जें

अधिष्ठान ब्रह्म सर्वत्र समच आहे. ६५ यालाच सत्य असें म्हणतात. उद्धवानें न विचारलेल्या शौचाचेंहि निरूपण श्रीकृष्ण स्वतः करीत आहे. ६६ अंतःकरण शुद्ध झाल्यावांचून त्याग किंवा संन्यास घडत नाहीं. चित्तशुद्धि होण्यासाठीं अवश्य असलेलें स्वधर्माचरण आतां हरी सांगत आहे. ६७ चित्ताला जें कर्मरूपी मलाचें बंधन असतें, तें स्वधर्मानें धुवून टाकावें. कर्मानेंच कर्माचा नाश करून आपण निष्कर्म व्हावें. ६८ परंतु कर्मफलाची आशा जर सुटली नाहीं तर कर्मबंधनें कधींहि तुटणार नाहींत. म्हणून फलाची आसक्ति टाकून सत्त्वर अंतःशुद्धि करावी. ६९ फलासक्ति टाकून स्वधर्माचरण केल्यानें चित्तावरील मल धुवून जातो. यालाच शौच म्हणतात. निष्काम बुद्धीनें पूर्ण शुद्धि प्राप्त होते. ४७० अशा प्रकारची अंतःशुद्धि संन्यासग्रहणाचा पाया असल्यामुळें उद्धवानें प्रश्न न करितांच श्रीहरीनें त्याचें वर्णन केलें. ७१ सर्व संकल्पांचा त्याग हाच उत्तम संन्यास होय, असें श्रीकृष्णानें सांगितलें. यालाच श्रेष्ठ त्याग म्हणतात. ७२ 'देहच आत्मा' अशी मनांत दृढ कल्पना ठेवून आंतून नित्य नवी नवी तळमळ लागतच असते व बाहेरून मात्र दंडकमंडलु, भगवीं वस्त्रें यांचा पूर्ण डौल आणणें, ही लौकिक संन्यासदीक्षा होय. ४७३.

नृणां इष्टं धनं धर्मः—मनुष्याचें इष्ट धन धर्म आहे. (पश्वादि साधारण धन नव्हे.) अहं भगवत्तमः यज्ञः—मी परमेश्वरच यज्ञ आहें (माझ्या बुद्धीनें यज्ञाचें अनुष्ठान करावें, कर्मबुद्धीनें करूं नये, असा याचा भावार्थ.) दक्षिणा ज्ञानसंदेशः—यज्ञार्थ जें दान त्याला दक्षिणा म्हणतात. (ज्ञानोपदेश हीच दक्षिणा आहे. सुवर्णादिक ही दक्षिणा नव्हे, कारण ज्ञानोपदेशानें यज्ञरूप विष्णु प्राप्त होतो.) प्राणायामः परं बलं—उन्मत्तांचें दमन हेंच बल आहे. प्राणायाम दुर्दम मनाचें दमन करितो, म्हणून तेंच श्रेष्ठ बल आहे. ३९.

धन, धान्य, पशु, रत्नें ही कांहीं मनुष्याची खरी हितकर संपत्ति नव्हे. मोक्षमार्गांत स्वधर्मच समर्थ असून तोच खरें वैभव भोगवितो. ७४ घरांत जें धन पुरून ठेविलेलें असतें, तें घरींच रहातें; पण धर्म मात्र आपल्या बरोबर चालत येणारें द्रव्य असून त्याचें ओझें आपल्याला वहावें लागत नाहीं. तें आपल्याला बद्धहि करीत नाहीं. ७५ धार्मिक माणसासारखा कृपण मीं दुसरा कोणीहि पाहिला नाहीं. तो मरतांनाहि स्त्री-पुत्रांची वंचना करून धर्मरूपी सगळें धन आपल्याबरोबर नेतो. ७६ धार्मिक भक्तांनीं आपलें सगळें द्रव्य धर्मार्थ खर्च करून मज

लागे जाण । तें मी आपण स्वयें पुरवीं ॥ ७७ ॥ यालागीं धर्म तो इष्ट धन । हें सत्य सत्य माझें वचन ऐक यज्ञाचें व्याख्यान । यथार्थ जाण सांगतों ॥ ७८ ॥ अग्नि तो माझें मुख जाण । यज्ञभोक्ता मी नारायण । अवघा यज्ञचि मी श्रीकृष्ण । परम प्रमाण वेदोक्त ॥ ७९ ॥ तेथें माझें स्वरूप ब्राह्मण । मद्दीक्षादीक्षित जाण । सद्भावें करूनियां यजन । माझे सुख संपूर्ण पावले ॥ ४८० ॥ तेथ अधर्मद्रव्याचेनि कोडें । अविधी दांभिक याग घडे । तोही मजमुखींच पडे । परी ते कोरडें खडखडित ॥ ८१ ॥ अविधी जाहले पशुघातकी । तेणें अवदानें मी नव्हें सुखी । दंभें पडिलें कुंभिपाकीं । महानरकीं रौरवीं ॥ ८२ ॥ सर्व भूतांच्या भूतमुखीं । अर्पी तें पावे यज्ञपुरुखीं । हे दीक्षा नेणोनि याज्ञिकीं । जाहले नारकी हिंसादोषें ॥ ८३ ॥ जे मद्भावें दीक्षित जाण । विश्वतोमुखीं ज्यांचें यजन । तयांचा यज्ञ तो मी नारायण । दक्षिणा कोण ते ऐका ॥ ८४ ॥ यज्ञासी मोल नाहीं देख । त्यासी ज्ञानदक्षिणा अमोलिक । हातां येतांचि याज्ञिक । महासुख पावले ॥ ८५ ॥ दक्षिणा आल्या ज्ञानधन । याज्ञिक होती अतिसंपन्न । कल्पांतीं वेंचेना तें धन । निजीं समाधान जीवशिवां ॥ ८६ ॥ सर्वांमाजीं प्राण सबळ । प्राणबळें बळी सकळ । प्राणयोगें मन चपळ । अतिचंचळ प्राणस्पंदें ॥ ८७ ॥ यापरी गा बळिष्ठ प्राण । प्राणाआधीन सदा मन । तो प्राण जिंकावा आपण । बळवंतपण या नांव ॥ ८८ ॥ गज उपडिजे पायीं धरून । घायीं चूर कीजे पंचानन । प्राण न जिंकतां जाण । शूरांचें प्रमाण नव्हे बळ ॥ ८९ ॥ प्राणाअधीन जीव मन । त्या प्राणांचें करूनि दमन । तो स्वयें कीजे गा स्वाधीन । अतिबळ जाण या नांव ॥ ४९० ॥ दृढ प्राणायाम साधिल्यापाठीं । थोरला देवो धांवे भेटी । भेटलिया न सुटे मिठी । ऐसा बळी सृष्टीं प्राणायामी ॥ ९१ ॥

नारायणाला आपला खजीनदार करून ठेविलें आहे. त्यामुळें ज्यावेळीं त्यांना जें जें लागतें, तें तें मी त्यांस आपण होऊन पुरवितों. ७७ म्हणून धर्म हाच खरा द्रव्याचा ठेवा आहे, हें माझें वचन सत्य सत्य समज. आतां यज्ञाचें यथार्थ व्याख्यान करितों, तें ऐक. ७८ अग्नि हेंच माझें मुख आहे. यज्ञभोक्ता मी नारायण आहें. मी श्रीकृष्णच सगळा यज्ञ आहें. याला वेदाचें प्रमाण आहे. ७९ त्या यज्ञांतील ब्राह्मण हेंच माझें स्वरूप होय. माझी यज्ञदीक्षा घेतलेले ते दीक्षित भक्तिभावानें माझा यज्ञ करून माझ्या पूर्ण सुखाला प्राप्त होतात. ४८० पण त्यांनीं जर कां अधर्मानें द्रव्य संपादन करून अविधिपूर्वक केवल दंभानें यज्ञ केला, तर तोहि माझ्याच मुखांत पडतो खरा; पण त्याचें फल मात्र कांहींच मिळत नाहीं. असा दांभिक यज्ञ करणारे कोरे करकरीत रहातात. ८१ ते अविधीनें पशूचा घात मात्र करितात; पण त्या अवदानानें मला सुख होत नाहीं. ते दंभामुळें कुंभिपाक-नांवाच्या भयंकर रौरव नरकांत पडतात. ८२ सर्व प्राणिमात्रांच्या मुखांत जें अर्पण करावें तें मज यज्ञपुरुषालाच प्राप्त होतें. पण ही दीक्षा न जाणतां यज्ञ करणारे हिंसादोष पदरीं घेऊन नरकांत मात्र पडतात. ८३ जे माझी भक्ति हीच यज्ञदीक्षा घेतात व सगळें विश्व हेंच माझें मुख समजून त्याचें यजन करितात, त्याचा मी नारायणच यज्ञ आहें. आतां दक्षिणा कोणती ती ऐका. ८४ यज्ञाला केव्हांहि किंमत नसतें. त्यांत ज्ञानोपदेशरूपी अमूल्य दक्षिणा हातीं येतांच याज्ञिक आत्मसुखाला प्राप्त होतात. ८५ ज्ञानरूपी धनाची दक्षिणा मिळतांच याज्ञिक संपन्न होतात. तें धन कल्पांतींहि संपत नाहीं. जीव-शिव या दोघांनाहि समाधान होतें. ८६ सर्वांत प्राण फार प्रबल आहे. प्राणामुळेंच सर्वांना बल प्राप्त होतें. प्राणानेंच मन चपल झालें आहे व प्राणाच्या स्फूर्तीनेंच तें अत्यंत चंचल झालें आहे. ८७ इतका प्राण बलाढ्य आहे. मन सतत प्राणाच्या अधीन असतें. अशा प्राणाला जिंकणें यालाच प्राणायामाचें बल म्हणतात. ८८ हत्तीचा पाय धरून त्याला फेंकून देणें, किंवा एका घावाबरोबर सिंहाचा चक्काचूर करणें हें शूराच्या बलाचें प्रमाण नव्हे. प्राणांना जिंकणें, हें खरें बल होय. ८९ ज्या प्राणाच्या अधीन जीव व मन असतें त्या प्राणाचें दमन करून त्यांस स्वाधीन ठेवणें यालाच अतिबल असें म्हणतात. ४९० दृढ प्राणायाम साध्य झाला असतां देवाधिदेवहि त्याच्या भेटीला धांवून येतो. तो एकदां भेटला कीं, त्याची मिठी सुटत नाहीं. प्राणायाम करणारा इतका बलवान् असतो. ४९१.

भगो मे ऐश्वरो भावो लाभो मद्भक्तिरुत्तमः । विद्यात्मनि भिदाबाधो जुगुप्सा ह्रीरकर्मसु ॥ ४० ॥

उद्धवें पुसिला दयेचा प्रश्न । ते न सांगोनि श्रीकृष्ण । परम भाग्याचें निरूपण । स्वयें आपण सांगत ॥ ९२ ॥ केवळ भाग्येंवीण । दया तितुकी वांझ जाण । यालागीं भाग्यनिरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ९३ ॥ म्हणसी कृपणाचें भाग्य । तो असतेनि धनें अभाग्य । परम भाग्य त्याचें चांग । जो दयेतें सांग प्रतिपाळी ॥ ९४ ॥ त्या परम भाग्याचें लक्षण । तुज मी सांगेन संपूर्ण । ऐक तेथींची उणखूण । उदारपण भाग्याचें ॥ ९५ ॥ ज्ञान आणि वैराग्य पूर्ण । लक्ष्मी आणि औदार्यगुण । ऐश्वर्य आणि यश गहन । हे षड्गुण जाण महाभाग्य ॥ ९६ ॥ हे षड्गुण माझें भाग्य । भाग्यें पावे जो सभाग्य । तोचि दयेतें पाळी सांग । अतिअव्यंग पूर्णत्वें ॥ ९७ ॥ जो षड्गुणेशीं संपन्न । तोचि दीनदयाळु जाण । देवो जाणे दान सन्मान । दरिद्र विच्छिन्न करूं शके ॥ ९८ ॥ ऐशिया सभाग्याची भेटी । होय तें भाग्य पाहिजे ललाटीं । माझ्या भाग्यासम सृष्टीं । आणिक दृष्टीं दिसेना ॥ ९९ ॥ ऐसेनि ऐश्वर्यें संपन्न । तो दयेचें माहेर जाण । तिसी सोहळे करिती आपण । दयासंपन्न त्याचेनि ॥५००॥ यालागीं दयेचे पोटीं । म्यां सांगितली भाग्याची गोठी । भूतदया जयाच्या पोटीं । तो अभाग्य सृष्टीं कदा नोहे ॥ १ ॥ तुवां पुसिला लाभ तो कोण । ऐक त्याचेंही लक्षण । माझी उत्तम भक्ती जाण । लाभ संपूर्ण त्या नांव ॥ २ ॥ माझी करितां उत्तम भक्ती । चारी मुक्ती पायां लागती । सुरवर लोटांगणीं येती । लाभ श्रीपती मी लाभें ॥ ३ ॥ हा लाभ न येतां हातीं । धनादिकांची जे प्राप्ती । तो नाडु जाण निश्चितीं । नरकगतिदायक ॥ ४ ॥ यालागीं परम लाभ माझी भक्ती । जेणें मी लाभें श्रीपती ।

—लाभाचें व्याख्यान करण्याची इच्छा करणारे भगवान् प्रथम भगाचें त्याहून भेदानें व्याख्यान करितात; कारण लाभ आणि भग यांना व्यवहारांत एकच समजतात—

मे ऐश्वरः भावः भगः—माझें ऐश्वर्यादि षाड्गुण्य हेंच भग म्ह० भाग्य आहे. मद्भक्तिः उत्तमः लाभः—माझी भक्ति हाच उत्तम लाभ आहे. (पुत्रादि हा लाभ नव्हे.) आत्मनि भिदाबाधः विद्या—आत्म्यामध्यें प्रतीत होणाऱ्या भेदाचा बाध हीच विद्या आहे. केवल ज्ञान ही विद्या नव्हे. अकर्मसु जुगुप्सा ह्रीः—अकार्यातील त्याज्यत्व बुद्धि हीच ह्री आहे. (सामान्य लज्जा ही ह्री नव्हे.) ४०.

उद्धवानें दयेविषयीं प्रश्न विचारिला असतां श्रीकृष्णानें त्याचें उत्तर न देतां आपणच भाग्याचें निरूपण केलें. ९२ कारण भाग्यावांचून दया फोल आहे. म्हणून श्रीकृष्ण अगोदर भाग्याचें निरूपण करीत आहे. ९३ यावर तूं कदाचित् म्हणशील कीं, एखादा कृपणहि भाग्यवान् असतो; परंतु तो द्रव्यवान् असून अभागी होय. जो दयेचें पालन करितो, तोच खरा भाग्यवान्. ९४ त्या परम भाग्याचें लक्षण मी तुला सविस्तर सांगतों. त्या भाग्याचें स्वरूप ऐक. औदार्य हें भाग्याचें लक्षण आहे. ९५ ज्ञान आणि पूर्ण वैराग्य; संपत्ति आणि औदार्य; ऐश्वर्य आणि यश; हे सहा गुण म्हणजेच महाभाग्य. ९६ या सहा गुणांनीं युक्त असणें हेंच माझें भाग्य आहे. असें भाग्य ज्याला लाधतें, तोच यथायोग्य पूर्णपणें दयेचा धर्म पाळतो. ९७ या सहा गुणांनीं संपन्न असलेलाच मनुष्य दीनदयाळ होय. कारण तो सन्मानानें दान देतो व दारिद्र्य नाहींसें करितो. ९८ अशा भाग्यवान् माणसाची गांठ पडण्यास मोठें दैव लागत असतें. माझ्या भाग्यासारखें त्याचें भाग्य सृष्टींत दुसऱ्या कोठेंहि सांपडणार नाहीं. ९९ जो अशा ऐश्वर्यानें युक्त असतो, तेथें दयेचें माहेरघरच असतें. तो दयेचें कोड-कौतुक पुरवीत असतो. त्यामुळें दया संपन्न होते. ५०० यास्तव दयेच्या आधीं मीं तुला भाग्याची वार्ता सांगितली. ज्याच्या पोटांत भूतदया असते, तो जगांत केव्हांहि भाग्यहीन नसतो. १ आतां तूं लाभाचें लक्षण विचारिलें होतेंस, तें सांगतों, ऐक. माझी उत्तमोत्तम भक्ति यालाच लाभ म्हणतात. २ माझी उत्तम भक्ति केली असतां चारी मुक्ति भक्तांच्या पायां पडतात, श्रेष्ठ देव लोटांगणें घालितात व मज श्रीपतीचा लाभ घडतो. ३ मत्प्राप्तीचा हा लाभ हातीं न येतां धनादिक संपत्ति मिळणें म्हणजे ते नरकाला नेणारें विघ्नच आहे, असें समजावें. ४ म्हणून माझी भक्ति हाच परम लाभ आहे. त्या भक्तीनेंच मी श्रीपति प्राप्त

ऐक विद्येची व्युत्पत्ती । यथानिगुतीं सांगेन ॥ ५ ॥ दृढ वासनेचिया संबंधा । शुद्धास आणी जीवपदा । अभेदीं उपजवी भेदा । अविद्याबाधा या नांव ॥ ६ ॥ देहाचे माथां वर्णाश्रम । आश्रमांचे माथां कर्म । त्या कर्माचा अभिमान परम । तो जीवधर्म देहबुद्धी ॥ ७ ॥ ते छेदोनि जीवाची बाधा । तो मेळविजे चिदानंदा । तें नांव शुद्ध आत्मविद्या । येर ते अविद्या सर्वही ॥ ८ ॥ जे निरसी गा अविद्या । ते बोलिजे शुद्ध विद्या । येरी शास्त्रादि चौदा विद्या । ते जाण अविद्या पाल्हेळी ॥ ९ ॥ जे निरसी जीवासी बाधा । ते बोलिजे शुद्ध आत्मविद्या । आइक ऱ्हीवेच्या संबंधा । लाजावे सदा निंद्यकर्मीं ॥५१०॥ केवळ अवयव झांकणें । ते लज्जा येथ कोण म्हणे । गेलियाही जीवेंप्राणें । अकर्म न करणें ते लज्जा ॥११॥

श्रीर्गुणा नैरपेक्ष्याद्याः सुखं दुःखसुखात्ययः । दुःखं कामसुखापेक्षा पण्डितो बन्धमोक्षवित् ॥ ४१ ॥

सकळ साम्राज्यवैभवेंसी । चतुर्दशभुवनविलासेंसीं । अंगीं लक्ष्मी आलिया जयापाशीं । परी थुंकोनि तिसी पाहेना ॥ १२ ॥ ऐसी ज्याची निरपेक्षता । ते उत्कृष्ट श्री तत्त्वतां । त्यासी मी श्रीकृष्ण वंदीं माथां । इतरांची कथा कायसी ॥ १३ ॥ ज्यासी लक्ष्मीसीं निरपेक्षता । त्याची नित्य वस्ती माझे माथां । त्याहीहोनि पढियंता । आणिक सर्वथा मज नाहीं ॥ १४ ॥ सुख आणि महादुःख । दोनीतें ग्रासोनियां देख । प्रकटे स्वानंद स्वाभाविक । या नांव सुख उद्धवा ॥ १५ ॥ जेथ दुजयाची चाड नाहीं । इंद्रियांचा पांग न पडे कांहीं । विषयावीण आनन्द हृदयीं । निजसुख पाहीं या नांव ॥ १६ ॥ विसरोनि हें निजसुख । कामापेक्षां करणें देख । याचि नांव गा परम दुःख । केवळ ते मूर्ख सेविती ॥ १७ ॥ नित्य होतां कामप्राप्ती । कदा नव्हे कामतृप्ती । कामापेक्षां पाडी दुःखावर्ती । दुःख निश्चितीं

होतों. आतां विद्येचें यथार्थ लक्षण ऐक. ५ जी वासनेचा संबंध जोडून निर्विकार आत्म्याला जीवपदाला आणिते, अभेदांत भेद उत्पन्न करिते ती अविद्येची बाधा होय. ६ देहाच्या मस्तकावर वर्णाश्रम आहेत; आश्रमांच्या माथीं कर्म, त्या कर्मांचा जो अत्यंत अभिमान त्यामुळेंच जीवाला देहबुद्धि उत्पन्न होते. ७ जीवाची बाधा तोडून जी त्याला चिदानंदांत नेऊन मिळविते, तीच खरी आत्मविद्या होय. इतर सर्व अविद्या होत. ८ जी अविद्येचें निरसन करिते, तिलाच शुद्ध विद्या म्हणतात. शास्त्रादि ज्या इतर चौदा विद्या आहेत, तो केवळ अविद्येचा विस्तार आहे. जी जीवाची बाधा नाहींशीं करिते, तिलाच खरी आत्मविद्या म्हणतात. आतां 'ह्रीः' म्ह० लज्जा, तिच्याविषयीं ऐक. निंद्यकर्माविषयीं तिरस्कार वाटणें याला लज्जा म्हणतात. केवळ शरीराचे अवयव झांकणें याला लज्जा कोणी म्हणावें! प्राण गेला तरी निंद्य कर्म न करणें हीच खरी लज्जा होय. ५११.

नैरपेक्ष्याद्याः गुणाः श्रीः–निरपेक्षता इत्यादि गुण हेंच मंडन आहे. किरीटादि नव्हे. दुःखसुखात्ययः सुखं–दुःख सुख यांचें अतिक्रमण म्ह० चिंतन न करणें हेंच सुख आहे. (भोग हें सुख नव्हे.) कामसुखापेक्षा दुःखं–विषयभोगांची अपेक्षा हेंच दुःख. (अग्निदाहादि हें दुःख नव्हे.) बंध-मोक्षवित् पंडितः–बंध व मोक्ष यांना जो जाणतो तो पंडित. (सामान्य विद्वान् पंडित नव्हे.) ४१.

चौदा भुवनांच्या साम्राज्यवैभवासह स्वतः लक्ष्मी जरी घरीं चालून आली, तरी जो तिच्याकडे ढुंकूनहि पहात नाहीं, १२ इतका जो निरपेक्ष असतो, त्याची खरोखर तीच श्री म्ह० श्रेष्ठ संपत्ति होय. मी श्रीकृष्ण त्याला शिरसा वंदन करितों. मग इतरांची काय कथा! १३ जो संपत्तीविषयीं निरपेक्ष असतो, तो माझ्या मस्तकावर नित्य रहातो. त्याहून मला दुसरा कोणीहि अधिक प्रिय नाहीं. १४ उद्धवा! सुख व महादुःख या दोहोंना ग्रासून टाकून ज्याच्या मनांत स्वाभाविक आनंद प्रकट होतो, त्याला सुख असें म्हणतात. (सुख-दुःखांविषयीं उदासीनता हेंच खरें सुख.) १५ जेथें दुसऱ्याची गरज नाहीं, इंद्रियांचें दैन्य नाहीं, असा जो हृदयांतील विषयरहित आनंद तेंच निजसुख होय. १६ या आत्मसुखाला विसरून विषयाची इच्छा करणें यालाच परम दुःख म्हणतात. केवळ मूर्ख लोकच त्याचें सेवन करितात. १७ नित्य विषयांची प्राप्ति होत असूनहि ज्याच्या कामना तृप्त होत नाहींत

कामापेक्षा ॥ १८ ॥ हा बंध हा मोक्ष चोख । जाणणें अलौलिक । कदा नव्हे आनुमानिक । पंडित देख या नांव ॥ १९ ॥ ऐशी न जोडतां अवस्था । आम्ही सज्ञान वेदशास्त्रतां । ऐशी अभिमानी पंडितता । ते न ये सर्वथा उपेगा ॥ ५२० ॥ ज्यासी शांति आणि समाधान । साचार बंधमोक्षांचें ज्ञान । तो महापंडित जाण । ऐसें श्रीकृष्ण बोलिला ॥ २१ ॥

मूर्खो देहाद्यहंबुद्धिः पन्था मन्निगमः स्मृतः । उत्पथश्चित्तविक्षेपः स्वर्गः सत्त्वगुणोदयः ॥ ४२ ॥

वेदशास्त्र नेणता एक । त्यासी मूर्ख म्हणती लोक । ते मूर्खता येथें न मने देख । केवळ मूर्ख देहाभिमानी ॥ २२ ॥ केवळ नश्वरदेह देख । तो मी म्हणोनि मानी हरिख । देहाभिमानें भोगी नरक । यापरता मूर्ख कोण आहे ॥ २३ ॥ विटाळें देहाचा संभवो । विटाळें देहाचा उद्भवो । विटाळें निधन पहा हो । विटाळासी ठावो देहापाशीं ॥ २४ ॥ देहाचें निजरूप येथ । अस्थि चर्म विष्ठा मूत्र । तो मी म्हणवूनि जो श्लाघत । मूर्ख निश्चित तो जाण ॥ २५ ॥ ऐशी जे कां देहअहंता । ती नांव परम मूर्खता । चालणें माझ्या वेदपंथा । सन्मार्गता ती नांव ॥ २६ ॥ ज्यासी जाहली चित्तविक्षेपता । तो निंदी गुरुदेवता । जो न मानी वेदशास्त्रार्थां । तो उत्पथामाजीं पडे ॥ २७ ॥ जो गुरुदोषदर्शी समत्सरतां । जो क्रोध करी सुहृदआप्तां । जो धिक्कारी मातापिता । चित्तविक्षेपता त्या नांव ॥ २८ ॥ जो सन्मानालागीं पाही । जो साधुसज्जनांतें करी द्रोही । जो दोष देखे ठायीं ठायीं । चित्तविक्षेप पाहीं या नांव ॥ २९ ॥ जो वेद परापवादा । जो करूं रिघे परनिंदा । जो विश्वासे स्त्रियेचे शब्दा । चित्तविक्षेपबाधा ती नांव ॥ ५३० ॥ जो सन्मार्गापासूनि चेवता । पडे अधर्मकर्मउत्पथा । ते ही

त्यांना त्याची ती कामासक्तीच दुःखाच्या भोंवऱ्यांत टाकिते. विषयेच्छा हेंच खरें दुःख होय. १८ जो हा बंध आणि हा मोक्ष असें स्पष्ट जाणतो, केवळ अनुमानानें बोलत नाहीं, त्याला 'पंडित' असें म्हणतात. १९ परंतु हें यथार्थ ज्ञान नसतां जे 'आम्ही वेदशास्त्रसंपन्न विद्वान् आहोंत.' असें म्हणतात, तें खरे पंडित नव्हेत. त्यांचा कांहींच उपयोग नाहीं. ५२० ज्याला शांति व समाधान आहे आणि बंध-मोक्षांचें यथार्थ ज्ञान आहे, तोच महापंडित होय, असें श्रीकृष्णानें सांगितलें. ५२१.

देहाद्यहंबुद्धिः मूर्खः–देह-गेह इत्यादिकांमध्यें अहं असा अभिमान ठेवणारा मूर्ख होय. मन्निगमः पन्थाः स्मृतः–जो माझी अत्यंत प्राप्ति करून देतो, तो निवृत्ति मार्गच सन्मार्ग होय. कंटकादि शून्यमार्ग हा सन्मार्ग नव्हे. चित्तविक्षेपः उत्पथः–चित्तविक्षेप म्ह० प्रवृत्तिमार्ग हाच उत्पथ म्ह० कुमार्ग आहे. (चोरादिकांनीं युक्त असलेला मार्ग उन्मार्ग नव्हे.) सत्त्वगुणोदयः स्वर्गः–सत्त्वगुणाची अत्यंत वृद्धि हाच स्वर्ग आहे, (इंद्रादि लोक नव्हे.) ४२.

एखादा मनुष्य वेद-शास्त्र जाणत नसला तर लोक त्याला मूर्ख म्हणतात. पण आम्ही त्याला मूर्ख म्हणत नाहीं. देहाभिमानीच खरा मूर्ख होय. २२ केवळ क्षणभंगुर देहालाच 'मी' समजून जो आनंदित होतो व त्या देहाभिमानानें अखेर नरकांत जातो, त्याच्यासारखा मूर्ख दुसरा कोण आहे. २३ देह विटाळापासून उत्पन्न होतो, त्यावरच वाढतो आणि त्यांतच त्याचें निधन होतें. देहाजवळ विटाळाची कायमची वस्ती असते. २४ अस्थि, चर्म, विष्ठा, मूत्र हेंच देहाचें स्वरूप आहे. अशा देहावर 'मी' म्हणून अभिमान ठेवून प्रौढी मिरविणारा खरोखरच मूर्ख होय. २५ अशी जी देहावरील अहंता तिला परम मूर्खपणा म्हणतात. माझ्या वेदमार्गानें चालणें हाच खरा सन्मार्ग होय. २६ ज्याच्या चित्ताला भ्रम झाला असेल, तोच गुरुदेवतेची निंदा करितो. जो वेदशास्त्रार्थ मानीत नाहीं, तो वाईट मार्गांत पडतो. २७ गुरूचे दोष पाहून त्याचा द्वेष करितो, जो सुहृद् आप्तावर कोपतो, मातापित्यांचा धिक्कार करितो त्याच्या वृत्तीलाच चित्तविक्षेप--बुद्धिभ्रंश म्हणतात. २८ जो स्वतःच्या सत्कारासाठीं साधूसंतांचा द्वेष करितो व सर्व ठिकाणीं दोष पहातो, त्या दृष्टीला चित्तविक्षेप म्हटलें आहे. जो दुसऱ्याचें उणें पहातो, दुसऱ्याची निंदा करितो, जो स्त्रीच्या शब्दावर विश्वास ठेवितो, तीच चित्तविक्षेपाची बाधा होय. ५३० उद्धवा ! जो सन्मार्गापासून

चित्तविक्षेपता । जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ३१ ॥ आपण तत्त्वतां परब्रह्म । जाणणें हा वेदमार्ग उत्तम । हें नेणोनि वर्तणें सकाम । तोचि परम उन्मार्ग ॥ ३२ ॥ स्वर्गशब्दाची व्युत्पत्ती । ते सत्त्वगुणाची उत्पत्ती । जेणें निजसुखाची होय प्राप्ती । परी इंद्रलोकगती तो स्वर्ग नोहे ॥३३॥ अमरभुवना जे जे गेले । परतोनि पतना आले । शुद्धसत्वीं जे मिसळले । ते पावले निजसुख ॥ ३४ ॥ ऐसा जो कां सत्वगुण । तोचि येथें स्वर्ग जाण । आतां नरकाचें लक्षण । तुज संपूर्ण सांगेन ॥ ३५ ॥

नरकस्तमउन्नाहो बंधुर्गुरुरहं सखे । गृहं शरीरं मानुष्यं गुणाढ्यो ह्याढ्य उच्यते ॥ ४३ ॥

कामक्रोधलोभउद्रेक । तेणें खवळे महामोह देख । तो बुडवी सज्ञान विवेक । एकलें एक तम वाढे ॥ ३६ ॥ अरुणोदयीं दाटे कुहर । निबिड पडे अंधकार । न कळे दिवसनिशाव्यवहार । सूर्यचंद्र दिसेना ॥ ३७ ॥ यापरी गा निजचित्तीं । अंधतमें वाढे वृत्ती । कर्तव्याकर्तव्यस्थिती । एकही स्फूर्ति स्फुरेना ॥ ३८ ॥ ऐसा तमाचा उन्नाह उद्रेक । त्या नांव जाण महानरक । परी यमयातना जें दुःख । तो नरक ह्मणो नये ॥ ३९ ॥ यमयातनां पाप झडे । महामोहें पाप वाढे । याम्य नरक ते बापुडे । अतिनरक गाढे महामोहीं ॥ ५४० ॥ काम क्रोध लोभ देख । हेचि तीनी निरय-दायक । तेथ महामोहो आवश्यक । जें होय एक अंधतम ॥ ४१ ॥ इतुका मिळे जेथ समुदावो । त्यातें बोलिजे तमउन्नाहो । ऐसा जेथ घडे भावो । तो पुरुष पहा वो नरकरूप ॥ ४२ ॥ जो घोरनरकाप्रती जाये । त्याचा तेथूनि उद्धार होये । तमउन्नाह ज्यासी प्राप्त होय । त्याचा निर्गम नोहे महाकल्पांतीं ॥ ४३ ॥ ऐसी तमउन्नाहाची ख्याती । ऐकोनि उद्धव कंटाळे चित्तीं । ऐसे बुडते जीव तमोवृत्ती ।

च्युत होऊन आड मार्गांत शिरतो, तोहि चित्तविक्षेपच समजावा. ३१ 'आपण स्वतःच परब्रह्म आहोंत' हें जाणणें हाच उत्तम वेदमार्ग होय आणि हें न जाणतां कामनासक्त होणें हा आडमार्ग होय. ३२ आतां स्वर्ग-शब्दाचा अर्थ ऐक. सत्त्वगुणाच्या वृद्धीनें आत्मसुखाला प्राप्त होणें हाच खरा स्वर्ग होय. इंद्रलोकीं गमन म्हणजे स्वर्ग नव्हे. ३३ कारण आजपर्यंत जेवढे देवलोकीं गेले तेवढे सगळे परत फिरून खालीं आले आणि जे शुद्ध सत्त्वाची वृद्धि करून त्याच्याशीं एकरूप झाले ते आत्मसुखाला प्राप्त झाले. ३४ असा जो सत्त्वगुण त्यालाच येथें स्वर्ग म्हटलें आहे. आतां तुला नरकाचें सविस्तर लक्षण सांगतों, तें ऐक. ५३५.

तमउन्नाहः नरकः–तमोगुणाचा अतिरेक हाच नरक आहे. (तमिस्त्रादि नव्हे) गुरुः बंधुः–गुरुच बंधु आहे. (भ्रात्रादि नव्हे.) सखे–हे मित्रा उद्धवा ! सः अहं–तो जगद्गुरु मीच आहें. मानुष्यं शरीरं गृहं–मनुष्यदेह हेंच घर आहे. (सर्व साधनें व भोगस्थानें यांनीं युक्त असलेला मोठा राजवाडा गृह नव्हे) गुणाढ्यः हि आढ्यः उच्यते–गुणांनीं जो संपन्न असतो, तोच श्रीमान् होय. (धनवान् हा खरा श्रीमान् नव्हे.) ४३.

काम-क्रोध-लोभ यांच्या अमर्याद उसळीनें महामोह खवळतो तो ज्ञानासह विवेकाला बुडवून सर्वत्र तम पसरवितो. ३६ पहांटेच्या वेळीं दाट धुकें पसरलें म्हणजे सर्वत्र गाढ अंधकार पसरतो, रात्र व दिवस यांतील व्यवहार कळेनासा होतो व चंद्र-सूर्यहि जसे दिसेनासे होतात, ३७ त्याप्रमाणें आपल्या चित्तवृत्तींवर अज्ञानरूपी दाट अंधकार पसरला म्हणजे कर्तव्य-अकर्तव्य कांहीं कळेनासें होतें. ३८ अशी जी ही तमाची उसळी, तिलाच महानरक असें म्हणतात. यमलोकींच्या ज्या यातना त्याला नरक म्हणूं नये. ३९ कारण यमयातना भोगून पापाचा क्षय होतो व महामोहानें पाप वाढत असतें. महामोहाच्या भयंकर नरकापुढें यमपुरींतील दुःख बापडें कांहींच नव्हे. ५४० काम, क्रोध व लोभ हे तीन्ही नरक देणारेच आहेत. पण महामोह खात्रीनें अंधतमनांवाच्या नरकांतच टाकितो ४१ या सर्वांचा समुदाय जेथें जमतो, तेथें अज्ञानाची समृद्धि होते. जो मनुष्य असा असतो तो साक्षात नरकरूपच आहे. ४२ घोरनरकांत पडलेल्या माणसाचाहि उद्धार होतो. पण जो या मोहांधकारांत पडतो त्याचा त्यांतून कल्पांतींहि उद्धार होत नाहीं. ४३ अशी ही तमाची विलक्षण ख्याति ऐकून उद्धवाच्या मनाला किळस

त्यांची उद्धारगती कोण करी ॥ ४४ ॥ ऐसा उद्धवाचा भावो । जाणोनि बोलिला देवाधिदेवो । बुडतयातें उद्धरी पहा वो । गुरुरावो निजसखा ॥ ४५ ॥ ऐसा गुरु तूं कोण ह्मणशी । मी नित्य लागें ज्याच्या पायांशीं । जो चिन्मात्र पूर्ण ब्रह्मराशी । गुरु नाम तयासी बोलिजे ॥ ४६ ॥ त्या ब्रह्मापरीस अधिकता । गुरुसी आलीसे तत्त्वतां । ब्रह्म ब्रह्मत्वें हा प्रतिपादिता । येऱ्हवीं ब्रह्माची वार्ता कोण पुसे ॥ ४७ ॥ अज अव्यय अनंत । अच्छेद्य अभेद्य अपरिमित । हे ब्रह्ममहिमा समस्त । सद्‌गुरूंनीं येथ विस्तारिली ॥ ४८ ॥ ऐशी ऐकतां सद्‌गुरुकीर्ति । जडजीव उद्धरती । गुरुनामाची महाख्याती । ऐकोनि कांपती यमकाळ ॥ ४९ ॥ त्या सद्‌गुरूचें महिमान । करी बुडत्याचें उद्धरण । निवारी जन्ममरण । शिष्यसमाधान निजदाता ॥ ५५० ॥ सुहृद आप्त सखा बंधू । शिष्याचे सद्‌गुरु प्रसिद्धू । निवारूनि नरकसंबंधू । परमानंदू सुखदाता ॥ ५१ ॥ आतां गृहाचें लक्षण । तुज मी सांगेन संपूर्ण । माड्या गोपुरें धवळारें जाण । गृहप्रमाण तें नव्हे ॥ ५२ ॥ मनुष्यदेह तो गृहाश्रम । जेथें नित्य वसें मी पुरुषोत्तम । तेथील करितां स्वधर्मकर्म । आत्माराम उल्हासे ॥ ५३ ॥ ज्या नरदेहाचिये प्राप्ती । इंद्रादिक देव वांछिती । वेद वानी ज्या देहाची कीर्ति । निजमोक्षप्राप्ती नरदेहीं ॥ ५४ ॥ निजगृह जें साचार । तें जाणावें नरशरीर । आतां आढ्यपणाचा विचार । तोही प्रकार अवधारीं ॥ ५५ ॥ जो ज्ञानगुणीं अतिसंपन्न । जें कल्पांतींही न वेंचे धन । तोचि आढ्यतम जाण । येर तें धन नश्वर ॥ ५६ ॥ नश्वर धनाची आढ्यता । अवश्य नेत अधःपाता । ज्ञानधनें जे आढ्यता । तेणें ये हाता परब्रह्म ॥ ५७ ॥

दरिद्रो यस्त्वसंतुष्टः कृपणो योऽजितेन्द्रियः । गुणेष्वसक्तधीरीशो गुणसङ्गो विपर्ययः ॥ ४४ ॥

आली आणि तो मनांत म्हणाला कीं, तमोवृत्तींत बुडणाऱ्या जीवांचा उद्धार तरी कोण करणार ! ४४ हा उद्धवाच्या मनांतील आशय जाणून देवाधिदेव श्रीकृष्ण म्हणाला कीं, उद्धवा ! आपला सखा सद्‌गुरूच बुडणाऱ्यांचा उद्धार करितो. ४५ 'असा गुरु कोण' म्हणून जर तूं विचारशील तर ऐक. मी नित्य ज्याचे पाय धरितों तो चित्स्वरूप पूर्ण परब्रह्मच गुरु होय. ४६ गुरूची योग्यता खरोखर ब्रह्माहूनहि अधिक आहे. कारण तोच 'हें ब्रह्म' म्हणून ब्रह्माचें प्रतिपादन करितो. एरवीं ब्रह्माला कोणीं विचारिलें नसतें ! ४७ अज, अव्यय, अनंत, अच्छेद्य, अभेद्य, अपरिमित इत्यादि विशेषणांनीं सद्‌गुरूनेंच ब्रह्माचा महिमा विस्तारिला. ४८ अशा सद्‌गुरूची कीर्ति ऐकतांच जड जीव उद्धरून जातात. गुरुनांवाचें माहात्म्य ऐकतांच यम व काळ कांपूं लागतात. ४९ त्या सद्‌गुरूचा महिमा बुडणाऱ्या जीवांचा उद्धार करितो व जन्म-मरणांचें निवारण करितो. तोच शिष्याला खरें समाधान देणारा आहे. ५५० सद्‌गुरूच शिष्याचा आप्त, सुहृद्, सखा, बंधु आहे. तो नरकाचें निवारण करून परमानंद देणारा आहे. ५१ आतां मी तुला घराचें खरें लक्षण सविस्तर सांगतों, तें ऐक. मजले, चुनेगच्या, बंगले, हें कांहीं वास्तविक घर नव्हे. ५२ मनुष्यदेह हाच खरा गृहस्थाश्रम आहे. त्याच घरांत मी पुरुषोत्तम नित्य रहातों. त्यांतील स्वधर्मकर्म केल्यानें मी आत्माराम प्रसन्न होतों. ५३ इंद्रादिक देवहि या मनुष्यदेहाची इच्छा करीत असतात. वेद या मनुष्यशरीराची कीर्ति वर्णितात आणि या नरदेहांतच मोक्षाची प्राप्ति होते. ५४ यास्तव आपलें शरीर हेंच आपलें खरें घर समजावें. आतां आढ्यतेचा म्ह० संपन्नतेचा प्रकार सांगतों, ऐक. ५५ जो मनुष्य ज्ञानानें संपन्न असतो, त्याचें तें ज्ञानरूपी धन कल्पांतींहि संपत नाहीं. तोच अत्यंत धनवान् होय. ५६ इतर सर्व लौकिक धन नश्वर आहे. त्या नश्वर धनाच्या आढ्यतेनें अवश्य अधःपतन होतें. पण जो ज्ञानरूपी धनानें संपन्न असतो त्याच्या हातीं तत्काल परब्रह्म येतें. ५५७.

यः तु असंतुष्टः सः दरिद्रः— जो असंतुष्ट असतो तोच दरिद्री, यः अजितेंद्रियः सः कृपणः—जो अजितेंद्रिय तोच कृपण म्ह० शोच्य आहे. (दीन मनुष्य शोच्य नव्हे.) यः गुणेषु असक्तधीः सः ईशः—जो विषयांमध्यें अनासक्तबुद्धि असतो, तोच स्वतंत्र. (राजादि नव्हे.) गुणसङ्गः विपर्ययः—ज्याची गुणांमध्यें आसक्ति असते तोच अनीश म्ह० परतंत्र होय. (हें कथन शमादि विपर्ययाच्या उदाहरणार्थ आहे. वर जीं शमादिकांचीं लक्षणें सांगितलीं आहेत, त्यांच्या उलट अशमादिकांचीं लक्षणें जाणावीं.) ४४.

ऐक दरिद्राचें लक्षण । गांठी असतां कोटी धन । ज्याचें संतुष्ट नाहीं मन । परम दरिद्री जाण या नांव ॥ ५८ ॥ ज्याचे गांठीं नाहीं कांचवटी । परी संतुष्टता नित्य पोटीं । तोचि संपन्न सकळ सृष्टीं । सत्य गोष्टी हे उद्धवा ॥ ५९ ॥ गांठीं असोनियां धन । जो पोटा न खाय आपण । सदा लोलिंगत मन । दरिद्रलक्षण या नांव ॥ ५६० ॥ यावरी जें कृपणपण । ऐक त्याचेंही लक्षण । जेवीं राजा बांधी सेवकजन । तेवीं इंद्रियांअधीन जो होय ॥ ६१ ॥ निर्धारितां निजरूप जाण । सर्वांचा राजा तो आपण । तें विसरोनि होय दीन । इंद्रियांअधीन होऊनि ठाके ॥ ६२ ॥ मन तयांचें आज्ञाधार । मनाचीं इंद्रियें किंकर । त्यांच्यांनीं हा होय डिंगर । अजितेंद्रियें होय थोर कृपणत्व ऐसें ॥ ६३ ॥ निजकिंकरांचीं किंकरें । त्या इंद्रियांचीं हा बोळंगे द्वारें । अजितेंद्रियत्वें अतिखरें । निजांगीं सुभरे कृपणत्व ॥ ६४ ॥ या नांव गा कृपणपण । तुज म्यां सांगितलें जाण । आतां ईश्वराचें सुलक्षण । ऐक संपूर्ण उद्धवा ॥ ६५ ॥ कनक आणि कामिनी । ज्यासी नावडे मनींहूनि । तोचि ईश्वरू त्रिभुवनीं । सत्य सत्य हे वाणी उद्धवा ॥ ६६ ॥ तुवां जितुके केले प्रश्न । तितुके ज्यासी बोळंगती गुण । त्यांसीही ज्याचें अलिप्तपण । ईश्वरत्व संपूर्ण त्या नांव ॥ ६७ ॥ कनक आणि कामिनी । यांचा पंगिस्त मनींहूनी । तोचि अनीश्वरू जनीं । हें सत्य मानीं उद्धवा ॥ ६८ ॥ शमादि सांगितले प्रश्न । त्यांचें जें विपरीत लक्षण । तेंचि अनीश्वरत्व जाण । अशमादि गुण ते ठायीं ॥ ६९ ॥

एत उद्धव ते प्रश्नाः सर्वे साधु निरूपिताः । किं वर्णितेन बहुना लक्षणं गुणदोषयोः ॥ ४५ ॥
गुणदोषदृशिर्दोषो गुणस्तूभयवर्जितः ॥ ४६ ॥

आतां दरिद्राचें लक्षण ऐक. कोट्यवधि द्रव्याच्या राशी जवळ असल्या तरी ज्याचें मन संतुष्ट नसतें, त्याला पक्का दरिद्री म्हणतात. ५८ परंतु पदरीं फुटकी कवडीहि नसून जो नित्य संतुष्ट असतो, तोच सगळ्या जगांत संपन्न होय. उद्धवा ! हें अगदीं सत्य आहे. ५९ गांठीला अगणित द्रव्य असून पोटाला न खाणें व मन सदा लोभी असणें, हेंच दरिद्राचें लक्षण होय. ५६० याहीपेक्षां जो कृपणपणा, त्याचें लक्षण सांगतों, ऐक. राजाला त्याच्या नोकरांनींच जसें बांधून ठेवावें तसा कृपण इंद्रियांच्या ताब्यांत रहातो. ६१ आत्मस्वरूपाचा तत्त्वतः विचार केला असतां मनुष्य स्वतःच इंद्रियांचा राजा आहे; परंतु तें विसरून तो दीन होतो व इंद्रियांच्या वश होऊन रहातो. ६२ वास्तविक मन त्याचें आज्ञाधारक आहे व इंद्रियें मनाचे दास आहेत; पण तो त्यांच्याहिपेक्षां अज्ञ होऊन एखाद्या लहान बालकासारखा पराधीन होतो, इंद्रियांना स्वाधीन न ठेविल्यामुळें कृपण बनतो. ६३ आपल्या नोकराचींहि नोकर असलेलीं जीं इंद्रियें त्यांच्या दाराशीं तो लाळ घोटीत असतो. अशा प्रकारें इंद्रियें प्रबल झालीं म्हणजे आपल्या अंगीं कृपणत्व येतें. ६४ यालाच कृपणपणा म्हणतात. त्याचें लक्षण मीं तुला सांगितलें. उद्धवा ! आतां ईश्वराचें सुलक्षण सविस्तर सांगतों, तें ऐक. ६५ ज्याला कनक आणि कांता मनापासून आवडत नाहींत, तोच सगळ्या त्रिभुवनांत खरा ईश्वर होय. हें वचन त्रिवार सत्य जाण. ६६ उद्धवा ! तूं जेवढ्या गुणांविषयीं प्रश्न केलेस, ते सर्व गुण अंगीं असूनहि जो त्यांपासून अलिप्त रहातो, त्यालाच परिपूर्ण ईश्वर समजावा. ६७ उद्धवा ! ज्याला द्रव्य आणि दारा यांची अत्यंत आसक्ति असते तो या जगांत अनीश्वर आहे, हें तूं सत्य समज. तुझ्या शमादि प्रश्नांचें मीं जें उत्तर सांगितलें, त्याच्या विपरीत जे अशमादि गुण तेंच अनीश्वरत्व आहे, असें जाणावें. ५६९.

—प्रश्नोत्तरांचा उपसंहार करितात—

उद्धव एते ते सर्वे प्रश्नाः साधु निरूपिताः—हे उद्धवा ! तुझ्या सर्व प्रश्नांचें मीं मोक्षोपयोगित्वानें निरूपण केलें. (उद्धवानें गुणदोषांच्या विवेचनासाठीं हें सर्व विचारिलें होतें, म्हणून भगवान् गुण दोषांचें संक्षेपतः लक्षण सांगतात—) बहुना वर्णितेन किं—अधिक पाल्हाळ करून काय करावयाचें आहे ! गुण-दोषयोः लक्षणं (एतावत् एव)—गुण व दोष यांचें लक्षण हें एवढेंच आहे. गुणदोषदृशिः दोषः—गुण व दोष यांचें दर्शन हाच दोष, उभयवर्जितः तु गुणः—व गुण-दोष-दृष्टि सोडणें हाच गुण होय. ४५-४६.

उद्धवा तुझे सकळ प्रश्न । म्यां निरूपिले सुलक्षण । जेणें होइजे ब्रह्मसंपन्न । तैसें व्याख्यान सांगीतलें ॥ ५७० ॥ संसारीं गुणदोषलक्षण । सांगतां अपरिमित जाणा । यालागीं धरावें मौन । परम कठिण गुणदोष ॥ ७१ ॥ गुणदोष नायकावे कानीं । गुणदोष न देखावे नयनीं । गुणदोष न बोलावे वदनीं । गुणदोष मनीं न धरावे ॥ ७२ ॥ ब्रह्मज्ञानाचें मुख्य लक्षण । तेंही बहुत नाहीं निरूपण । श्लोकार्धें श्रीकृष्ण । स्वयें आपण सांगत ॥ ७३ ॥

ब्रह्म एक परिपूर्ण । तेथें कैंचे दोष कैंचे गुण । अविद्या क्षोभली तें जाण । गुणदोषलक्षण वाढवी ॥ ७४ ॥ जो देखो लागे दोषगुण । त्यासी अविद्या क्षोभली जाण । जो न देखे गुणदोषभान । तो ब्रह्मसंपन्न उद्धवा ॥ ७५ ॥ पराचा देखावा दोषगुण । हाचि दोषांमाजीं महादोष जाण । गुणदोष न देखावा आपण । हा उत्तम गुण सर्वार्थीं ॥ ७६ ॥ ब्रह्मीं नाहींत दोषगुण । हें सर्वार्थीं सत्य जाण । जो देखे गा दोषगुण । ब्रह्मत्व जाण तेथें नाहीं ॥ ७७ ॥ जे गुणदोष देखो लागले । त्यांचें ब्रह्मत्व कैसेनि गेलें । त्यापाशीं तें वोस जाहलें । कीं रुसूनि गेलें तेथूनी ॥ ७८ ॥ जेवीं रविबिंबा राहु ग्रासी । तैं दिवसा देखिजे नक्षत्रांसी । तेवीं अविद्या ब्रह्मत्व जैं ग्राशी । तैं गुणदोषांसी देखिजे ॥ ७९ ॥ आदरें सांगे श्रीकृष्ण । उद्धवा न देखावे दोषगुण । हे माझे जीवींची निजखूण । तुज म्यां संपूर्ण सांगीतली ॥ ५८० ॥ जनीं चौऱ्यायशीं लक्षयोनी । त्यांत गुणदोष एके स्थानीं । न देखावे मनुष्ययोनीं । इतुकेनी नित्यमुक्त ॥ ८१ ॥ म्हणसी स्वाचारपरिपाटीं । गुणदोष देखावे दृष्टीं । उद्धवा हे गोष्टी खोटी । स्वधर्मराहाटी ते भिन्न ॥ ८२ ॥ निजदोष निरसावयाकारणें । स्वधर्मकर्म आचरणें । तेणें जें गुणदोष देखणें । तें नागवी धांवणें जैसें जाहलें ॥ ८३ ॥ साळीं पिकावया शेतीं । तृण जाळूनि दाढ करिती ।

उद्धवा ! मीं तुझ्या सगळ्या प्रश्नांचें निरूपण उत्तम प्रकारें केलें आहे. ज्यायोगें तूं ब्रह्मसंपन्न होशील, असें व्याख्यान केलें. ५७० या संसारांतील गुण-दोषांचीं लक्षणें सांगूं लागलें असतां, तीं कधींहि संपणार नाहींत, इतकीं अगणित आहेत. गुण-दोषांचें विवेचन करणें फार कठिण आहे. म्हणून मौन धरावें, हा उत्तम मार्ग होय. ७१ कोणाचे गुण-दोष कानांनीं ऐकूं नयेत, डोळ्यांनीं पाहूं नयेत, तोंडानें उच्चारूं नयेत किंवा आपल्या मनांतहि ठेवूं नयेत. ७२ आतां ब्रह्मज्ञानाचें मुख्य लक्षण राहिलें; परंतु त्याचें निरूपण फार मोठें नाहीं. तें अर्ध्या श्लोकांत श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. ५७३.

ब्रह्म एक परिपूर्ण आहे. तेथें गुण-दोष कोठले ! जेव्हां अविद्या म्ह० माया क्षोभ पावते (त्रिगुणांची साम्यावस्था ढळते) तेव्हां गुण व दोष यांची वाढ होते. ७४ उद्धवा ! जो गुण-दोष पाहूं लागतो, त्याच्या अविद्येचा क्षोभ झाला आहे असें समजावें; आणि जो गुण-दोषांना पहात नाहीं, तो ब्रह्मसंपन्न जाणावा. ७५ दुसऱ्याचे गुण-दोष पहाणें, हाच मुळीं दोषांतील महादोष आहे आणि आपण गुण- दोषांकडे न पहाणें हाच सर्वांत उत्तम गुण होय. ७६ ब्रह्मामध्यें गुण-दोष नाहींत, हें सर्वथा सत्य आहे. यास्तव जो गुण-दोष पहातो त्याच्या अंगीं ब्रह्मत्व नाहीं, असें समजावें. ७७ (यावर तूं कदाचित् म्हणशील कीं) गुण-दोष पहाणारांचें ब्रह्मत्व कसें निघून जातें, (तर ऐक.) त्याच्यापाशीं तें ब्रह्म शून्य होतें किंवा रुसून जातें. ७८ राहु सूर्याला जेव्हां ग्रासतो, (म्ह० ग्रहण लागतें) तेव्हां दिवसा जशीं नक्षत्रें दिसूं लागतात, त्याचप्रमाणें जेव्हां अविद्या ब्रह्मत्वाला आच्छादिते तेव्हां गुण-दोष दिसूं लागतात. ७९ श्रीकृष्णानें मोठ्या आदरानें सांगितलें कीं, उद्धवा ! गुणदोष केव्हांहि पाहूं नयेत. ही माझ्या अंतःकरणांतील खूण मी तुला सांगून ठेवितों. ५८० या सृष्टीमध्यें चौऱ्यांयशीं लक्ष योनी आहेत. त्यांतील एका मनुष्य योनींतील गुण-दोष जरी न पाहिले तरी तेवढ्यानेंहि मनुष्य नित्यमुक्त होतो. ८१ उद्धवा ! तूं म्हणशील कीं, स्वधर्माचारासाठीं गुणदोष पहावे लागतात, तर ही गोष्ट खोटी आहे. कारण स्वधर्माचरण याहून अगदीं भिन्न आहे. ८२ आपले दोष घालविण्यासाठीं स्वधर्म-कर्म करावयाचें असतें; तेव्हां त्या स्वधर्मासाठींच गुणदोष पाहूं लागलें तर साह्यार्थ आलेल्यानेंच नागविल्यासारखें होईल. ८३ शेतांत भात पिकविण्यासाठीं

तेथ पिकली साळी जैं जाळिती । तैं तोंडीं माती पडली कीं ॥ ८४ ॥ व्हावया दोषनिवृत्ती । वेदें द्योतिली धर्मप्रवृत्ती । तेणें स्वधर्में जैं दोष देखती । तैं निजप्राप्ती नागवले ॥ ८५ ॥ जेवीं कां सोंगें नटनटी । दाविती हावभाव नाना गोठी । परी तो भाव नाहीं त्यांचे पोटीं । स्वधर्म त्या दृष्टीं करावा ॥ ८६ ॥ न देखोनि दोषगुण । स्वधर्ममर्यादा नोसंडून । करावें गा स्वधर्माचरण । हें मुख्य लक्षण कर्माचें ॥ ८७ ॥ ऐशिया स्वधर्मगती । कर्ममळ निःशेष जाती । साधकां निजपदप्राप्ती । गुणदोषस्थिती सांडितां ॥ ८८ ॥ गुणदोष देहाचे ठायीं । आत्मा नित्य विदेही । गुणदोष त्याच्या ठायीं । सर्वथा नाहीं उद्धवा ॥ ८९ ॥ साधकें न देखावा दोषगुण । सिद्धासी सहजचि नाहीं जाण । जरी दिसों लागले दोषगुण । तरी आली नागवण दोघांसी ॥ ५९० ॥ साधकाची प्राप्ति बुडे । सिद्धाची सिद्धि तत्काळ उडे । एवं गुणदोषांचें सांकडें । दोहींकडे उद्धवा ॥ ९१ ॥ गुणदोषीं भरली सृष्टी । तेथ न ठेवावी निजदृष्टी । हे कळवळोनियां पोटीं । श्रीकृष्णें गोष्टी सांगितली ॥ ९२ ॥ गुणदोष विविधभेद । ऐसे आहेत निषिद्ध । तरी कां पां स्वमुखें गोविंद । बोलिला प्रसिद्ध वेदानुवादें ॥ ९३ ॥ येचि अर्थींचा प्रश्न । पुढें उद्धव करील जाण । तेंचि व्यासाचें निरूपण । विसावा जाण जीवशिवां ॥ ९४ ॥ तेथ सकाम आणि निष्काम भक्त । यांचे अधिकार अभिव्यक्त । स्वयें सांगेल भगवंत । कथा अद्भुत ते आहे ॥ ९५ ॥ संतीं द्यावें अवधान । श्रोतां व्हावें सावधान । एका विनवी जनार्दन । रसाळ निरूपण पुढें आहे ॥ ५९६ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे एकाकारटीकायां भगवदुद्धवसंवादे एकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कन्धे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥

पालापाचोळा जाळून जमिनीची भाजावळ करितात; परंतु तेथें जर कां पिकलेलें शेतच जाळिलें तर मग त्या शेतकऱ्याच्या तोंडांत मातीच नाहीं का पडली ! ८४ दोषनिवृत्ति होण्यासाठीं वेदानें धर्मप्रवृत्ति दाखवून दिली आहे. त्या स्वधर्मानें जर कोणी दोषच पाहूं लागले तर ते आत्मप्राप्तीला खात्रीनें मुकणार. ८५ नट स्त्री-पुरुषांचीं नाना प्रकारचीं सोंगें घेऊन विविध हावभाव करितात; परंतु त्यांच्या मनांत जसा त्यांतील कोणताच भाव नसतो, त्याप्रमाणें स्वधर्म आचरावा. ८६ गुणदोष न पहातां, स्वधर्माची मर्यादा न सोडितां, स्वधर्माचरण करावें हें कर्माचें मुख्य लक्षण आहे. ८७ अशा स्वधर्माचरणानें कर्माचा मल निःशेष नाहींसा होतो व गुणदोषांची वार्ता सोडिल्यानें साधकाला आत्मपदाची प्राप्ति होते. ८८ गुणदोष हे देहाचे धर्म आहेत आणि आत्मा देहरहित आहे. त्याच्या ठिकाणीं गुणदोष सर्वथा संभवत नाहींत. ८९ म्हणून साधकानें गुणदोष पाहूं नयेत. सिद्धाला तर ते मुळीं दिसतच नाहींत. त्यालाहि जर कां गुणदोष दिसूं लागले तर ते दोघेहि नागवले, असें समजावें. १९० कारण साधकानें आतांपर्यंत जें मिळविलेलें असतें तें सर्व बुडतें आणि सिद्धाचें सिद्धपण तत्काळ नाहींसें होतें. उद्धवा ! अशा प्रकारें गुणदोषांचें हें संकट सिद्ध व साधक या दोघांनाहि सारखेंच भोंवतें. ९१ हें सगळें जगत् गुणदोषांनीं भरलेलें आहे; परंतु आपण त्याकडे लक्ष देऊं नये, असें श्रीकृष्णानें कळवळून उद्धवाला सांगितलें. ९२ पण गुणदोषांत जर असे अनेक निषिद्ध प्रकार आहेत तर श्रीकृष्णानें ते वेदवचनानुसार आपल्या मुखानें कसे सांगितले, ९३ अशा अर्थाचा प्रश्न पुढें उद्धव करणार आहे. त्याविषयीं श्रीव्यासांचें निरूपण हा जीव-शिवांचा विसावाच आहे. ९४ पुढें सकाम व निष्काम भक्तांचा अधिकार श्रीकृष्ण स्पष्ट करून स्वतः सांगणार आहे. ती कथा अति अद्भुत आहे. ९५ पुढील निरूपण रसाळ आहे. तरी संतांनीं लक्ष द्यावें व श्रोत्यांनीं सावध व्हावें असें एकनाथ-जनार्दन विनवीत आहे. ५९६.

इ. भा. महा० भगवदुद्धवसंवादांतील ज्ञानादिकांचा त्याग या नांवाचा एकोणिसावा अध्याय समाप्त झाला.